A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

सर्व समावेशक आणि न्याय्य गुणवत्ता पूर्ण शिक्षण सर्वांना मिळणे हे शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांमध्ये अभिप्रेत आहे. उच्च शिक्षण हे केवळ नोकरी मिळवण्याचे साधन नसून, शाश्वत भविष्यासाठी जागरूक नागरिक घडवण्याची प्रक्रिया आहे. या गृहीतकानुसार आपल्या कडील उच्च शिक्षण शाश्वत विकासासाठी आवश्यक ज्ञान, कौशल्ये आणि मुल्ये प्रदान करते का? हे पाहणे आवश्यक आहे. या शाश्वत समाज विकासाच्या प्रक्रियेत गत कालीन भारतीय शिक्षण व्यवस्थेची काय भूमिका होती हे पाहिल्यावर आजच्या शिक्षण व्यवस्थेची वस्तुनिष्ठ मांडणी करता येईल.भारतीय शिक्षण व्यवस्थेचा इतिहास हजारो वर्षांचा आहे. पारंपारिक शिक्षणावर या काळात जास्त भर होता. समाजातील सर्व घटकांना समान किंवा न्यायपूर्ण शिक्षणाच्या संधी नव्हत्या. ब्रिटीश भारतात येईपर्यंत महिला व कनिष्ठ जातीतील लोकांच्या औपचारिक शिक्षणावर निर्बंध होते. ब्रिटीशांनी भारतात आधुनिक म्हणता येईल अशा शिक्षण व्यवस्थेची सुरुवात केली. ब्रिटीशांनी वसाहतवादी ज्ञान निर्मिती केली व त्यांनी ब्रिटीश साम्राज्य वादाला पोषक ठरेल अशा स्वरुपाचे शिक्षण भारतीयांना दिले. जेणेकरून भारतीय समाज वैचारिक दृष्ट्या ब्रिटीश वसाहतवादाचा समर्थक व वाहक होईल. आजतागायत हे वसाहतवादी ज्ञान व मुल्ये उच्च शिक्षित भारतीयांच्या मानगुटीवर बसलेली दिसतात. स्वातंत्र्यानंतर आपल्या शिक्षण व्यवस्थेत टप्याटप्याने काही सकारात्मक बदल झाले आहेत. असे असले तरी शिक्षण क्षेत्राविषयी काही बाबी ठळकपणे निदर्शनास येतात. त्या म्हणजे शिक्षणाचा निकृष्ट दर्जा, रॉट लर्निंगवर (घोकंपट्टी) भर, कुशल शिक्षकांची कमतरता, कौशल्य आणि नोकरीतील दरी, संशोधन आणि नवोपक्रमाचा अभाव, पायाभूत सुविधा आणि निधीची कमतरता, प्रवेशातील असमानता, नोकरशाहीचे दडपण, व्यावसायिक मार्गदर्शन व कौशल्य विकासाचा अभाव. याच बरोबर सर्जनशीलता, चिकित्सक विचार आणि ज्ञानाचा व्यावहारिक उपयोग यांचा अभाव दिसतो. एकूणच आपल्या देशात सर्व समावेशक आणि न्याय्य गुणवत्ता पूर्ण शिक्षणाच उद्दिष्ट आजतागायत पूर्णत्वास गेलेले नाही. त्यामुळे शिक्षणातून शाश्वत भविष्यासाठी जागरूक नागरिक घडवण्याची प्रक्रिया अधांतरीच आहे.आज भारतीय उच्च शिक्षण व्यवस्था ही जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी प्रणाली आहे. भारतातील उच्च शिक्षणाचे प्रमाण (Gross Enrolment Ratio - GER) २०२१-२२ नुसार अंदाजे **२७.१% ते २८.४%** च्या दरम्यान आहे हे प्रमाण १८-२३ वयोगटातील विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षण संस्थेतील नावनोंदणी दर्शवते. वार्षिक PLFS अहवालानुसार भारताचा एकूण साक्षरता दर **८०.९%** आहे. यामध्ये पुरुष साक्षरता दर अधिक असून ग्रामीण (७७%) आणि शहरी (९०%) भागात तफावत आहे. भारतातील आणि महाराष्ट्रातील शिक्षणातील गळतीचे प्रमाण (Dropout Rate) चिंताजनक असून, विशेषतः माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावर ते अधिक आहे. दहावीनंतर लाखो विद्यार्थी शिक्षण सोडत असून, आर्थिक दारिद्र्य, रोजगाराची गरज, पायाभूत सुविधांचा अभाव आणि निरस अध्यापन प्रक्रिया ही गळतीची मुख्य कारणे आहेत. या पार्श्वभूमीवर आपले शिक्षण, अभ्यासक्रम, विद्यार्थी आणि विद्यार्थी जीवनावर प्रचंड प्रभाव असलेला आपला समाज यांची चिकित्सा करणे मला महत्त्वाचे वाटते. अभ्यासक्रम, शिक्षण व्यवस्था, विद्यार्थी आणि समाज हे परस्परांशी निगडीत व एकमेकांवर प्रभाव पाडणारे घटक आहेत. एक विद्यार्थी त्याचे शिक्षण पूर्ण करत असताना त्याच्यावर १) अभ्यासक्रमाच्या माध्यमातून होणारे संस्कार, त्याला मिळणारे ज्ञान किंवा त्याची होणारी जडण घडण, २) शैक्षणिक वातावरणातून होणारे संस्कार त्याला मिळणारे ज्ञान किंवा त्याची होणारी जडण घडण, ३) सामाजिक वातावरणातून होणारे संस्कार त्याला मिळणारे ज्ञान किंवा त्याची होणारी जडण घडण यात कोणता घटक किती प्रभावी ठरतो हे पाहणे देखील गरजेचे आहे.

भारतात अभ्यासक्रम किंवा शिक्षणाच्या माध्यमापेक्षा समाज माध्याम हे जास्त प्रभावी आहे. विद्यार्थ्यांच्या जडण घडणीत अभ्यासक्रम किंवा शालेय शिक्षणाचा वाटा हा अल्प स्वरुपाचा असतो. विद्यार्थी जय समाजाचा भाग असतो त्या समाजाकडून तो जास्त शिकत असतो. म्हणून शैक्षणिक क्षेत्रातील माझा अनुभव अस सांगतो की, शिक्षण हा समाजाचा आरसा आहे. समाजाचे विशिष्ट विचार, धारणा, मते, अग्रक्रम, श्रद्धा, रूढी, परंपरा व अन्य सामाजिक घटक यांचे प्रतिबिंब शिक्षण व्यवस्थेमध्ये ठळकपणे उमटलेले दिसून येते. जसा समाज तसा विद्यार्थी हे समीकरण प्रासंगिक वाटते. शिक्षण आणि समाज यांचे संबंध परस्पर पूरक असणे गरजेचे आहे. या संबंधामध्ये विरोधाभास असेल तर त्याचा दोन्ही घटकावर नकारात्मक परिणाम होतो. विद्यार्थी समाजाच्या चांगल्या धारणा प्रमाणेच चुकीच्या किंवा वाईट धारणांचाही वाहक ठरतो. भारतातील सामाजिक वातावरण शैक्षणिक वातावरणापेक्षा आजही जास्त प्रभावी आहे. भारतीय समाजात आजही जातीयता, धर्मांधता, लिंगभेद, पुरुषप्रधानता, अंधश्रद्धा, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव, मानवाधिकार उल्लंघन, आर्थिक विषमता, इ. मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात आहेत. साहजिकच आपला अभ्यासक्रम, शिक्षक, शिक्षण संस्था हे ही या प्रभावापासून मुक्त नाहीत. त्यामुळे याचा नकारात्मक परिणाम इथल्या शैक्षणिक वातावरणावर झालेला आहे. अर्थातच या वातावरणाचा नकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांच्या एकूण जडण घडणीवर होत आहे. त्यामुळे शिक्षणातून येणार शहाणपण, वैज्ञानिक दृष्टीकोन, समता, मानवाधिकार इ. किंवा आधुनिक मुल्ये विद्यार्थ्यांच्या अंगी येत नाहीत. त्यामुळे सामाजिक परिस्थितीत सुधारणा न करता शिक्षणातून शाश्वत विकास साधने हा दुराग्रह आहे.भारतात सर्व समावेशक आणि न्याय्य गुणवत्ता पूर्ण शिक्षणाचा मार्ग महात्मा ज्योतीबा फुले, राजर्षि शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दाखवला होता. समाजातील सर्व घटकांना गुणवत्ता पूर्ण, विज्ञाननिष्ठ, व्यावसायिक शिक्षणाची गरज त्यांनी व्यक्त केली होती. शिक्षणामुळे चांगले काय वाईट काय हे विद्यार्थ्यांना समजणे त्यांनी महत्त्वाचे मानले. त्यांनी एकाच वेळी शैक्षणिक सुधारणा आणि सामाजिक सुधारणा यांचा पुरस्कार केला होता. त्यांनी समाज परिवर्तनाचे माध्यम म्हणून शिक्षणाचा विचार केलेला होता. समाजात आणि पर्यायाने शैक्षणिक व्यवस्थेत आधुनिक मुल्ये रुजविली जावीत म्हणजे आपण शाश्वत विकासाकडे अधिक जोरदारपणे मार्गक्रमण करू शकतो.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

Original Article

शिरूर तहसीलचा (पुणे जिल्हा) एम. आय. डी. सी. स्थापनेमुळे वाढ आणि विकासाशी संबंधित सामाजिक घटक आणि पायाभूत सुविधांची पार्श्वभूमी: एक भौगोलिक अभ्यास.

Shantaram D. Kokate[1], Dr. N.K.Waghmare[2]
[1]Nowrosjee Wadia college pune,
[2] Professor, I. G. College, Cidco, Nanded, Dept. of Geography, Nanded
Email- sdkokate@nowrosjeewadiacollege.edu.in

Manuscript ID:
JRD -2026-180321
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 3(IV)
Pp.90-97
March- 2026
Submitted: 15 Feb. 2026
Revised: 25 Feb. 2026
Accepted: 10 Mar. 2026
Published: 31 Mar. 2026

सारांश

पुणे जिल्ह्यातील शिरूर तहसीलमध्ये औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ – MIDC) मार्फत औद्योगिक क्षेत्राची स्थापना करण्यात आली. या एम.आय.डी.सी. स्थापनेमुळे परिसराच्या आर्थिक, सामाजिक आणि भौगोलिक रचनेत महत्त्वपूर्ण बदल घडून आले. प्रस्तुत अभ्यासात शिरूर तहसीलमधील औद्योगिक विकासाच्या पार्श्वभूमीवर लोकसंख्या वाढ, स्थलांतर, रोजगारनिर्मिती, नागरीकरण, शिक्षण व आरोग्य सुविधा, वाहतूक व्यवस्था तसेच मूलभूत पायाभूत सुविधांच्या विकासाचा भौगोलिक दृष्टिकोनातून अभ्यास करण्यात आला आहे.औद्योगिक क्षेत्राच्या स्थापनेनंतर स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्याने ग्रामीण ते नागरी स्थलांतर वाढले असून लोकसंख्येची घनता आणि वस्तीचे स्वरूप बदलले आहे. औद्योगिक विकासामुळे रस्ते, वीजपुरवठा, पाणीपुरवठा, दळणवळण साधने, शिक्षण संस्था आणि आरोग्य सुविधा यामध्ये लक्षणीय सुधारणा झालेली दिसून येते. त्याचबरोबर सामाजिक जीवनमान, उत्पन्न पातळी आणि जीवनशैलीत सकारात्मक बदल झाले असले तरी पर्यावरणीय ताण, नागरी विस्तार आणि संसाधनांवरील दबाव यांसारखी आव्हानेही निर्माण झाली आहेत.या अभ्यासातून औद्योगिकीकरणामुळे शिरूर तहसीलमध्ये सामाजिक घटक आणि पायाभूत सुविधांचा विकास कसा घडून आला याचे भौगोलिक विश्लेषण सादर करण्यात आले असून संतुलित आणि शाश्वत प्रादेशिक विकासासाठी नियोजनाची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे.

मुख्यशब्द- एम.आय.डी.सी., लोकसंख्या शास्त्रीय, सामाजिक, आर्थिक घटक, औद्योगिक पट्टा.

प्रस्तावना

हा संशोधन लेख अभ्यास क्षेत्रातील औद्योगिकरणामुळे वाढ आणि विकासावर MIDC स्थापनेसाठी सांस्कृतिक आणि पायाभूत घटक महत्वपूर्ण भूमिका अदा करतात. सध्याच्या तपासात गावपातळीवरील अर्थव्यवस्था समजून सामाजिक आर्थिक घटकांशी उद्योग धंद्यांचा वाढ आणि विकास कसा झालेला आहे.त्या अभ्यासांतर्गत लोकसंख्याशास्त्रीय रचनेसह सामाजिक आर्थिक घटकांचा अभ्यास केला गेला आहे. एका विशिष्ट वेळी राजकीय किंवा भौगोलिक क्षेत्रातील एकूण लोकसंख्येला लोकसंख्या म्हणतात. शिरूर हे महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यात वसलेले असून 2011 मध्ये तालुक्याची लोकसंख्या 385,414 होती. 2011 च्या जनगणनेनुसार तालुक्याची लोकसंख्या घनता 247 व्यक्ती / km^2 इतकी होती. शिरूर तालुक्यातील रांजणगाव एमआयडीसी फेज 1 आणि 2 ने सुमारे 2285 एकर क्षेत्र व्यापलेले आहे. औद्योगिक विकासामुळे विशेषत: पुणे-अहमदनगर महामार्गालगत असलेल्या रांजणगाव, कारेगाव, शिक्रापूर, सणसवाडी आणि कोरेगाव भीमा यांसारख्या गावांतील लोकसंख्येची रचना बदलताना दिसत आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
Shantaram D. Kokate, Nowrosjee Wadia college pune.

How to cite this article:
Kokate, S. D., & Waghmare, N. K. (2026). शिरूर तहसीलचा (पुणे जिल्हा) एम. आय. डी. सी. स्थापनेमुळे वाढ आणि विकासाशी संबंधित सामाजिक घटक आणि पायाभूत सुविधांची पार्श्वभूमी: एक भौगोलिक अभ्यास. Journal of research & development, 18(3(IV)), 90–97. https://doi.org/10.5281/zenodo.20744929

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.20744929
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

शहरी भागात सरासरी साक्षरता दर 86.5 % आहे तर ग्रामीण भागात 81.6 % आहे.या क्षेत्रात MIDC स्थापन होण्यासाठी सरकारी धोरण, जलसाठा, पाणी पुरवठा, कोरडवाहू बिगरशेत जमीन अथवा मुरमाड पडजमीन, उद्योगासाठी माळरानावरील सपाट जागा, इ.कारणांनी उद्योग स्थापनेस प्रोत्साहित केले. सामाजिक कारणे लोकसंख्या वाढ, घनता, मजूर पुरवठा, मुख्य शहरापासून औद्योगिक क्षेत्राचे फक्त 30 किमी अंतर, तांबडी हलक्या पोतची मुरमाड जमीन औद्योगिक स्थान निश्चितीसाठी मिळाली. अनुकूल प्रभाव म्हणजेच या क्षेत्राचा विकास झाला आहे. पुणे- शिरूर- नगर या राज्य रस्त्यामुळे उत्तम वाहतूक सुविधा या औद्योगिक पट्ट्याला उपलब्ध होऊन दळणवळण सुकर झाले त्यामुळे नागरीकरण झपाट्याने वाढत गेले.उद्योगांसाठी पाण्याची गरज पूर्ण करण्यासाठी एमआयडीसीने स्वतंत्र यंत्रणा उभारली आहे. घोड धरणातून औद्योगिक क्षेत्राला मुख्यत्वे पाणीपुरवठा केला जातो. घोड धरण ते रांजणगाव MIDC पर्यंत पाईप लाईन ने पाणी आणलेले आहे.येथील रस्ते कनेक्टिव्हिटी विस्तारलेली असून महत्त्वाचे राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग आणि ग्रामीण रस्ते तहसीलमधून जातात.उदा. पुणे-अहमदनगर महामार्ग (SH 27). भीमा कोरेगाव, सणसवाडी, शिक्रापूर, रांजणगाव, कारेगाव, शिरूर शहर याच महामार्गावर येतात.तालुका हा औद्योगिक (MIDC) आणि कृषी क्षेत्रात मोठा असल्यामुळे येथे वीज वितरणाचे मोठे जाळे आहे. शिरूरमधील वीज पुरवठा प्रामुख्याने MSETCL (महापारेषण - उच्च दाब) आणि MSEDCL (महावितरण) द्वारे नियंत्रित केला जातो.

Hypothesis गृहितक - "शिरूर तहसीलमध्ये MIDC स्थापनेमुळे वाढ व विकास झालेला आहे.

संशोधनाची उद्दीष्टये: (Objectives of study) - शिरुरमधील MIDC च्या स्थापनेमुळे झालेल्या वाढ व विकासास सामाजिक आणि पायाभूत सुविधांची पार्श्वभूमी.

- **सांखिकी आणि संशोधन तंत्र –**

संशोधन पद्धत		
↓		
उपग्रह प्रतिमा	→	मुलाखत
		↓
सर्वेक्षण	→	माहिती संकलन
		↓
GIS सोफ्टवेअर	→	संपादन
		↓
		विश्लेषण

अभ्यास क्षेत्राचे स्थान: (Location Of The Study Area) **नकाशा क्र.**1: **स्थान नकाशा** Location



स्त्रोत: Google earth, Arcgis software संशोधकाने गणना केलेले.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

शिरूर महाराष्ट्र राज्याच्या पुणे जिल्ह्याचा प्रशासकीय उपविभाग आहे. एमआयडीसी हि कोरेगाव भीमा, सणसवाडी, शिक्रापूर, रांजणगाव, कारेगाव या क्षेत्रात स्थापन झालेली असून अनेक लोकप्रिय उत्पादक कंपन्या येथे स्थापन होत आहेत. सणसवाडी हे गाव पुणे शहराच्या पूर्वेस सुमारे 30 कि.मी. अंतरावर आहे. रांजणगाव हे गाव पुण्यापासून 50 कि.मी. अंतरावर आहे. कारेगाव हे गाव रांजणगावच्या पूर्वेस असून तहसिल मुख्यालयापासून 10 कि.मी. अंतरावर आहे. पुणे - अहमदनगर महामार्गावर हा औद्योगिक पट्टा निर्माण होत आहे. रांजणगाव- कारेगाव मधील एमआयडीसी हे प्रमुख औद्योगिक क्षेत्र असून तेथे एलजी, व्हर्लपूल, कॅरारो, फियाट, बॉम्बे डाइंग, मॅकफेरी, बीकाएर्ट इत्यादी अनेक उत्पादक कंपन्या आहेत. तहसीलचे एकूण क्षेत्रफळ 1560 चौ. किमी असून, त्यात 1517.36 चौ.कि.मी. ग्रामीण भाग आणि 42.90 चौ. कि.मी शहरी भाग आहे. **18°49' N ते 19°14' N अक्षांश** आणि **74°22' E ते 75°30' E रेखांशांपर्यंत** तहसीलचा विस्तार आहे. तहसील चे मुख्यालय शिरूर चे अंतर पुणे जिल्ह्यापासून 65 किमी अंतरावर असून, ते घोड नदीच्या उजव्या तीरावर वसलेले आहे. घोड नदी तहसीलची ईशान्य आणि पूर्व सीमा तयार करते. कुकडी नदी तहसीलची पूर्व सीमा बनवते. भीमा नदीने तहसीलची दक्षिण नैऋत्य सीमा तयार केली आहे. (नकाशा क्र.1)

- **सामाजिक - आर्थिक घटक -** लोकसंख्या वाढ, वितरण, घनता, लिंग गुणोत्तर, साक्षरता, जमीन धारण क्षेत्र, व्यावसायिक रचना आणि अभ्यास क्षेत्राचे रस्ते जाळे यासारख्या निर्धारकांच्या मदतीने सध्याच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.
- **लोकसंख्या घनता -** Population Density of Tehsil and District:

लोकसंख्येची घनता हा शब्द 1837 मध्ये हेन्रीने रेल्वे नकाशे तयार करताना वापरला होता (बरकडे, 2011). या अभ्यास क्षेत्रातील उपलब्ध मनुष्यबळ संसाधने समजून घेण्यासाठी लोकसंख्याशास्त्रीय वैशिष्ट्यांचा अभ्यास उपयुक्त आहे. सध्याच्या तपासात, तहसीलमध्ये उपलब्ध मानवी संसाधनाच्या संदर्भात मानवी शक्तीचे योग्य मूल्यांकन करणे आवश्यक आहे.घनता म्हणजे क्षेत्रफळ आणि लोकसंख्या यांच्यातील गुणोत्तर, जे सामान्यतः प्रति युनिट क्षेत्रफळातील व्यक्तींच्या संख्येच्या संदर्भात व्यक्त केले जाते. शिरूर तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ 1560.26 चौ.किमी आहे. अनेक बाबतीत महाराष्ट्र राज्यातील प्रगतीशील जिल्हा म्हणून (पुणे) वर्गीकृत असलेल्या 2011 च्या जनगणनेनुसार तालुक्याची लोकसंख्या घनता 247 व्यक्ती / km^2 इतकी होती. 2001मध्ये भौगोलिक घनता 199 व्यक्ती/ km^2 होती. शिरूर तालुक्यातील रांजणगाव एमआयडीसी फेज 1 आणि 2 ने सुमारे 2285 एकर क्षेत्र व्यापलेले आहे. औद्योगिक विकासामुळे विशेषत: पुणे-अहमदनगर महामार्गालगत असलेल्या रांजणगाव, कारेगाव, शिक्रापूर, सणसवाडी आणि कोरेगाव भीमा यांसारख्या गावांतील लोकसंख्येची रचना बदलताना दिसत आहे.

तक्ता क्र.1 : जिल्हा आणि तालुक्याची लोकसंख्या घनता.

अ.न.	वर्ष	जिल्हा लोकसंख्या	घनता	तालुका लोकसंख्या	घनता
1	1961	2466880	158	132471	84
2	1971	3178029	203	150000	96
3	1981	4164470	266	182835	117
4	1991	5535532	354	238609	152
5	2001	7232000	462	310590	199
6	2011	9429408	603	385414	247
7	2021 projected	11491000	734	469818	301

Source: District Census Handbook, Pune District.1951-2011.

आकृती क्र.1: जिल्हा आणि तालुक्याची लोकसंख्या घनता

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026



शिरूर तालुक्याची लोकसंख्या घनता 1961 पासून 2011 पर्यंत वाढताना दिसत आहे. जिल्ह्याची घनता ही तालुक्याच्या घनतेपेक्षा जास्त आहे. (तक्ता क्र.1., आकृती क्र.1

)नकाशा क्र.2: लोकसंख्या घनता नकाशा



स्त्रोत: भारतीय (जिल्हा)जनगणना रिपोर्ट 2011.

तहसील भागातील लोकसंख्येचे वितरण असमान आहे. औद्योगिकीकरण आणि शहरीकरणाच्या प्रभावामुळे पुणे-अहमदनगर मार्गालगत लोकसंख्या घनता जास्त आहे. भीमा आणि घोड नदीच्या काठावर लोकसंख्या अधिक आहे. शिरूर हे एकमेव शहरी केंद्र भीमेची उपनदी घोडच्या काठावर वसलेले आहे. याव्यतिरिक्त भीमा कोरेगाव, सणसवाडी आणि शिक्रापूर रांजणगाव आणि कारेगाव इ. शहरी केंद्रे औद्योगिक पट्ट्याला लागून उदयास येत आहेत.

2011 च्या जनगणनेनुसार पुणे जिल्ह्यातील लोकसंख्येची घनता 603 व्यक्ती प्रति किमी ^{2} आहे. तर शिरूर तालुक्याची घनता हि 247/कि.मी.^{2} आहे. घनतेनुसार तालुक्यातील गावांचे वितरण असे दर्शवते की 16 ते 259 च्या श्रेणीतील कमी घनता असलेली 70 % गावे आहेत, याच श्रेणीमध्ये सर्वाधिक गावे आहेत. >1865 श्रेणीची घनता असलेले शहरी केंद्रे आहेत. यावरून असे दिसते की कमी घनता असलेल्या गावांची संख्या जास्त आहे.(नकाशा क्र.2.)

- **साक्षरता –**

जनगणनेच्या परिभाषेनुसार, साक्षर व्यक्ती अशी व्यक्ती म्हणून परिभाषित केली जाते जी कोणत्याही भाषेत वाचू आणि लिहू शकते आणि काही प्रमाणात समजू शकते. शहरी भागात सरासरी साक्षरता दर 86.5 % आहे तर ग्रामीण भागात 81.6 % आहे. शिरूर तालुक्याचा साक्षरता दर 82.37% असून त्यापैकी 77.56% पुरुष साक्षर आणि 66.21% महिला साक्षर आहेत. साक्षरता दरानुसार वर्गवारी कमी (54.35 ते 60.88), मध्यम (60.89 ते 67.41), चांगली (67.42 ते 73.93), आणि अत्युत्तम (73.94 ते 80.46) असे 4 विभाग केलेले आहेत. तालुक्याच्या उत्तर आणि उ.पश्चिम भागात साक्षरता चांगली आहे.उत्तर पूर्व आणि द.पश्चिम भागात जेथे नकाशात फिकट हिरवा

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

रंग आहे तेथे साक्षरता मध्यम आहे. तुलनेने या भागात शैक्षणिक प्रगतीची गरज आहे. तर द.पश्चिम भागात ते शिरूर नगर रस्त्यालगतच्या गावात अत्युत्तम साक्षरता आहे. उद्योगधंदे, MIDC स्थापना, शिक्षणसुविधा, रोजगारसंधी ते नोकरी शहरीकरण, वाहतूक यामुळे या भागात साक्षरता अत्युत्तम असल्याचे दिसून येते, जो भाग लाल रंगाने दर्शविलेला आहे. तालुक्याच्या द.पूर्व भागात साधारणत: मध्यम ते कमी साक्षरता आहे.(नकाशा क्र. 3.)

नकाशा क्र. 3 : साक्षरता नकाशा



स्त्रोत- जिल्हा जनगणना पुस्तिका 2011.

- **पायाभूत सुविधा-** मुगडे, जी. यू. डी. एन.(2022) महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांच्या विकासाचे भू-स्थानिक परीक्षण: एक सर्वंकष विश्लेषण या संशोधन पत्रिकेत ते उल्लेख करतात कि पायाभूत सुविधा म्हणजे समाज किंवा उद्योगाच्या कामकाजासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत भौतिक आणि संघटनात्मक संरचना, किंवा अर्थव्यवस्थेच्या कार्यासाठी आवश्यक असलेल्या सेवा आणि सुविधा. ही संज्ञा सामान्यतः समाजाला आधार देणाऱ्या तांत्रिक संरचनांना सूचित करते, जसे की रस्ते, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था, वीज वितरण जाळे, दूरसंचार इत्यादी. पायाभूत सुविधा ऊर्जा,वाहतूक दळणवळण,उद्योगासाठी उपलब्ध जमीन,पाणीपुरवठा, व्यापार, बँकिंग, विमा, इंटरनेट, पोस्ट, शिक्षण, आरोग्य, पेयजल, सामाजिक सेवा, स्वच्छता या सर्व सुविधांना पायाभूत सुविधा असे म्हणतात.

पायाभूत सुविधा खालीलप्रमाणे-

पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील रांजणगाव एमआयडीसी ही राज्यातील एक महत्त्वाची औद्योगिक वसाहत आहे. या ठिकाणी एमआयडीसीच्या स्थापनेसाठी आणि विकासासाठी पुढील महत्त्वाच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

- **पाणीपुरवठा (Water Supply)-** उद्योगांसाठी पाण्याची गरज पूर्ण करण्यासाठी एमआयडीसीने स्वतंत्र यंत्रणा उभारली आहे. घोड धरणातून औद्योगिक क्षेत्राला मुख्यत्वे पाणीपुरवठा केला जातो. घोड धरण ते रांजणगाव MIDC पर्यंत पाईप लाईन ने पाणी आणलेले आहे. एमआयडीसीने 15 कोटी रुपये खर्च करून पाणीपुरवठा योजना बांधली आहे. घोड नदीवरील चिंचणी धरणातून ही योजना येते आणि पहिल्या टप्प्यात 13.8 दशलक्ष लिटर पाणीपुरवठा करते. MIDC प्रकल्पात 27.6 दशलक्ष लिटर क्षमतेच्या जागतिक आरोग्य संघटनेच्या मानक जलशुद्धीकरण केंद्रात पाणी शुद्ध केले जाते. यामुळे 24 तास पाणीपुरवठा सुनिश्चित होतो.

❖ **घोड (चिंचणी) धरण -**

पुणे जिल्ह्यातील शिरूर आणि अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्याच्या सीमेवर असलेल्या घोड धरणाबद्दलची माहिती- घोड धरण हे घोड नदीवर चिंचणी येथे बांधलेले आहे. घोड नदी ही भीमा नदीची प्रमुख उपनदी आहे. हे धरण प्रामुख्याने सिंचनासाठी आणि औद्योगिक गरजा पूर्ण करण्यासाठी वापरले जाते. हे धरण प्रामुख्याने मातीचा भराव आणि दगडी बांधकाम अशा संमिश्र स्वरूपाचे आहे. घोड धरणाच्या विशाल जलाशयाला स्थानिक स्तरावर 'चिंचणी जलाशय' म्हणूनही ओळखले जाते. या धरणाची एकूण साठवण क्षमता 7.64 TMC आहे. उपयुक्त साठवण 5.47 TMC आहे. इंडिया टोबॅको डिव्हिजन प्लांट (आयटीडी) महाराष्ट्र राज्यातील पुणे जिल्ह्यातील

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

शिरूर तालुक्यातील एमआयडीसी रांजणगाव येथे आहे. आयटीसी टोबॅको युनिटचे क्षेत्रफळ 34 एकर आहे. ज्या भौगोलिक ठिकाणाहून आयटीसी (Imperial Tobacoo Company of India Limited) कारखाना एमआयडीसीद्वारे पाणी प्राप्त करतो. तेथून एमआयडीसीमध्ये प्रक्रिया केल्यानंतर सर्व कंपन्यांना पाणी मिळते. या योजनेतील पहिल्या टप्प्यात 13.8 एमएलडी (Megalitres per day) पाणी पुरवते. एमआयडीसीमधील 27.6 एमएलडी क्षमतेच्या जलशुद्धीकरण प्रकल्पात हे पाणी शुद्ध केले जाते आणि आयटीसी फूड्स कारखान्यासह एमआयडीसीमधील उद्योगांना पुरवले जाते. आयटीसी कारखान्याच्या 10 किमी त्रिज्येतील 41 गावे प्राथमिक क्षेत्र म्हणून मानली जातात आणि त्या प्राथमिक क्षेत्रामध्ये 60249 हेक्टर क्षेत्र आहे जिथे आयटीसी पाणी, स्वच्छता (निर्जंतुकीकरण) आणि स्वच्छता (वॉश) (आरोग्यासाठी) आणि जल व्यवस्थापन उपक्रमांवर लक्ष केंद्रित करत आहे.(नकाशा क्र. 4.)

नकाशा क्र. 4: पायाभूत सुविधा



स्रोत : जिल्हा संशोधन नकाशा आणि संशोधकाने तयार केलेला

- **वाहतूक – दळणवळण- कनेक्टिव्हिटी (Connectivity)**
- पुणे-अहमदनगर महामार्ग- MIDC चा भाग थेट पुणे-नगर राज्य महामार्गाला लागून असल्याने मालाची वाहतूक करणे सोपे होते.
- रेल्वे स्टेशन- जवळचे रेल्वे स्टेशन 'पुणे' आणि 'दौंड' आहे, जेथून देशभर कनेक्टिव्हिटी मिळते.
- एअर पोर्ट- लोहगाव (पुणे) विमानतळ औद्योगिक काशेतापासून साधारण ५० किमी अंतराच्या आहे.

i. रस्ते वाहतूक (रस्ते कनेक्टिव्हिटी) -

पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुका हा औद्योगिक आणि कृषी क्षेत्राच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याने, येथील रस्ते कनेक्टिव्हिटी विस्तारलेली आहे. या तालुक्यातून महत्त्वाचे राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग आणि ग्रामीण रस्ते जातात.

शिरूर तालुक्यातील रस्ते कनेक्टिव्हिटीचे मुख्य टप्पे खालीलप्रमाणे आहेत:

a. प्रमुख राष्ट्रीय आणि राज्य महामार्ग-

शिरूर हे प्रामुख्याने पुणे-नगर रस्त्यावर वसलेले असल्याने या भागातील रस्ते अतिशय वर्दळीचे आहेत.

- पुणे-अहमदनगर महामार्ग (NH-753L/State Highway 27): हा तालुक्यातून जाणारा सर्वात महत्त्वाचा रस्ता आहे. पुणे, भीमा कोरेगाव, सणसवाडी, शिक्रापूर, रांजणगाव, कारेगाव, शिरूर शहर आणि अहमदनगर याच महामार्गावर येतात.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

ii. औद्योगिक कनेक्टिव्हिटी (Industrial Corridors)

शिरूर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर औद्योगिकरण झाल्यामुळे अंतर्गत कनेक्टिव्हिटीवर विशेष भर देण्यात आला आहे. रांजणगाव हे पंचतारांकित औद्योगिक क्षेत्र असल्याने येथील रस्ते रुंद आणि अवजड वाहतुकीसाठी सक्षम बनवण्यात आले आहेत.

- शिक्रापूर-चाकण रस्ता: हा रस्ता शिरूरला चाकणच्या ऑटोमोबाईल हबशी जोडतो. रांजणगाव MIDC मधील मालवाहतुकीसाठी हा मार्ग महत्त्वाचा आहे.

iii. तालुक्यांतर्गत आणि शेजारील तालुक्यांशी जोडणी

- शिरूर-पाबळ-खेड: हा मार्ग खेड (राजगुरुनगर) तालुक्याशी संपर्क साधण्यासाठी वापरला जातो.
- शिरूर-श्रीगोंदा रस्ता: घोडनदी ओलांडून अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्याला जोडणारा हा महत्त्वाचा मार्ग आहे.
- ग्रामीण रस्ते: तालुक्यातून भीमा आणि घोड नद्या वाहत असल्याने नद्यांवरील पुलांमुळे शिरूर-हवेली आणि शिरूर-दौंड यांमधील कनेक्टिव्हिटी सुधारली आहे.
- शिरूर-पाबळ, शिरूर-न्हावरे रस्ता.(नकाशा क्र. 4.)
- **वीज पुरवठा-**

पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुका हा औद्योगिक (MIDC) आणि कृषी क्षेत्रात मोठा असल्यामुळे येथे वीज वितरणाचे मोठे जाळे आहे. शिरूरमधील वीज पुरवठा प्रामुख्याने MSETCL (महापारेषण - उच्च दाब) आणि MSEDCL (महावितरण) द्वारे नियंत्रित केला जातो.

i. मुख्य उच्च दाब उपकेंद्रे (MSETCL - 220/132 KV)

शिक्रापूर 220 केव्ही सबस्टेशन- हे तालुक्यातील सर्वात महत्त्वाचे केंद्र आहे, जे चाकण आणि शिक्रापूर पट्ट्यातील उद्योगांना वीज पुरवते.

कारेगाव 220 केव्ही सबस्टेशन- रांजणगाव MIDC मधील कंपन्यांसाठी हे मुख्य केंद्र आहे.

1. एमआयडीसी आणि एमएसईबीने स्थापन केलेले 220 के.व्ही. सबस्टेशन, परिसरात व्होल्टेज चढ-उतारांशिवाय वीजपुरवठा करते. या अतिरिक्त उच्च व्होल्टेज सबस्टेशनची एकूण क्षमता 150 एम.व्ही.ए. आहे. यामुळे ग्राहकांना 22 के.व्ही. / 132 के.व्ही. तसेच कमी दाबाच्या ग्राहकांना आवश्यक असलेली वीज उपलब्ध होण्यास मदत झाली आहे.
2. रांजणगाव प्रोजेक्ट - 1. सौर ऊर्जा प्रकल्प - एमईपीएल रांजणगाव सुविधेने 703 किलोवॅट क्षमतेच्या रूफटॉप सोलर पॉवर प्लांटची यशस्वीरित्या स्थापना आणि कार्यान्वितता केली आहे. 12.7 टन/दिवसाने कार्बन डायऑक्साइड कमी करून निव्वळ शून्य उत्सर्जनाच्या ईएसजी उद्दिष्टाकडे सुसंगत सुविधा करण्यासाठी एमईपीएलच्या व्यवस्थापनाने हा उपक्रम हाती घेतला आहे.

7.सारांश resume:

हे प्रकरण अभ्यास क्षेत्राच्या प्राकृतिक आणि आर्थिक सामाजिक घटकांशी संबंधित आहे. या क्षेत्रात MIDC स्थापन होण्यासाठी सरकारी धोरण, स्थान, उद्योगासाठी अनुकूल जागा, अनुकूल हवामान, पर्जन्य, पर्जन्य,नदीप्रणाली, जलसाठा, पाणी पुरवठा, कोरडवाहू बिगरशेत जमीन अथवा मुरमाड पडजमीन, उद्योगासाठी माळरानावरील सपाट जागा, इ. भौतिक कारणांनी उद्योग स्थापनेस प्रोत्साहित केले. सामाजिक कारणे लोकसंख्या वाढ, घनता, कुशल अर्धकुशल मजूर पुरवठा, मुख्य शहरापासून औद्योगिक क्षेत्राचे फक्त 30 किमी अंतर, तांबडी हलक्या पोतची मुरमाड जमीन औद्योगिक स्थान निश्चितीसाठी मिळाली त्यामुळे शेती क्षेत्रावर याचा प्रतिकूल परिणाम झाला नाही, उद्योग स्थापन झाल्यानंतर सामाजिक आर्थिक प्रभाव या क्षेत्रावर झालेला दिसून आला. अनुकूल प्रभाव म्हणजेच या क्षेत्राचा विकास झाला आहे तर प्रतिकूल प्रभाव लोकसंख्या वाढीमुळे औद्योगिक पट्ट्या लगत च्या गावांमध्ये नागरीकरण होऊन पायाभूत सुविधांवर ताण पडू लागला आहे.त्यामुळे

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

प्रामुख्याने औद्योगिक क्षेत्रालगत काही समस्या उद्भवल्या आहेत. पुणे- शिरूर- नगर या राज्य रस्त्यामुळे उत्तम वाहतूक सुविधा या औद्योगिक पट्ट्याला उपलब्ध होऊन दळणवळण सुकर झाले त्यामुळे नागरीकरण झपाट्याने वाढत गेले.

सदर्भ

1. Aher A, More J. E. and Musmade.A.H (2008): "Impact of Irrigation on crop diversification in Ahmadnagar District (Maharashtra) Maharashtra Bhugol Shasra Sanshodhan Patrika, Maharashtra Bhugol shasra Parishad, VoI.XXIV, No.2, July-Dec - PP-60-67
2. Aktar, N., (2013), "Correlation between literacy and sex ratio in West Bengal: A Geographical Analysis", Review of Research, Vol. 2, Iss. 4, ISSN: 2249-894X.
3. Bhagat, Vijay (2002): "Utility Status and Trend of Groundwater in The Purandhar Tahsil, District of Pune, Maharashtra", Uttar Pradesh Geographical Journal, Kanpur, Pp; 8-17.
4. Chandana, R. C., (2000), "A Geography of Population", Kalyani Publishers, Ludhiana, Pp. 46.
5. Chandna, R.C., (2003), "Geography of Population", Kalyani Publisher, Ludhiana, Pp. 43-89.
6. Cinta At., et al., (2016), "Overview of Socio-Economic Status Scales in India" International Journal of Innovative Research in Dental Sciences Vol. 1, Iss. 2, Pp. 30-37.
7. Dave, M., (1991), "Urban Ecology and Level of Urban Development", Rawat Publications, Pp. 31-47.
8. Dhotre J. B. (2022), Geographical assessment of rural development in Shirur tehsil of pune district, Maharashtra.
9. Godase, J. M., (2014), "Literacy and Sex Ratio in Satara District (Maharashtra)", Research Front, Vol. 2, Iss.1, Pp. 29-34.
10. More J. C. (2008): "The Sustainable Agricultural Development in The Karmala Tahsil of Solapur District (M.S.)", Unpublished Ph.D. Thesis 2008.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

Original Article

ग्रामीण भागातील उच्च शिक्षण आणि शाश्वत विकास

प्रा. शाम लक्ष्मण सातर्ले
कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, भिगवण
Email-shamsararle@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180322
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 3(IV)
Pp. 98-102
March- 2026
Submitted: 15 Feb. 2026
Revised: 25 Feb. 2026
Accepted: 10 Mar. 2026
Published: 31 Mar. 2026

सारांश :

ग्रामीण भागातील उच्च शिक्षण हा शाश्वत विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. या संशोधन पेपरमध्ये ग्रामीण भागातील उच्च शिक्षणाची सद्यस्थिती, त्यातील अडचणी, संधी आणि शाश्वत विकासाशी असलेला संबंध यांचा अभ्यास करण्यात आला आहे. शिक्षणाच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय विकास कसा साधता येतो यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

प्रस्तावना

भारत हा प्रामुख्याने ग्रामीण लोकसंख्येचा देश आहे. ग्रामीण भागातील विकास हा देशाच्या एकूण विकासासाठी अत्यावश्यक आहे. उच्च शिक्षण हे केवळ ज्ञान देणारे माध्यम नसून ते व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे आहे. शाश्वत विकास म्हणजे असा विकास जो वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यकालीन पिढ्यांच्या गरजांवर परिणाम करत नाही.

संशोधनाची उद्दिष्टे

1. ग्रामीण भागातील उच्च शिक्षणाची स्थिती अभ्यासणे
2. उच्च शिक्षणाचा शाश्वत विकासावर होणारा परिणाम समजून घेणे
3. ग्रामीण भागातील शिक्षणातील अडचणी ओळखणे
4. सुधारणा उपाय सुचवणे

संशोधन पद्धती

या संशोधनासाठी द्वितीयक माहितीचा वापर करण्यात आला आहे. विविध सरकारी अहवाल, संशोधन लेख, पुस्तके आणि इंटरनेट स्त्रोतांचा अभ्यास करण्यात आला.

ग्रामीण भागातील उच्च शिक्षणाची सद्यस्थिती ग्रामीण भागात शिक्षणाच्या सुविधा शहरांच्या तुलनेत कमी आहेत. अनेक ठिकाणी महाविद्यालये, ग्रंथालये आणि डिजिटल सुविधा उपलब्ध नाहीत. विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींमुळे शिक्षण पूर्ण करता येत नाही.

शाश्वत विकासाची संकल्पना शाश्वत विकास (Sustainable Development) म्हणजे असा विकास जो आजच्या पिढीच्या गरजा पूर्ण करतो, पण भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम करत नाही. शाश्वत विकासाची मूळ संकल्पना ही संकल्पना सर्वप्रथम World Commission on Environment and Development (ब्रुंटलँड आयोग) यांच्या अहवालात (1987) मांडली गेली. त्यानुसार: "विकास असा असावा की वर्तमान गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजा धोक्यात येऊ नयेत."

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
प्रा. शाम लक्ष्मण सातर्ले कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, भिगवण .

How to cite this article:
सातर्ले, . शाम . लक्ष्मण . (2026). ग्रामीण भागातील उच्च शिक्षण आणि शाश्वत विकास. Journal of research & development, 18(3(IV)), 98–102. https://doi.org/10.5281/zenodo.20745029

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.20745029
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

शाश्वत विकास (Sustainable Development) **म्हणजे असा विकास जो आजच्या पिढीच्या गरजा पूर्ण करतो**, **पण भविष्यातील**

शाश्वत विकासात तीन मुख्य घटक असतात: शाश्वत विकास ही आधुनिक काळातील अत्यंत महत्त्वाची संकल्पना आहे. वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण आणि नैसर्गिक संसाधनांचा अतिरेक वापर यामुळे पर्यावरणावर मोठा ताण निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत विकास करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांचा विचार करणे आवश्यक झाले आहे. म्हणूनच शाश्वत विकास ही संकल्पना उदयास आली. ही संकल्पना सर्वप्रथम World Commission on Environment and Development यांनी मांडली. त्यांच्या मते, "वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम होऊ नये," असा विकास म्हणजे शाश्वत विकास होय.आर्थिक विकास, सामाजिक विकास आणि पर्यावरणीय संरक्षण. हे तिन्ही घटक एकमेकांशी संबंधित असून त्यांचा समतोल राखणे अत्यावश्यक आहे.

1. आर्थिक विकास:- हा शाश्वत विकासाचा महत्त्वाचा आधार आहे. आर्थिक विकासामुळे देशाची प्रगती होते, रोजगाराच्या संधी वाढतात आणि लोकांचे उत्पन्न वाढते. उद्योग, शेती आणि सेवा क्षेत्राचा विकास केल्याने देशाची अर्थव्यवस्था मजबूत होते. मात्र, हा विकास करताना नैसर्गिक संसाधनांचा अतिरेक वापर टाळणे गरजेचे आहे. संसाधनांचा कार्यक्षम आणि योग्य वापर करून दीर्घकालीन आर्थिक स्थैर्य साधणे हेच खरे शाश्वत आर्थिक विकासाचे उद्दिष्ट आहे.

2. सामाजिक विकास:- समाजातील सर्व घटकांचे जीवनमान सुधारण्यासाठी शिक्षण, आरोग्य, स्वच्छता आणि समान संधी आवश्यक असतात. स्त्री-पुरुष समानता, गरिबी निर्मूलन आणि सामाजिक न्याय यांवर भर देणे हे सामाजिक विकासाचे मुख्य उद्दिष्ट आहे. जर विकासाचा फायदा केवळ काही लोकांपुरता मर्यादित राहिला, तर तो शाश्वत ठरत नाही. त्यामुळे समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत विकासाचे फायदे पोहोचणे आवश्यक आहे.

3. पर्यावरणीय संरक्षण:- नैसर्गिक संसाधने जसे की पाणी, हवा, जमीन आणि जंगल यांचे जतन करणे अत्यावश्यक आहे. औद्योगिकीकरणामुळे वाढणारे प्रदूषण, जंगलतोड आणि हवामान बदल यामुळे पर्यावरणाला गंभीर धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे नूतनीकरणीय ऊर्जेचा वापर, वृक्षारोपण आणि प्रदूषण नियंत्रण यावर भर देणे आवश्यक आहे. पर्यावरणाचे संरक्षण केल्याशिवाय विकास दीर्घकालीन टिकू शकत नाही. शेवटी, आर्थिक विकास, सामाजिक समता आणि पर्यावरण संरक्षण या तिन्ही घटकांचा समतोल साधणे म्हणजेच शाश्वत विकास होय. या तिन्ही घटकांपैकी कोणताही घटक दुर्लक्षित केल्यास विकास अपूर्ण ठरतो. म्हणूनच आजच्या काळात शाश्वत विकास ही केवळ संकल्पना नसून मानवाच्या अस्तित्वासाठी अत्यावश्यक गरज बनली आहे.

6. उच्च शिक्षण आणि शाश्वत विकास यांचा संबंध

आधुनिक युगात उच्च शिक्षण आणि शाश्वत विकास यांचा संबंध अत्यंत घनिष्ठ आणि परस्परपूरक आहे. शाश्वत विकास म्हणजे वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम न होऊ देणे. ही संकल्पना World Commission on Environment and Development यांनी मांडली असून आज United Nations ने ती जागतिक स्तरावर स्वीकारली आहे. शाश्वत विकास साध्य करण्यासाठी उच्च शिक्षण महत्त्वाची भूमिका बजावते. उच्च शिक्षण म्हणजे केवळ पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण नसून ज्ञान, कौशल्ये, मूल्ये आणि विचारशक्ती विकसित करणारी प्रक्रिया आहे. हे शिक्षण व्यक्तीला जबाबदार नागरिक बनवते आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सक्षम करते. शाश्वत विकासाचे तीन मुख्य घटक – आर्थिक विकास, सामाजिक विकास आणि पर्यावरणीय विकास – यामध्ये उच्च शिक्षणाचा मोठा वाटा आहे.

1. प्रथम, आर्थिक विकासाच्या दृष्टीने उच्च शिक्षण अत्यंत आवश्यक आहे. शिक्षणामुळे व्यक्तीला आधुनिक कौशल्ये प्राप्त होतात, ज्यामुळे रोजगाराच्या संधी वाढतात आणि उत्पादनक्षमता सुधारते. तंत्रज्ञान, उद्योग आणि संशोधन क्षेत्रात प्रगती घडवून आणण्यासाठी उच्च शिक्षण महत्त्वाचे ठरते. सुशिक्षित मनुष्यबळामुळे देशाची अर्थव्यवस्था मजबूत होते आणि दीर्घकालीन आर्थिक विकास साध्य होतो. त्यामुळे उच्च शिक्षण आर्थिक स्थैर्य आणि प्रगतीसाठी आधारस्तंभ आहे.

2. दुसरा घटक म्हणजे सामाजिक विकास. उच्च शिक्षणामुळे समाजात जागरूकता, समानता आणि सामाजिक न्याय वाढतो. शिक्षणामुळे स्त्री-पुरुष समानता, मानवाधिकारांची जाणीव आणि सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण होते. तसेच शिक्षणामुळे गरिबी, अज्ञान आणि अंधश्रद्धा कमी होण्यास मदत होते. समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी मिळाल्यास सामाजिक विकास अधिक बळकट होतो. त्यामुळे उच्च शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे.

3. तिसरा घटक म्हणजे पर्यावरणीय विकास. आजच्या काळात पर्यावरण संरक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. उच्च शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण होते. पर्यावरणीय अभ्यास, संशोधन आणि नवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रदूषण कमी करणे, नूतनीकरणीय ऊर्जेचा वापर वाढवणे आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन करणे शक्य होते. शिक्षणामुळे लोक पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारतात, ज्यामुळे शाश्वत विकास साध्य होतो. शेवटी, उच्च शिक्षण आणि शाश्वत विकास यांचा संबंध अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. आर्थिक प्रगती, सामाजिक समता आणि पर्यावरण संरक्षण या तिन्ही क्षेत्रांत उच्च शिक्षण महत्त्वाची भूमिका बजावते. म्हणूनच शाश्वत विकास

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

साध्य करण्यासाठी उच्च शिक्षणाचा प्रसार आणि गुणवत्ता वाढवणे अत्यावश्यक आहे. अशा प्रकारे, उच्च शिक्षण हे शाश्वत विकासाचे प्रभावी साधन ठरते.

ग्रामीण भागातील मुख्य अडचणी

1) शिक्षण सुविधांचा अभाव

ग्रामीण भागात उच्च शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांचा मोठ्या प्रमाणात अभाव आढळतो. अनेक गावांमध्ये महाविद्यालये, ग्रंथालये, प्रयोगशाळा (Laboratories) आणि संशोधन केंद्रे उपलब्ध नसतात. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शहरात जावे लागते, ज्यामुळे वेळ, पैसा आणि सुरक्षिततेच्या समस्या निर्माण होतात. यामुळे अनेक विद्यार्थी शिक्षण अर्धवट सोडतात. विशेषतः मुलींसाठी प्रवास आणि सुरक्षिततेच्या कारणांमुळे शिक्षण घेणे अधिक कठीण होते.

2) आर्थिक समस्या

ग्रामीण भागातील बहुतांश लोक शेती किंवा असंघटित क्षेत्रावर अवलंबून असतात, ज्यामुळे त्यांचे उत्पन्न अनिश्चित असते. अशा परिस्थितीत उच्च शिक्षणाचा खर्च (फी, वसतिगृह, पुस्तके, प्रवास) परवडत नाही. परिणामी, अनेक विद्यार्थी लवकर नोकरी किंवा मजुरीकडे वळतात आणि शिक्षण सोडतात. ही आर्थिक अडचण शाश्वत विकासासाठी अडथळा ठरते कारण शिक्षणाशिवाय कौशल्य विकास होत नाही.

3) डिजिटल दरी (Digital Divide)

डिजिटल शिक्षण आजच्या काळात अत्यंत महत्त्वाचे झाले आहे, परंतु ग्रामीण भागात इंटरनेट, संगणक आणि स्मार्टफोन यांची उपलब्धता कमी आहे. ऑनलाइन शिक्षण, ई-लर्निंग, डिजिटल लायब्ररी यांचा फायदा ग्रामीण विद्यार्थ्यांना पुरेशा प्रमाणात मिळत नाही. यामुळे ग्रामीण आणि शहरी विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाच्या गुणवत्तेत मोठी दरी निर्माण होते. ही डिजिटल दरी शाश्वत विकासाच्या मार्गातील एक गंभीर अडथळा आहे.

4) शिक्षकांची कमतरता ग्रामीण भागातील शैक्षणिक संस्थांमध्ये पात्र आणि अनुभवी शिक्षकांची कमतरता असते. अनेक वेळा शिक्षक शहरात काम करण्यास प्राधान्य देतात, त्यामुळे ग्रामीण भागात कमी दर्जाचे किंवा तात्पुरते शिक्षक असतात. यामुळे शिक्षणाची गुणवत्ता कमी होते आणि विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळत नाही. उच्च शिक्षणात गुणवत्तापूर्ण शिक्षक नसल्यास विद्यार्थ्यांचा विकास मर्यादित राहतो.

5) सामाजिक अडथळे ग्रामीण समाजात अजूनही काही पारंपरिक विचार आणि सामाजिक अडथळे आढळतात. उदा: मुलींचे शिक्षण कमी महत्त्वाचे मानले जाते, लवकर लग्नाची प्रथा, शिक्षणापेक्षा कामाला प्राधान्य या कारणांमुळे अनेक विद्यार्थी, विशेषतः मुली, उच्च शिक्षणापासून वंचित राहतात. यामुळे सामाजिक विकास थांबतो आणि शाश्वत विकास साध्य होणे कठीण होते.रील सर्व अडचणींमुळे ग्रामीण भागातील उच्च शिक्षणाचा विकास मर्यादित राहतो. त्यामुळे आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय विकासावर नकारात्मक परिणाम होतो. या समस्यांचे निराकरण केल्यास शाश्वत विकास साध्य करणे अधिक सोपे होईल.

संधी आणि सकारात्मक घटक

1) डिजिटल शिक्षणाचा प्रसार आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात डिजिटल शिक्षणामुळे ग्रामीण भागातील उच्च शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणात संधी निर्माण झाल्या आहेत. इंटरनेट, स्मार्टफोन, ऑनलाइन क्लासेस, ई-लर्निंग प्लॅटफॉर्म यामुळे विद्यार्थ्यांना घरबसल्या शिक्षण घेणे शक्य झाले आहे. विशेषतः COVID-19 नंतर डिजिटल शिक्षणाचा वेगाने प्रसार झाला. यामुळे: गुणवत्तापूर्ण शिक्षण ग्रामीण भागात पोहोचू लागले, शहरातील तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन ऑनलाइन उपलब्ध झाले, वेळ आणि प्रवासाचा खर्च कमी झाला, तथापि, डिजिटल दरी अजूनही अडथळा आहे, परंतु योग्य पायाभूत सुविधा निर्माण केल्यास डिजिटल शिक्षण ग्रामीण विकासासाठी मोठी संधी ठरू शकते.

2) सरकारी योजना सरकारकडून ग्रामीण भागातील शिक्षण सुधारण्यासाठी विविध योजना राबविल्या जात आहेत, ज्यामुळे उच्च शिक्षणाला चालना मिळते. उदा: शिष्यवृत्ती योजना (Scholarships), मोफत किंवा सवलतीच्या फी योजना, डिजिटल इंडिया उपक्रम, ग्रामीण भागात नवीन महाविद्यालये आणि विद्यापीठे स्थापन करणे, या योजनांमुळे: आर्थिक अडचणी कमी होतात, शिक्षणाची उपलब्धता वाढते, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळते, सरकारी धोरणे योग्य पद्धतीने अंमलात आणल्यास ग्रामीण भागातील शिक्षणामध्ये मोठी सुधारणा होऊ शकते आणि शाश्वत विकासाला चालना मिळते.

3) स्वयंसेवी संस्थांचे (NGOs) योगदान स्वयंसेवी संस्था ग्रामीण भागातील शिक्षणाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात. या संस्था सरकारसोबत किंवा स्वतंत्रपणे विविध शैक्षणिक उपक्रम राबवतात. त्यांचे मुख्य कार्य: गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, डिजिटल साक्षरता (Digital Literacy) कार्यक्रम, मुलींच्या शिक्षणासाठी जागरूकता मोहिमा, कौशल्य विकास (Skill Development) प्रशिक्षण, यामुळे: शिक्षणाबद्दल जागरूकता वाढते, वंचित घटकांपर्यंत शिक्षण पोहोचते, सामाजिक बदल घडतो,स्वयंसेवी संस्थांचे योगदान शाश्वत विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे कारण त्या समाजातील दुर्लक्षित घटकांपर्यंत पोहोचतात.डिजिटल शिक्षण, सरकारी योजना आणि

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

स्वयंसेवी संस्थांचे योगदान हे ग्रामीण भागातील उच्च शिक्षणासाठी महत्त्वाचे सकारात्मक घटक आहेत. या संधींचा योग्य वापर केल्यास ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास होऊ शकतो आणि शाश्वत विकास साध्य करणे शक्य होते.

सूचना (Recommendations)

1) ग्रामीण भागात अधिक महाविद्यालये उघडावीत ग्रामीण भागात उच्च शिक्षणासाठी महाविद्यालयांची संख्या अपुरी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शहरांकडे स्थलांतर करावे लागते, जे सर्वांसाठी शक्य नसते. जर ग्रामीण भागात अधिक महाविद्यालये स्थापन केली तर: विद्यार्थ्यांना स्थानिक पातळीवर शिक्षण मिळेल, प्रवासाचा खर्च आणि वेळ वाचेल, मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळेल, शिक्षण सोडण्याचे प्रमाण कमी होईल, तसेच, स्थानिक गरजांनुसार (उदा. शेती, लघुउद्योग) अभ्यासक्रम तयार केल्यास रोजगारनिर्मितीला चालना मिळेल.

2) डिजिटल सुविधा वाढवाव्यातआजच्या काळात डिजिटल शिक्षण अत्यावश्यक झाले आहे. त्यामुळे ग्रामीण भागात इंटरनेट, संगणक, स्मार्ट क्लासरूम आणि डिजिटल लायब्ररी यांची सुविधा वाढवणे गरजेचे आहे. यामुळे: ऑनलाइन शिक्षण सुलभ होईल, विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण मिळेल, ई-लर्निंग आणि संशोधनाला चालना मिळेल, सरकार आणि खाजगी क्षेत्राने मिळून ग्रामीण भागात मजबूत डिजिटल पायाभूत सुविधा उभारल्या पाहिजेत.

3) आर्थिक मदत योजना वाढवाव्यात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणीमुळे शिक्षण पूर्ण करता येत नाही. त्यामुळे शिष्यवृत्ती, फी सवलत, शिक्षण कर्ज सुलभ करणे आवश्यक आहे. यामुळे: गरीब आणि मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळेल, शिक्षण सोडण्याचे प्रमाण कमी होईल, सामाजिक समता वाढेल विशेषतः मुली, मागासवर्गीय आणि शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी विशेष योजना राबवणे गरजेचे आहे.

4) कौशल्याधारित शिक्षणावर भर द्यावाफक्त सैद्धांतिक शिक्षण न देता विद्यार्थ्यांना व्यावहारिक (Practical) आणि कौशल्याधारित शिक्षण देणे आवश्यक आहे.उदा: संगणक कौशल्य (Computer Skills), उद्योग व व्यवसाय प्रशिक्षण, कृषी व तंत्रज्ञान आधारित शिक्षण यामुळे: विद्यार्थ्यांना रोजगाराच्या अधिक संधी मिळतात, स्वयंपूर्णता (Self-employment) वाढते, स्थानिक उद्योगांना चालना मिळते. कौशल्याधारित शिक्षण शाश्वत विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे कारण ते आर्थिक आणि सामाजिक विकासाला गती देते.वरील उपाययोजना प्रभावीपणे राबवल्यास ग्रामीण भागातील उच्च शिक्षणाची गुणवत्ता आणि उपलब्धता वाढेल. त्यामुळे आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय स्तरावर शाश्वत विकास साध्य करणे अधिक सोपे होईल.

निष्कर्ष

उच्च शिक्षण आणि शाश्वत विकास यांचा परस्पर संबंध अत्यंत घट्ट आणि परस्परपूरक आहे. कोणत्याही देशाचा सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी उच्च शिक्षण ही एक मूलभूत आणि आवश्यक अट मानली जाते. विशेषतः ग्रामीण भागाच्या संदर्भात पाहिले असता, उच्च शिक्षणामुळे केवळ व्यक्तीचा नव्हे तर संपूर्ण समाजाचा आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय स्तरावर विकास घडून येतो. ग्रामीण भागातील उच्च शिक्षणाच्या सद्यस्थितीचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, शिक्षणाच्या सुविधांचा अभाव, आर्थिक समस्या, डिजिटल दरी, शिक्षकांची कमतरता आणि सामाजिक अडथळे या अनेक अडचणी अद्यापही अस्तित्वात आहेत. या अडचणींमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधींपासून वंचित राहावे लागते, ज्याचा थेट परिणाम त्यांच्या जीवनमानावर आणि समाजाच्या प्रगतीवर होतो.तथापि, या समस्यांबरोबरच काही सकारात्मक संधी देखील उपलब्ध आहेत. डिजिटल शिक्षणाचा वाढता प्रसार, विविध सरकारी योजना आणि स्वयंसेवी संस्थांचे योगदान यामुळे ग्रामीण भागातील शिक्षणामध्ये सुधारणा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या घटकांचा योग्य वापर केल्यास शिक्षण अधिक सुलभ, सर्वसमावेशक आणि गुणवत्तापूर्ण होऊ शकते.यासोबतच, ग्रामीण भागात अधिक महाविद्यालयांची स्थापना, डिजिटल सुविधा वाढविणे, आर्थिक मदत योजना बळकट करणे आणि कौशल्याधारित शिक्षणावर भर देणे या उपाययोजना प्रभावीपणे राबविल्यास उच्च शिक्षणाची गुणवत्ता आणि पोहोच मोठ्या प्रमाणात वाढू शकते. या उपायांमुळे विद्यार्थ्यांना केवळ शिक्षणच नव्हे तर रोजगाराच्या संधी, स्वावलंबन आणि सामाजिक प्रगतीची दिशा मिळू शकते.अखेर असे म्हणता येईल की, उच्च शिक्षण हे शाश्वत विकासाचे एक प्रभावी साधन आहे. ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेतील अडचणी दूर करून आणि उपलब्ध संधींचा योग्य वापर करून देशाचा सर्वांगीण आणि शाश्वत विकास साध्य करणे शक्य आहे. यासाठी सरकार, शैक्षणिक संस्था आणि समाज यांचे संयुक्त आणि समन्वित प्रयत्न अत्यंत आवश्यक आहेत.

संदर्भ:-

1) वा.र.अहिरराव, यु.यु.अलीझाड, तु.मा.वराट, चं.सा.धापटे, रा.शा.बोस पर्यावरण विज्ञान, जुलै 1999.

2) डॉ.जे.एफ. पाटील, अर्थतरंग, जून 2000.

3) रविंद्र दोशी, अर्थसंवाद खंड 19. अंक 4, 1996.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

4) डॉ. हरबंस.एस. बशी, पर्यावरण प्रदूषण आणि हृदयविकार, योजना सप्टेंबर, 1997.

5) करमळकर, पागनीस, देवस्थळी, पर्यावरण शास्त्र, 1995.

6) More J. C. (2008): "The Sustainable Agricultural Development in The Karmala Tahsil of Solapur District (M.S.)", Unpublished Ph.D. Thesis 2008.

7) Tilbury D. (2011). Higher Education for Sustainability.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

Original Article

विमा उद्योगाचा आर्थिक विकासातील वाटा

प्रा. दादा मारुती जळक
वाणिज्य विभाग, विश्वासराव रणसिंग महाविद्यालय कळंब वालचंदनगर, ता. इंदापूर, जि. पुणे

Manuscript ID:
JRD -2026-180323
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 3(IV)
Pp. 103-107
March- 2026
Submitted: 15 Feb. 2026
Revised: 25 Feb. 2026
Accepted: 10 Mar. 2026
Published: 31 Mar. 2026

सारांश

विमा उद्योग हा आधुनिक अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा वित्तीय घटक आहे. व्यक्ती, उद्योग व व्यवसाय यांना विविध प्रकारच्या जोखमींपासून संरक्षण देण्याचे कार्य विमा उद्योग करतो. आर्थिक विकासासाठी आवश्यक असलेल्या स्थैर्य, बचत, गुंतवणूक व भांडवल निर्मितीमध्ये विमा उद्योगाचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. प्रस्तुत संशोधन प्रबंधामध्ये विमा उद्योगाची संकल्पना, स्वरूप व प्रकार यांचा अभ्यास करण्यात आला आहे तसेच भारतीय विमा उद्योगाचा आर्थिक विकासातील योगदान विश्लेषित करण्यात आले आहे.या अभ्यासासाठी द्वितीयक माहितीचा वापर करण्यात आला असून IRDAI, RBI अहवाल, विविध संशोधन जर्नल्स, पुस्तके व सरकारी प्रकाशने यांचा आधार घेण्यात आला आहे. विमा उद्योगामुळे दीर्घकालीन बचतीचे संकलन होऊन त्या निधीचा उपयोग पायाभूत सुविधा, औद्योगिक विकास व वित्तीय बाजारामध्ये गुंतवणुकीसाठी केला जातो, यामुळे आर्थिक वाढीस चालना मिळते. तसेच विमा उद्योग जोखीम व्यवस्थापनाद्वारे आर्थिक स्थैर्य निर्माण करतो आणि रोजगारनिर्मिती तसेच सामाजिक सुरक्षिततेस हातभार लावतो.अभ्यासातून असे निष्कर्ष काढण्यात आले आहेत की विमा उद्योग व आर्थिक विकास यांच्यात सकारात्मक संबंध आहे. त्यामुळे विमा क्षेत्राचा विस्तार, विमा साक्षरता वाढविणे व धोरणात्मक सुधारणा करणे आवश्यक आहे. यामुळे देशाच्या सर्वांगीण आर्थिक विकासास गती मिळू शकते.

प्रस्तावना

विमा उद्योग हे अर्थव्यवस्थेच्या वित्तीय क्षेत्रातील एक महत्त्वाचे घटक आहे. हे धोके व्यवस्थापित करून वित्तीय स्थैर्य, बचत व गुंतवणूक यांना चालना देते. विमा उद्योगाची आर्थिक विकासातील भूमिका अनेक देशांच्या अभ्यासात सिद्ध झाली आहे आणि भारतासारख्या विकसित व विकासशील अर्थव्यवस्थेत विमा क्षेत्राचे योगदान महत्त्वाचे आहे. भारतात विमा उद्योगाचे विकासाचे प्रमाण वाढत असले तरीही त्याचा जीडीपी, आर्थिक स्थैर्य, रोजगार निर्मिती, भांडवल निर्मिती यावर परिणाम किती आहे, हे विश्लेषणाची गरज आहे. विविध अभ्यासातून हे दिसते की विमा क्षेत्र आर्थिक वाढीमध्ये सकारात्मक भूमिका बजावत असल्याचे आढळते. कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासामध्ये वित्तीय क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. या वित्तीय क्षेत्रातील एक प्रमुख घटक म्हणजे **विमा उद्योग**. विमा उद्योग केवळ व्यक्ती, संस्था व उद्योगांना आर्थिक सुरक्षितता देत नाही, तर तो देशाच्या एकूण आर्थिक स्थैर्याला आणि वाढीला चालना देतो. जोखीम व्यवस्थापन, बचतीचे संकलन, गुंतवणुकीला प्रोत्साहन आणि रोजगारनिर्मिती अशा विविध मार्गांनी विमा उद्योग आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान देतो.आजच्या बदलत्या आर्थिक वातावरणात नैसर्गिक आपत्ती, अपघात, आजारपण किंवा व्यावसायिक नुकसान यांसारख्या अनिश्चित घटनांपासून संरक्षण मिळवण्यासाठी विमा आवश्यक ठरतो. विमा उद्योगामुळे लोकांमध्ये आर्थिक सुरक्षिततेची भावना निर्माण होते, ज्यामुळे उद्योगधंदे व व्यवसाय अधिक आत्मविश्वासाने कार्य करू शकतात.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
प्रा. दादा मारुती जळक वाणिज्य विभाग, विश्वासराव रणसिंग महाविद्यालय कळंब वालचंदनगर.

How to cite this article:
जळक, . दादा . मारुती . (2026). विमा उद्योगाचा आर्थिक विकासातील वाटा. Journal of research & development, 18(3(IV)), 103–107. https://doi.org/10.5281/zenodo.20745074

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.20745074
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

तसेच विमा कंपन्यांकडून जमा होणारी प्रीमियम रक्कम विविध विकासात्मक प्रकल्पांमध्ये गुंतवली जाते, ज्यामुळे भांडवली निर्मितीला गती मिळते.अशा प्रकारे विमा उद्योग हा केवळ संरक्षण देणारा घटक नसून, तो आर्थिक विकासाचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. म्हणूनच विमा उद्योगाचा आर्थिक विकासातील वाटा समजून घेणे अत्यंत आवश्यक ठरते.विमा उद्योग हा देशाच्या आर्थिक व्यवस्थेचा एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. हा उद्योग व्यक्ती, कुटुंब, उद्योगधंदे आणि शासन यांना विविध जोखमींपासून आर्थिक संरक्षण देतो. विमा उद्योगामुळे अनिश्चिततेतून निर्माण होणारे आर्थिक नुकसान कमी होते आणि त्यामुळे आर्थिक स्थैर्य टिकून राहते. प्रथम, **जोखीम व्यवस्थापन** हे विमा उद्योगाचे मुख्य कार्य आहे. अपघात, आजारपण, नैसर्गिक आपत्ती, आग, चोरी किंवा मृत्यू यांसारख्या घटनांमुळे होणारे नुकसान विम्यामुळे भरून निघते. त्यामुळे व्यक्ती व उद्योग आर्थिक संकटातून लवकर सावरू शकतात आणि त्यांचा आर्थिक प्रवास खंडित होत नाही. दुसरे म्हणजे, विमा उद्योग **बचत व गुंतवणूक वाढवतो**. जीवनविमा योजनांमुळे लोक नियमितपणे बचत करतात. विमा कंपन्या या बचतीचा उपयोग पायाभूत सुविधा, उद्योग, शेअर बाजार आणि सरकारी प्रकल्पांमध्ये गुंतवणुकीसाठी करतात. यामुळे भांडवली निर्मिती होते आणि आर्थिक विकासाला चालना मिळते. तिसरे महत्त्वाचे योगदान म्हणजे **रोजगारनिर्मिती**. विमा उद्योगात एजंट, अधिकारी, प्रशासकीय कर्मचारी, तज्ज्ञ, सर्व्हेअर इत्यादींसाठी मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होतो. तसेच अप्रत्यक्षपणे बँकिंग, आयटी, आरोग्य सेवा आणि सेवा क्षेत्रालाही चालना मिळते. याशिवाय विमा उद्योग **उद्योग व व्यापाराला प्रोत्साहन देतो**. विम्यामुळे उद्योगांना सुरक्षिततेची हमी मिळते, त्यामुळे ते नवीन गुंतवणूक करण्यास, विस्तार करण्यास आणि जोखीम घेण्यास तयार होतात. याचा सकारात्मक परिणाम एकूण उत्पादन आणि राष्ट्रीय उत्पन्नावर होतो. एकूणच पाहता, विमा उद्योग आर्थिक स्थैर्य निर्माण करतो, विकासाला गती देतो आणि समाजाच्या सर्वांगीण प्रगतीस हातभार लावतो. म्हणून विमा उद्योगाचा आर्थिक विकासातील वाटा हा अत्यंत महत्त्वाचा आणि अनिवार्य आहे.

संशोधन पद्धती:

या संशोधनासाठी वर्णनात्मक (Descriptive) संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:

1. विमा उद्योग आणि GDP या संकल्पना व स्वरूप यांचा अभ्यास करणे.
2. भारतीय विमा उद्योगाचा विकास व वाढीचा आढावा घेणे.
3. आर्थिक विकासात विमा उद्योगाची भूमिका स्पष्ट करणे.
4. विमा उद्योगाचा सकल देशांतर्गत उत्पादनावर (GDP) होणारा परिणाम अभ्यासणे.

- **विमा उद्योग आणि GDP या संकल्पना व स्वरूप :**

विमा उद्योगाची व्याख्या:

"विमा उद्योग हा असा वित्तीय सेवा उद्योग आहे, जो व्यक्ती, संस्था व व्यवसाय यांना भविष्यातील अनिश्चित जोखमींपासून आर्थिक संरक्षण प्रदान करतो."विमा (Insurance): हे एक आर्थिक साधन आहे जे मानसशक्तीला जोखीमपासून संरक्षण देते. विमा उद्योग दोन मुख्य प्रकारात विभागला जातो:

1. जीवन विमा (Life Insurance)
2. अजीवन / सामान्य विमा (Non-Life / General Insurance)

विमा कंपन्या ग्राहकांकडून प्रीमियम घेतात व जोखीम उद्भवल्यास नुकसान भरपाई देतात.

GDP ची व्याख्या:"एखाद्या देशात एका वर्षात उत्पादित झालेल्या सर्व अंतिम वस्तू व सेवांचे एकूण मूल्य म्हणजे सकल देशांतर्गत उत्पादन (GDP)."

GDP खालील चार प्रमुख घटकांपासून तयार होतो:

1. घरगुती लोकांनी वस्तू व सेवांवर केलेला खर्च.
   उदा. अन्न, कपडे, शिक्षण, आरोग्य सेवा इ.
2. गुंतवणूक (Investment – I)
   उद्योग, यंत्रसामग्री, इमारती, पायाभूत सुविधा यांवरील खर्च.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

3. सरकारी खर्च (Government Expenditure – G)
   सरकारकडून शिक्षण, संरक्षण, आरोग्य, रस्ते इत्यादींवर होणारा खर्च.
4. निव्वळ निर्यात (Net Exports = X – M)
   निर्यात (Exports) – आयात (Imports)

सूत्र: **GDP = C + I + G + (X – M)**

GDP मोजण्याच्या पद्धती:

GDP मोजण्यासाठी तीन प्रमुख पद्धती वापरल्या जातात:

1. उत्पादन पद्धत (Production Method)
   विविध क्षेत्रांतील उत्पादनाचे मूल्य जोडले जाते.
2. उत्पन्न पद्धत (Income Method)
   वेतन, नफा, भाडे, व्याज यांसारखी उत्पन्ने मोजली जातात.

खर्च पद्धत (Expenditure Method)

अर्थव्यवस्थेतील एकूण खर्चाच्या आधारे GDP मोजला जातो

2. भारतीय विमा उद्योगाचा विकास व वाढ:

- **भारतातील विमा उद्योगाचा वर्तमान विकास:**

धोरणात्मक सुधारणा:भारत सरकारने विमा क्षेत्रात सुधारणा करून 100% FDI (परकीय गुंतवणूक) मंजूर केली आहे, ज्यामुळे विमा कंपन्यांना अधिक संसाधने व जागतिक स्पर्धा मिळणार आहे.

आर्थिक योगदानाचे संकेत:

भारतामध्ये विमा क्षेत्राचे प्रीमियम व नफा दर वाढत आहे आणि याचा सकारात्मक प्रभाव अर्थव्यवस्थेवर पडत आहे. विमा उद्योगामुळे जीवन व सामान्य विमा कंपन्यांचे नफ्यात वाढ दिसून आली आहे.

- विमा उद्योग आणि आर्थिक विकास: तुलनात्मक अभ्यास-

भारताच्या तुलनेत इतर देशनेपाळमध्ये विमा उद्योगाचे आर्थिक स्रोत सक्षमीकरणास मदत आणि आर्थिक विकासाला चालना दिली आहे. इतर अभ्यासांमध्ये विमा उद्योगाचे GDP आणि गुंतवणूक विषयी आर्थिक वाढीशी सकारात्मक संबंध दर्शवला आहे.

- भारतीय विमा उद्योगाचा ऐतिहासिक विकास:

भारतीय विमा उद्योगाचा इतिहास दीर्घ व टप्प्याटप्प्याने विकसित झालेला आहे. आर्थिक विकास, सामाजिक सुरक्षितता आणि जोखीम व्यवस्थापन यामध्ये या उद्योगाची महत्त्वाची भूमिका राहिली आहे.

१) प्रारंभिक टप्पा (१८१८–१९५६)

भारतातील पहिली जीवन विमा कंपनी ओरिएंटल लाईफ इन्शुरन्स १८१८ मध्ये कोलकाता येथे स्थापन झाली. या काळात अनेक खासगी विमा कंपन्या कार्यरत होत्या; मात्र नियमनाचा अभाव, असमानता आणि गैरव्यवहार यामुळे ग्राहकांचे हित धोक्यात होते.

२) राष्ट्रीयीकरणाचा कालखंड (१९५६–१९९९)

१९५६ मध्ये जीवन विमा क्षेत्राचे राष्ट्रीयीकरण होऊन भारतीय जीवन विमा महामंडळ (LIC) स्थापन झाले. १९७२ मध्ये सामान्य विमा क्षेत्राचेही राष्ट्रीयीकरण करून GIC व तिच्या सहाय्यक कंपन्या सुरू झाल्या. या टप्प्यात विमा सेवांचा विस्तार ग्रामीण व दुर्लक्षित भागांपर्यंत झाला, परंतु स्पर्धेचा अभाव असल्याने नवोपक्रम मर्यादित राहिले.

३) उदारीकरण व खासगीकरणाचा टप्पा (१९९९ नंतर)

१९९९ मध्ये विमा नियामक व विकास प्राधिकरण (IRDAI) स्थापन झाले आणि खासगी व विदेशी कंपन्यांना प्रवेश मिळाला. यामुळे स्पर्धा वाढली, ग्राहक-केंद्रित उत्पादने, तंत्रज्ञानाचा वापर आणि सेवा गुणवत्तेत सुधारणा झाली.

४) अलीकडील वाढीचे प्रवाह:

1. जीवन व सामान्य विमा प्रीमियममध्ये सातत्यपूर्ण वाढ
2. डिजिटल प्लॅटफॉर्म, इन्शुरटेक व ऑनलाईन वितरणाचा विस्तार

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

3. आरोग्य, मायक्रो-इन्शुरन्स व सामाजिक सुरक्षा योजनांवर भर
4. FDI मर्यादा वाढवल्यामुळे भांडवली गुंतवणुकीत वाढ

भारतीय विमा उद्योगाने आर्थिक स्थैर्य, दीर्घकालीन बचत आणि गुंतवणूक यांना चालना दिली आहे. वाढती लोकसंख्या, वाढते उत्पन्न, डिजिटल साक्षरता आणि सरकारी धोरणांमुळे भविष्यात या उद्योगाच्या वाढीस मोठी संधी आहे. भारतीय विमा उद्योगाने पारंपरिक स्वरूपातून आधुनिक व स्पर्धात्मक रूप धारण केले आहे. उदारीकरण, तंत्रज्ञान व सरकारी योजनांमुळे विमा उद्योगाचा विकास वेगाने झाला असून भविष्यातही तो आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावेल. विमा उद्योग हे केवळ संरक्षण देणारे साधन नाही; आर्थिक विकासाचा आधार, भांडवल वाहक, जोखीम व्यवस्थापक आणि सामाजिक स्थिरता साधणारे महत्त्वाचे आर्थिक घटक आहे. भारतासारख्या वेगाने विकसित होत असलेल्या अर्थव्यवस्थेत विमा उद्योगाचे योगदान अजून वाढण्याची क्षमता आहे.

विमा उद्योगाची आर्थिक विकासातील भूमिका:

(a) जोखीम व्यवस्थापन विमा उद्योग अर्थव्यवस्थेतील जोखमींचे व्यवस्थापन करतो, ज्यामुळे व्यक्ती आणि व्यवसाय आर्थिक संकटांपासून सुरक्षित राहतात. हे गुंतवणुकीस अनुकूल वातावरण तयार करते आणि आर्थिक क्रियाकलाप वाढवते.

(b) भांडवल संचय आणि गुंतवणूकविमा कंपन्या प्रीमियम रूपात मिळणारे निधी वित्तीय बाजारात गुंतवतात. अशा गुंतवणुकीमुळे देशाच्या भांडवल निर्मितीत वाढ होते आणि वेगवेगळ्या आर्थिक प्रकल्पांना वित्तपुरवठा मिळतो.

(c) आर्थिक स्थैर्य विमा उद्योग वित्तीय स्थिरतेचा आधार आहे. आर्थिक संकटाच्या काळातही विमा योजना व्यक्ती व व्यवसाय यांना आर्थिक सहाय्य पुरवतात ज्यामुळे अर्थव्यवस्था स्थिर राहते.

(d) रोजगार निर्मितीविमा कंपनींचे विस्तार आणि सेवा नेटवर्क व्यापक प्रमाणावर रोजगाराची निर्मिती करतात. एजंट, क्लेम व्यवस्थापक, विपणन कर्मचारी हे सर्व विमा क्षेत्रातील रोजगाराचे भाग आहेत.

(e) सामाजिक सुरक्षा विमा नोकरी गमावलेल्या कुटुंबांना, अपघात किंवा आजारांमध्ये आर्थिक सुरक्षा उपलब्ध करतो. अशा आर्थिक संरक्षणामुळे सामाजिक पैलू मजबूत होतो व आर्थिक खर्चाचा दबाव कमी होतो.

विमा उद्योगाचा सकल देशांतर्गत उत्पादनावर (GDP) होणारा परिणाम:

सकल देशांतर्गत उत्पादन (Gross Domestic Product – GDP) हे देशाच्या आर्थिक प्रगतीचे प्रमुख मोजमाप आहे. GDP मध्ये शेती, उद्योग व सेवा क्षेत्रांचा समावेश होतो. विमा उद्योग हा सेवा क्षेत्राचा महत्त्वाचा घटक असून तो देशाच्या आर्थिक विकासात व GDP वाढीत महत्त्वाची भूमिका बजावतो.

विमा उद्योग व GDP यांचा परस्पर संबंध:

विमा उद्योग आर्थिक स्थैर्य प्रदान करून उद्योग, व्यापार व व्यक्तींना जोखीम घेण्यास प्रोत्साहन देतो. त्यामुळे उत्पादन, गुंतवणूक व उपभोग वाढतो आणि परिणामी GDP मध्ये वाढ होते. विमा उद्योगाची वाढ आणि GDP वाढ यांच्यात सकारात्मक सहसंबंध आढळतो.

विमा उद्योगाचा GDP वर होणारा थेट परिणाम:

(अ) सेवा क्षेत्रातील योगदान:विमा उद्योग सेवा क्षेत्राचा भाग असल्यामुळे त्याचा थेट समावेश GDP मध्ये होतो. विमा प्रीमियम, सेवा शुल्क व गुंतवणूक उत्पन्नामुळे GDP मध्ये भर पडते.

(ब) रोजगार निर्मिती:विमा कंपन्या मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करतात – एजंट, अधिकारी, आयटी तज्ञ, ग्राहक सेवा कर्मचारी इत्यादी. रोजगार वाढल्याने उत्पन्न व उपभोग वाढतो, ज्याचा GDP वर सकारात्मक परिणाम होतो.

विमा उद्योगाचा GDP वर होणारा अप्रत्यक्ष परिणाम:

(अ) गुंतवणुकीला चालनाविमा कंपन्या गोळा केलेल्या प्रीमियमचा उपयोग पायाभूत सुविधा, सरकारी रोखे व उद्योग क्षेत्रात गुंतवणुकीसाठी करतात. यामुळे भांडवल निर्मिती वाढून GDP वाढीस मदत होते.

(ब) जोखीम व्यवस्थापनविमा उद्योग जोखीम कमी करून उद्योगांना विस्तार व नव्या उपक्रमांमध्ये गुंतवणूक करण्यास प्रोत्साहित करतो. त्यामुळे उत्पादन व औद्योगिक विकासाला चालना मिळते.

(क) आर्थिक स्थैर्यनैसर्गिक आपत्ती, आजार किंवा अपघातामुळे होणारे आर्थिक नुकसान विम्यामुळे भरून निघते. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील धक्के (economic shocks) कमी होतात आणि GDP वाढीचा वेग स्थिर राहतो.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

विमा प्रवेश दर (Insurance Penetration) व GDP

विमा प्रवेश दर म्हणजे विमा प्रीमियमचा GDP शी असलेला अनुपात.

1. ज्या देशांमध्ये विमा प्रवेश दर जास्त आहे, त्या देशांचा GDP दरही तुलनेने अधिक स्थिर व वाढता असतो.
2. भारतात विमा प्रवेश दर वाढत असून त्याचा सकारात्मक परिणाम GDP वर दिसून येतो.
3. सरकारी विमा योजना व GDP

प्रधानमंत्री पीक विमा योजना, आयुष्मान भारत, जीवन ज्योती विमा योजना यांसारख्या योजनांमुळे :

1. ग्रामीण उत्पन्नात स्थैर्य येते
2. आरोग्य खर्च कमी होतो
3. उत्पादनक्षमता
4. वाढतेया सर्व घटकांमुळे GDP वाढीस अप्रत्यक्ष मदत होते.

विमा उद्योगाचा सकल देशांतर्गत उत्पादनावर थेट व अप्रत्यक्ष असा दोन्ही प्रकारे सकारात्मक परिणाम होतो. विमा उद्योगामुळे भांडवल निर्मिती, गुंतवणूक, रोजगार व आर्थिक स्थैर्य वाढते. त्यामुळे विमा उद्योग हा GDP वाढीचा महत्त्वाचा प्रेरक घटक मानला जातो. भारतासारख्या विकसनशील देशासाठी विमा उद्योगाचा विकास हा आर्थिक प्रगतीसाठी अत्यावश्यक आहे.

निष्कर्ष:

विमा उद्योगाचा आर्थिक विकासातील वाटा हा व्यापक, स्थिर आणि दीर्घकालीन स्वरूपाचा आहे. विमा उद्योग व्यक्ती, कुटुंब, उद्योगधंदे व शासन यांना विविध आर्थिक जोखमींपासून संरक्षण देऊन आर्थिक स्थैर्य निर्माण करतो. जोखीम व्यवस्थापनामुळे उत्पादन, गुंतवणूक आणि उद्योजकता यांना चालना मिळते, ज्याचा सकारात्मक परिणाम देशाच्या एकूण आर्थिक वाढीवर होतो. जीवनविमा व सर्वसाधारण विमा योजनांमधून संकलित होणारी मोठ्या प्रमाणातील बचत विमा कंपन्यांकडून पायाभूत सुविधा, औद्योगिक विकास, सामाजिक सुरक्षा योजना व सरकारी रोखे यामध्ये गुंतवली जाते, ज्यामुळे भांडवली निर्मिती होते.याशिवाय विमा उद्योग रोजगारनिर्मितीचे एक महत्त्वाचे साधन ठरतो. थेट व अप्रत्यक्ष स्वरूपात लाखो लोकांना रोजगार उपलब्ध करून देत हा उद्योग सेवा क्षेत्राच्या विस्ताराला हातभार लावतो. विम्यामुळे उद्योगांना सुरक्षित वातावरण मिळते, त्यामुळे ते नवकल्पना स्वीकारण्यास व व्यवसाय विस्तारास प्रवृत्त होतात. एकूणच विमा उद्योग आर्थिक अस्थिरता कमी करून शाश्वत विकासाला पाठबळ देतो. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकास प्रक्रियेत विमा उद्योग हा एक अपरिहार्य व प्रभावी घटक ठरतो.

संदर्भ :

1. **कुलकर्णी, प्रा. डॉ. बी. बी.** *विमा व्यवसाय व व्यवस्थापन* – पुणे : विद्या प्रकाशन
2. **जोशी, डॉ. आर. एस.** *भारतीय विमा व्यवस्था* – औरंगाबाद : कैलास प्रकाशन
3. **देशमुख, डॉ. एस. के.** *भारतीय वित्तीय प्रणाली* – नागपूर : पिंपळापुरे अँड कंपनी

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

Original Article

खानापूर तालुक्यातील दुर्गवैभव आणि शाश्वत पर्यटन : एक अभ्यास

प्रदीप हनुमंत निकम
संशोधक विद्यार्थी – इतिहास विभाग, ग्रामोन्नती मंडळाचे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
नारायणगाव ता.जुन्नर, जि.पुणे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
Email-pradeepnikam101@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180324
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 3(IV)
Pp. 108-110
March- 2026
Submitted: 15 Feb. 2026
Revised: 25 Feb. 2026
Accepted: 10 Mar. 2026
Published: 31 Mar. 2026

सारांश

सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुका हा ऐतिहासिक, सांस्कृतिक व भौगोलिक दृष्ट्या समृद्ध प्रदेश मानला जातो. या परिसरात अनेक लहान-मोठे किल्ले आढळतात. त्यापैकी भुपाळगड (बाणूरगड) आणि कोळदुर्ग हे विशेष उल्लेखनीय किल्ले आहेत.१ प्रस्तुत संशोधनामध्ये या किल्ल्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी, स्थापत्य वैशिष्ट्ये आणि सद्यस्थिती यांचा अभ्यास करण्यात आला आहे. प्रत्यक्ष क्षेत्रीय पाहणी, स्थानिक परंपरा आणि उपलब्ध ऐतिहासिक साधनांच्या आधारे या दुर्गांचा अभ्यास करण्यात आला आहे.२ या अभ्यासातून असे दिसून येते की खानापूर तालुक्यातील किल्ल्यांमध्ये पर्यटन विकासाची मोठी क्षमता आहे. परंतु योग्य संवर्धनाच्या अभावामुळे हे किल्ले आज दुर्लक्षित अवस्थेत आहेत. शाश्वत पर्यटनाच्या माध्यमातून या दुर्गांचे संवर्धन करून स्थानिक आर्थिक व सामाजिक विकास साधता येऊ शकतो हा या संशोधनाचा मुख्य निष्कर्ष आहे.

प्रस्तावना

महाराष्ट्रातील किल्ले हे राज्याच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाचे महत्त्वपूर्ण प्रतीक आहेत. सह्याद्री पर्वतरांगांमध्ये वसलेले हे किल्ले प्राचीन काळापासून संरक्षण, प्रशासन आणि लष्करी दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे केंद्र होते.[४] या किल्ल्यांच्या माध्यमातून त्या त्या काळातील राजकीय परिस्थिती, युद्धनीती, तसेच स्थापत्यकलेची प्रगती यांचे दर्शन घडते. अनेक किल्ले नैसर्गिकदृष्ट्या अभेद्य अशा डोंगररांगांवर बांधलेले असल्यामुळे ते शत्रूंपासून संरक्षण करण्यासाठी उपयुक्त ठरले. त्यामुळे प्राचीन व मध्ययुगीन काळात राज्यकारभार, सैनिकी हालचाली आणि दळणवळण व्यवस्था यांचे महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून किल्ल्यांचा वापर करण्यात येत असे. सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुका हा डोंगराळ आणि नैसर्गिकदृष्ट्या संरक्षित अशा प्रदेशात वसलेला असून या परिसरात अनेक ऐतिहासिक किल्ले आढळतात. या किल्ल्यांमधून त्या काळातील लष्करी व्यवस्था, स्थापत्यकला, जलव्यवस्थापन तसेच धार्मिक जीवन यांची माहिती मिळते.[५] या किल्ल्यांवर आढळणाऱ्या तटबंदी, बुरुज, दरवाजे, पाण्याच्या टाक्या, मंदिरे आणि विविध शिल्पावशेष यांमधून त्या काळातील समाजजीवन, धार्मिक श्रद्धा आणि तांत्रिक कौशल्य यांचे दर्शन घडते. त्यामुळे या किल्ल्यांचा अभ्यास हा स्थानिक इतिहास समजून घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो. आजच्या काळात पर्यटन हा ग्रामीण विकासाचा एक महत्त्वाचा घटक मानला जातो. ऐतिहासिक किल्ले, नैसर्गिक परिसर आणि सांस्कृतिक परंपरा यांचा एकत्रित विचार केला असता दुर्गपर्यटनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे ऐतिहासिक किल्ल्यांचे संवर्धन करून त्यांचा पर्यटन विकास साधणे ही काळाची गरज आहे. योग्य नियोजन, संवर्धन आणि स्थानिक लोकांच्या सहभागाच्या माध्यमातून या किल्ल्यांचे जतन करता येईल तसेच स्थानिक स्तरावर रोजगारनिर्मिती व आर्थिक विकासालाही चालना मिळू शकते. त्यामुळे खानापूर तालुक्यातील किल्ल्यांचा अभ्यास आणि त्यांचा पर्यटन विकासाच्या दृष्टीने विचार करणे आवश्यक ठरते.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
प्रदीप हनुमंत निकम संशोधक विद्यार्थी – इतिहास विभाग ग्रामोन्नती मंडळ कला, वाणिज्य आणि विज्ञान तंत्रज्ञान, नारायणगाव

How to cite this article:
निकम, . प्रदीप . हनुमंत . (2026). खानापूर तालुक्यातील दुर्गवैभव आणि शाश्वत पर्यटन : एक अभ्यास. Journal of research & development, 18(3(IV)), 108–110. https://doi.org/10.5281/zenodo.20745160

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.20745160
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

सूचनक शब्द: खानापूर तालुका, दुर्गवैभव, भुपाळगड, कोळदुर्ग, दुर्गसंवर्धन, शाश्वत पर्यटन.

२. संशोधन उद्दिष्टे

१. खानापूर तालुक्यातील प्रमुख किल्ल्यांचा ऐतिहासिक अभ्यास करणे.
२. किल्ल्यांच्या सध्याच्या स्थितीचे निरीक्षण करणे.
३. दुर्गपर्यटनाच्या माध्यमातून शाश्वत पर्यटन विकासाच्या शक्यता अभ्यासणे.

३. संशोधन पद्धती

या संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. या पद्धतीमध्ये उपलब्ध प्राथमिक व द्वितीयक साधनांच्या आधारे विषयाचा सखोल अभ्यास करण्यात आला. प्राथमिक साधनांमध्ये भूपाळगड (बाणूरगड) व कोळदुर्ग परिसराची प्रत्यक्ष क्षेत्रीय पाहणी, स्थानिक रहिवाशांच्या मुलाखती तसेच किल्ल्यावरील वास्तू, तटबंदी, शिल्पे आणि अवशेषांचे निरीक्षण यांचा समावेश करण्यात आला. याशिवाय द्वितीयक साधनांमध्ये इतिहासविषयक ग्रंथ, संशोधन लेख तसेच महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर यांसारख्या प्रमाणित संदर्भग्रंथांचा उपयोग करून विषयाचा ऐतिहासिक संदर्भ स्पष्ट करण्यात आला. या सर्व साधनांच्या तुलनात्मक व विश्लेषणात्मक अभ्यासातून प्रस्तुत संशोधनाची मांडणी करण्यात आली आहे.

४. खानापूर तालुक्यातील दुर्गवैभव

खानापूर तालुका हा शंभू महादेवाच्या डोंगररांगांच्या परिसरात वसलेला असल्यामुळे येथे नैसर्गिकदृष्ट्या संरक्षणक्षम भूभाग आढळतो. त्यामुळे प्राचीन काळापासून या भागात किल्ल्यांची उभारणी करण्यात आली.[६] या डोंगररांगांमधील उंचसखल भूभाग, खोल दऱ्या आणि खडकाळ पठारे यांमुळे किल्ल्यांना नैसर्गिक संरक्षण प्राप्त झाले होते. त्यामुळे या भागातील किल्ले हे लष्करी दृष्ट्या सुरक्षित आणि रणनीतीदृष्ट्या महत्त्वाचे ठिकाण मानले जात होते.

या किल्ल्यांवरून त्या काळातील लष्करी व्यवस्था, स्थापत्यकला आणि जलव्यवस्थापनाची माहिती मिळते. किल्ल्यांवरील तटबंदी, बुरुज, दरवाजे, पाण्याच्या टाक्या तसेच विविध वास्तू अवशेषांमधून त्या काळातील बांधकाम तंत्रज्ञान आणि युद्धनितीचे स्वरूप स्पष्ट होते. याशिवाय किल्ल्यांवरील मंदिरे, शिल्पे आणि इतर पुरातत्त्वीय अवशेष यांमधून त्या काळातील धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनाचीही माहिती मिळते. भुपाळगड आणि कोळदुर्ग हे या परिसरातील महत्त्वाचे किल्ले असून त्यांच्या माध्यमातून या प्रदेशाचा स्थानिक इतिहास समजून घेण्यास मदत होते. हे किल्ले केवळ लष्करी दृष्ट्या महत्त्वाचे नव्हते, तर ते त्या काळातील प्रशासन, दळणवळण मार्गांचे नियंत्रण आणि सीमाभागाच्या संरक्षणाच्या दृष्टीनेही उपयुक्त ठरले होते. त्यामुळे खानापूर तालुक्यातील या दुर्गांचे ऐतिहासिक, स्थापत्य आणि सांस्कृतिक महत्त्व लक्षात घेऊन त्यांचा सखोल अभ्यास करणे आवश्यक ठरते.

५. भुपाळगड (बाणूरगड)

भुपाळगड हा खानापूर तालुक्यातील एक महत्त्वाचा ऐतिहासिक किल्ला आहे. मराठा साम्राज्याच्या काळात या किल्ल्याला रणनीतीदृष्ट्या विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. इ.स. १६७९ मध्ये येथे मराठा सैन्य आणि मोगल सैन्य यांच्यात संघर्ष झाल्याचे उल्लेख आढळतात.[७] खानापूर तालुक्याच्या ऐतिहासिक भूभागातील भूपाळगड हा एक महत्त्वाचा गिरीदुर्ग असून तो बाणूरगड या उपनावानेही ओळखला जातो. हा किल्ला समुद्रसपाटीपासून सुमारे ७०४ मीटर उंचीवर वसलेला आहे. किल्ल्याच्या पायथ्याशी बाणूर हे गाव आहे. कऱ्हाड–विटा–खानापूर–पळशी–बाणूरगड हा मार्ग किल्ल्याकडे जाण्यासाठी वापरता येतो. तसेच विटा–जत राज्यमार्गावरून पळशी गावाजवळील बाणूरकडे जाणारा फाटा किल्ल्याशी जोडतो. सध्या किल्ल्यावर अनेक वास्तूंचे अवशेष दिसून येतात. रचिव दगडांची तटबंदी, चोर दरवाजा, दिंडी दरवाजा तसेच काही भग्न बांधकामांचे अवशेष येथे आढळतात. या अवशेषांमधून गडाच्या मूळ संरचनेची कल्पना येते. गडावरील काही भाग कालांतराने नष्ट होत चाललेले दिसतात.गडावर बाणेश्वर मंदिर, दीपमाळ, तटबंदी तसेच पाण्याच्या टाक्यांचे अवशेष आढळतात. या वास्तूंमधून त्या काळातील स्थापत्यकौशल्य तसेच धार्मिक परंपरा दिसून येतात.[८]

गडावर असलेली एक समाधी स्थानिक परंपरेनुसार छत्रपती शिवाजी महाराजांचे गुप्तहेर प्रमुख बहिर्जी नाईक यांची असल्याचे मानले जाते. त्यामुळे या स्थळाला ऐतिहासिक तसेच सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले आहे. तथापि उपलब्ध लिखित ऐतिहासिक साधनांमध्ये या समाधीचा स्पष्ट उल्लेख आढळत नसल्यामुळे काही इतिहास संशोधकांमध्ये यासंदर्भात मतभेद असल्याचे दिसून येते.भौगोलिकदृष्ट्या हा किल्ला दुष्काळी व खडकाळ प्रदेशात असल्याने टेहळणी केंद्र तसेच दळणवळण मार्गांच्या संरक्षणासाठी त्याचा उपयोग होत असावा. आजही हा किल्ला स्थानिक लोकांसाठी श्रद्धास्थान असून येथे यात्राही भरते. तथापि किल्ल्याच्या काही भागांची स्थिती ढासळलेली असून संवर्धनाची आवश्यकता आहे.

६. कोळदुर्ग

कोळदुर्ग हा सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील पळशी गावाजवळ स्थित असलेला एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक किल्ला आहे. खानापूर गावापासून सुमारे १५ कि.मी. अंतरावर हा किल्ला असून तो मुख्य डोंगराच्या निसटत्या सोंडेवर वसलेला आहे. किल्ल्याची रचना त्रिकोणी स्वरूपाची असून तो दोन दऱ्यांच्या मधील डोंगर पठारावर वसलेला आहे. किल्ल्याचे क्षेत्रफळ सुमारे ११० एकर इतके आहे.[९] किल्ल्याच्या दोन बाजूंना सुमारे १०० मीटर खोल दऱ्या असल्यामुळे त्या बाजूंना नैसर्गिक संरक्षण प्राप्त झाले आहे. मात्र सपाट भूभाग असलेल्या एका बाजूस तटबंदी व बुरुजांची निर्मिती करण्यात आलेली होती. गडाची तटबंदी सुमारे १३०० मीटर लांबीची असून संपूर्ण गडफेरी अंदाजे ३ किलोमीटर आहे.गडावर पूर्वी महादेव मंदिर अस्तित्वात होते. परंतु सध्या त्या मंदिराचे दगड

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

आणि शिल्पे विखुरलेल्या अवस्थेत आढळतात. काही शिल्पे पळशी गावातील सिद्धनाथ मंदिराच्या बांधकामात वापरण्यात आलेली दिसतात. त्यामध्ये वीरगळ, सतीशिळा, गजलक्ष्मी आणि विविध नक्षीदार शिल्पे आढळतात.[१०]गडावर आढळलेल्या शिलालेखावरून हा किल्ला चालुक्यकालीन असल्याचे दिसून येते. या शिलालेखात चालुक्य राजा "जगदेकमल्ल" याचा उल्लेख असून त्याचा कालखंड इ.स. ११३८ ते ११५० असा आहे. या शिलालेखात एका जैन मुनीला दान दिल्याचा उल्लेख आढळतो. त्यामुळे या परिसरात त्या काळात जैन धर्मीयांचा प्रभाव होता असे दिसून येते.[११]

७. दुर्गपर्यटन आणि शाश्वत विकास खानापूर तालुक्यातील किल्ल्यांमध्ये पर्यटन विकासाची मोठी क्षमता आहे. योग्य नियोजन केल्यास येथे दुर्गपर्यटन, निसर्ग पर्यटन आणि सांस्कृतिक पर्यटन विकसित करता येऊ शकते.

यासाठी पुढील उपाययोजना महत्त्वाच्या ठरू शकतात

- किल्ल्यांचे शास्त्रीय संवर्धन
- स्थानिक युवकांना टूर गाईड प्रशिक्षण
- स्वच्छता व मूलभूत सुविधा निर्माण करणे
- ऐतिहासिक माहिती फलक उभारणे

यामुळे स्थानिक रोजगारनिर्मिती होऊन ग्रामीण विकासाला चालना मिळू शकते.

८. निष्कर्ष

खानापूर तालुक्यातील भुपाळगड आणि कोळदुर्ग हे किल्ले या प्रदेशाच्या समृद्ध ऐतिहासिक वारशाचे प्रतीक आहेत. या किल्ल्यांवर आढळणारे स्थापत्य अवशेष, शिल्पे आणि शिलालेख यांमधून या प्रदेशाचा प्राचीन इतिहास स्पष्ट होतो. योग्य संवर्धन आणि नियोजन केल्यास या किल्ल्यांचा उपयोग पर्यटन विकासासाठी होऊ शकतो. त्यामुळे शासन, स्थानिक संस्था आणि नागरिक यांच्या सहकार्याने या दुर्गांचे जतन करणे अत्यंत आवश्यक आहे.

संदर्भ

१. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर : सांगली जिल्हा, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९६९.

२. संशोधकाची प्रत्यक्ष क्षेत्रीय पाहणी, भूपाळगड (बाणूरगड) व कोळदुर्ग परिसर, दिनांक ६-७/०३/२०२६.

३. डॉ. पी. डी. सोळंकी, पर्यटन आणि विकास, विद्या प्रकाशन, नागपूर, २००८, पृ. ७५.

४. ग. ह. खरे, महाराष्ट्रातील दुर्ग, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८५, पृ. ४१.

५. वि. का. राजवाडे, मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड १, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, १९०३ (पुनर्मुद्रित आवृत्ती २००२), पृ. ११२.

६. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर : सांगली जिल्हा, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९६९, पृ. ४२–४५.

७. Jadunath Sarkar, History of Aurangzeb, Vol. III, M.C. Sarkar & Sons, Calcutta, 1928, pp. 168–172.

८. जयसिंगराव पवार, महाराष्ट्रातील किल्ले, डायमंड प्रकाशन, पुणे, २००९, पृ. ९८–१०१.

९. प्रत्यक्ष क्षेत्रीय पाहणी व स्थानिक माहिती, पळशी व बाणूर गाव परिसर, दिनांक ६-७/०३/२०२६.

१०. पळशी गावातील सिद्धनाथ मंदिरातील शिल्पांचा अभ्यास, क्षेत्रीय निरीक्षण, दिनांक ७/०३/२०२६.

११. कृष्णा गुडदे, कोळदुर्ग शिलालेख अभ्यास, बा-रायगड परिवार संशोधन, यांचेकडील लेख.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

Original Article

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित शिक्षण प्रणाली आणि वाणिज्य शिक्षणातील शाश्वत शिक्षणावर त्यांचा परिणाम

प्रा. ज्ञानेश सुधाकर गवळी
विश्वासराव रणसिंग महाविद्यालय, कळंब – वालचंदनगर, ता. इंदापूर जि.पुणे

Manuscript ID:
JRD -2026-180325
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 3(IV)
Pp. 111-115
March- 2026
Submitted: 15 Feb. 2026
Revised: 25 Feb. 2026
Accepted: 10 Mar. 2026
Published: 31 Mar. 2026

सारांश:

आजच्या डिजिटल युगात कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence – AI) ही शिक्षण क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण तांत्रिक क्रांती मानली जाते. विशेषतः उच्च शिक्षणातील वाणिज्य शिक्षणामध्ये AI आधारित शिक्षण प्रणालींचा वापर वेगाने वाढत आहे. AI आधारित शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या पद्धती, गती आणि आवडी लक्षात घेऊन वैयक्तिक शिक्षण (Personalized Learning) प्रदान करण्यास सक्षम आहेत. त्यामुळे शिक्षण अधिक परिणामकारक, सुलभ आणि गुणवत्तापूर्ण बनते.या संशोधनाचा मुख्य उद्देश वाणिज्य शिक्षणामध्ये AI आधारित शिक्षण प्रणालींचा वापर आणि त्याचा शाश्वत शिक्षणावर होणारा परिणाम अभ्यासणे हा आहे. शाश्वत शिक्षण म्हणजे शिक्षण प्रक्रिया अशी असावी की जी दीर्घकालीन विकास, संसाधनांचा कार्यक्षम वापर आणि सर्वांसाठी समान शैक्षणिक संधी उपलब्ध करून देते. AI तंत्रज्ञान शिक्षण क्षेत्रात नवकल्पना निर्माण करून विद्यार्थ्यांना आधुनिक व्यवसायिक जगासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्यास मदत करते.वाणिज्य शिक्षणामध्ये वित्त, लेखा, व्यवस्थापन आणि व्यवसाय विश्लेषण यांसारख्या विषयांचा अभ्यास केला जातो. AI आधारित प्रणालींच्या मदतीने डेटा विश्लेषण, आर्थिक अंदाज (Financial Forecasting) आणि निर्णय प्रक्रिया अधिक अचूकपणे करता येते. त्यामुळे विद्यार्थ्यांची विश्लेषणात्मक क्षमता, समस्या सोडविण्याची कौशल्ये आणि तांत्रिक ज्ञान वाढण्यास मदत होते.

प्रस्तावना:

२१ व्या शतकात माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल घडून आले आहेत. डिजिटल तंत्रज्ञान, इंटरनेट आणि स्मार्ट उपकरणांच्या वाढत्या वापरामुळे शिक्षण पद्धती अधिक आधुनिक आणि तंत्रज्ञानाधारित बनल्या आहेत. या तंत्रज्ञानांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence – AI) हे एक अत्यंत प्रभावी आणि क्रांतिकारी तंत्रज्ञान मानले जाते. AI मुळे संगणक प्रणालींना मानवी बुद्धिमत्तेसारखी विचार करण्याची, विश्लेषण करण्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता प्राप्त होते. कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे संगणक प्रणालींना मानवी बुद्धिमत्तेसारखी विचार करण्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता देणारे तंत्रज्ञान होय. शिक्षण क्षेत्रात AI चा वापर विद्यार्थ्यांच्या शिकण्याची प्रक्रिया सुधारण्यासाठी केला जातो.शिक्षण क्षेत्रात AI चा वापर वाढत असून विशेषतः उच्च शिक्षणातील वाणिज्य शिक्षणामध्ये त्याचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. AI आधारित शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या प्रक्रियेचा अभ्यास करून त्यानुसार शिक्षण सामग्री आणि मार्गदर्शन प्रदान करतात. यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतांनुसार आणि गरजांनुसार शिक्षण मिळते.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
प्रा. ज्ञानेश सुधाकर गवळी विश्वासराव रणसिंग महाविद्यालय कळंब - वालचंदनगर

How to cite this article:
गवळी, . ज्ञानेश . सुधाकर . (2026). कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित शिक्षण प्रणाली आणि वाणिज्य शिक्षणातील शाश्वत शिक्षणावर त्यांचा परिणाम. Journal of research & development, 18(3(IV)), 111–115. https://doi.org/10.5281/zenodo.20745220

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.20745220
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

तसेच AI प्रणालींमुळे अध्यापन, मूल्यमापन आणि शैक्षणिक व्यवस्थापन प्रक्रिया अधिक कार्यक्षम बनतात.आजच्या काळात शाश्वत विकास (Sustainable Development) हा जागतिक स्तरावर अत्यंत महत्त्वाचा विषय बनला आहे. संयुक्त राष्ट्रांनी (United Nations) ठरवलेल्या शाश्वत विकास उद्दिष्टांपैकी गुणवत्तापूर्ण शिक्षण (Quality Education) हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. शाश्वत शिक्षण म्हणजे असे शिक्षण जे आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय विकासाला प्रोत्साहन देते आणि सर्वांना समान शैक्षणिक संधी उपलब्ध करून देते.

वाणिज्य शिक्षणामध्ये व्यवसाय, वित्त, लेखा, विपणन आणि व्यवस्थापन यांसारख्या विषयांचा अभ्यास केला जातो. आधुनिक व्यवसाय जगात डेटा विश्लेषण, डिजिटल तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे वाणिज्य शिक्षणामध्ये AI आधारित शिक्षण प्रणालींचा समावेश करणे आवश्यक ठरते. AI च्या मदतीने विद्यार्थ्यांना वास्तविक व्यवसायिक परिस्थितीचे विश्लेषण करण्याची क्षमता विकसित होते आणि ते आधुनिक व्यवसाय जगासाठी अधिक सक्षम बनतात.AI आधारित शिक्षण प्रणालींचा वापर केल्यामुळे शिक्षण प्रक्रिया अधिक लवचिक, सुलभ आणि परिणामकारक बनते. उदाहरणार्थ, AI आधारित अॅडॅप्टिव्ह लर्निंग सिस्टम्स विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे विश्लेषण करून त्यांना योग्य शिक्षण सामग्री उपलब्ध करून देतात. तसेच स्वयंचलित मूल्यमापन प्रणाली शिक्षकांचा वेळ वाचवून शिक्षण प्रक्रियेला अधिक कार्यक्षम बनवतात.तथापि, AI चा वापर करताना काही आव्हाने देखील समोर येतात. तांत्रिक पायाभूत सुविधांची कमतरता, डेटा गोपनीयतेचे प्रश्न आणि शिक्षकांना आवश्यक तांत्रिक प्रशिक्षण यांसारख्या अडचणी या क्षेत्रात आढळतात. त्यामुळे AI चा प्रभावी वापर करण्यासाठी शैक्षणिक संस्था, धोरणकर्ते आणि शिक्षकांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.एकूणच, AI आधारित शिक्षण प्रणाली वाणिज्य शिक्षण अधिक आधुनिक, गुणवत्तापूर्ण आणि शाश्वत बनवण्यास मदत करतात. त्यामुळे भविष्यात शाश्वत शिक्षण साध्य करण्यासाठी AI तंत्रज्ञानाची भूमिका अधिक महत्त्वाची ठरणार आहे.AI आधारित शिक्षण प्रणालींचे अनेक फायदे आहेत, जसे की शिक्षणाचे वैयक्तिकीकरण, स्वयंचलित मूल्यमापन प्रणाली, डिजिटल शिक्षण साधने आणि ऑनलाइन शिक्षणाची सुलभता. यामुळे शिक्षण अधिक समावेशक (Inclusive) आणि सुलभ होते. तथापि, तांत्रिक पायाभूत सुविधांचा अभाव, डेटा सुरक्षा आणि शिक्षकांचे तांत्रिक प्रशिक्षण यांसारखी काही आव्हाने देखील या तंत्रज्ञानासमोर आहेत.एकूणच, AI आधारित शिक्षण प्रणाली वाणिज्य शिक्षण अधिक आधुनिक आणि प्रभावी बनवण्यास मदत करतात. त्यामुळे शाश्वत शिक्षणाच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी AI तंत्रज्ञान महत्त्वाची भूमिका बजावू शकते.

संशोधनाचे उद्दिष्टे:

1. वाणिज्य शिक्षणामध्ये AI आधारित शिक्षण प्रणालींचा अभ्यास करणे.
2. AI आधारित शिक्षण प्रणालींचा शाश्वत शिक्षणावर होणारा परिणाम विश्लेषित करणे.
3. वाणिज्य शिक्षणामध्ये AI तंत्रज्ञानाच्या वापराचे फायदे आणि मर्यादा अभ्यासणे.
4. AI आधारित शिक्षण प्रणालींमुळे विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासावर होणारा प्रभाव तपासणे.

संशोधन पद्धती:

या संशोधनासाठी **दुय्यम माहिती** वापरण्यात आली आहे. माहिती खालील स्रोतांमधून गोळा करण्यात आली आहे:

- संशोधन लेख
- पुस्तके

या माहितीचे विश्लेषण करून AI आधारित शिक्षण प्रणालींचा वाणिज्य शिक्षणावर आणि शाश्वत शिक्षणावर होणारा परिणाम अभ्यासण्यात आला आहे.

- **वाणिज्य शिक्षणामध्ये AI आधारित शिक्षण प्रणाली:**

आजच्या डिजिटल युगात कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence – AI) हे शिक्षण क्षेत्रातील एक महत्त्वाचे आणि प्रभावी तंत्रज्ञान बनले आहे. विशेषतः उच्च शिक्षणामध्ये, विशेषतः वाणिज्य (Commerce) शिक्षणात AI आधारित शिक्षण प्रणालींचा वापर वाढत आहे. AI आधारित शिक्षण प्रणाली म्हणजे संगणक तंत्रज्ञान, मशीन लर्निंग, डेटा अॅनालिटिक्स आणि नैसर्गिक भाषा प्रक्रिया (Natural Language Processing) यांचा वापर करून विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या प्रक्रियेला अधिक प्रभावी आणि वैयक्तिक बनवणारी प्रणाली होय.वाणिज्य शिक्षणामध्ये व्यवसाय व्यवस्थापन, लेखा (Accounting), वित्त (Finance), विपणन (Marketing) आणि अर्थशास्त्र यांसारख्या विषयांचा समावेश असतो. आधुनिक व्यवसाय जगात डिजिटल तंत्रज्ञान, डेटा विश्लेषण आणि कृत्रिम

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

बुद्धिमत्ता यांचे महत्त्व वाढत असल्यामुळे वाणिज्य शिक्षणामध्ये AI आधारित शिक्षण प्रणालींचा समावेश करणे अत्यंत आवश्यक ठरले आहे. या प्रणाली विद्यार्थ्यांना आधुनिक व्यवसायिक वातावरण समजून घेण्यास आणि त्यानुसार कौशल्ये विकसित करण्यास मदत करतात.AI आधारित शिक्षण प्रणालींचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे **वैयक्तिकृत शिक्षण** या प्रणाली विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या गती, क्षमता आणि आवडी यांचा अभ्यास करून त्यानुसार शिक्षण सामग्री प्रदान करतात. उदाहरणार्थ, एखाद्या विद्यार्थ्याला लेखा विषय समजण्यात अडचण असल्यास AI प्रणाली त्याला अतिरिक्त सराव, व्हिडिओ किंवा मार्गदर्शन देऊ शकते. यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या गरजेनुसार शिक्षण मिळते.याशिवाय AI आधारित प्रणाली **स्वयंचलित मूल्यमापन** करण्यासही सक्षम आहेत. या प्रणाली विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे मूल्यमापन जलद आणि अचूकपणे करू शकतात. त्यामुळे शिक्षकांचा वेळ वाचतो आणि त्यांना अध्यापन व संशोधनावर अधिक लक्ष केंद्रित करता येते. तसेच AI प्रणाली विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीचे विश्लेषण करून त्यांच्या प्रगतीबद्दल उपयुक्त माहिती प्रदान करतात.वाणिज्य शिक्षणामध्ये AI चा वापर **डेटा विश्लेषण** आणि **व्यवसाय निर्णय प्रक्रिया (Business Decision Making)** शिकवण्यासाठीही केला जातो. उदाहरणार्थ, AI च्या मदतीने बाजारपेठेचे विश्लेषण, वित्तीय अंदाज (Financial Forecasting) आणि ग्राहकांच्या वर्तनाचा अभ्यास करता येतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना वास्तविक व्यवसाय परिस्थितीचे ज्ञान मिळते आणि ते अधिक व्यावहारिक कौशल्ये विकसित करतात.तथापि, AI आधारित शिक्षण प्रणालींच्या वापरास काही मर्यादा देखील आहेत. अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये तांत्रिक पायाभूत सुविधांची कमतरता, इंटरनेटची मर्यादित उपलब्धता आणि शिक्षकांचे तांत्रिक प्रशिक्षण यांसारख्या समस्या आढळतात. तसेच डेटा गोपनीयता आणि नैतिकतेशी संबंधित प्रश्न देखील महत्त्वाचे ठरतात.एकूणच, AI आधारित शिक्षण प्रणाली वाणिज्य शिक्षण अधिक आधुनिक, परिणामकारक आणि कौशल्याधारित बनवतात. या प्रणाली विद्यार्थ्यांना आधुनिक व्यवसाय जगासाठी आवश्यक तांत्रिक आणि विश्लेषणात्मक कौशल्ये विकसित करण्यास मदत करतात. त्यामुळे भविष्यात वाणिज्य शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी AI आधारित शिक्षण प्रणालींची भूमिका अधिक महत्त्वाची ठरणार आहे.

- **AI आधारित शिक्षण प्रणालींचा शाश्वत शिक्षणावर होणारा परिणाम:**

AI (कृत्रिम बुद्धिमत्ता) आधारित शिक्षण प्रणालींमुळे शिक्षण प्रक्रिया अधिक प्रभावी, सुलभ आणि टिकाऊ बनते. शाश्वत शिक्षण म्हणजे दीर्घकालीन विकासाला प्रोत्साहन देणारी, सर्वांसाठी समान संधी निर्माण करणारी आणि संसाधनांचा योग्य वापर करणारी शिक्षण व्यवस्था होय. AI आधारित प्रणाली शाश्वत शिक्षण साध्य करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात.

१. शिक्षणाची सुलभता (Accessibility)

- AI आधारित ऑनलाइन शिक्षण प्लॅटफॉर्ममुळे शिक्षण कोणत्याही ठिकाणाहून उपलब्ध होते.
- ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनाही शिक्षणाची संधी मिळते.
- डिजिटल साधनांमुळे शिक्षण सर्वांसाठी अधिक सुलभ बनते.

२. वैयक्तिकृत शिक्षण (Personalized Learning)

- AI प्रणाली विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या गती आणि क्षमतेनुसार शिक्षण सामग्री उपलब्ध करून देतात.
- प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या गरजेनुसार मार्गदर्शन मिळते.
- त्यामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास अधिक प्रभावी होतो.

३. संसाधनांचा कार्यक्षम वापर (Efficient Use of Resources)

- AI मुळे शिक्षणामध्ये डिजिटल साधनांचा वापर वाढतो.
- कागदाचा वापर कमी होऊन पर्यावरण संरक्षणास मदत होते.
- शैक्षणिक संसाधनांचा योग्य आणि कार्यक्षम वापर करता येतो.

४. शिक्षणातील समावेशकता (Inclusive Education)

- AI आधारित प्रणाली विविध सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक पार्श्वभूमीच्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षण उपलब्ध करतात.
- दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विशेष तंत्रज्ञान उपलब्ध करून देतात.
- त्यामुळे शिक्षण अधिक समावेशक बनते.

५. कौशल्य विकास (Skill Development)

- AI विद्यार्थ्यांमध्ये तांत्रिक कौशल्ये, डेटा विश्लेषण क्षमता आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

- आधुनिक व्यवसाय जगासाठी आवश्यक कौशल्ये विकसित होतात.
- विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढते.

६. शिक्षणाची गुणवत्ता वाढ (Quality Improvement)

- AI आधारित प्रणाली विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे विश्लेषण करून सुधारणा सुचवतात.
- अध्यापन प्रक्रिया अधिक परिणामकारक बनते.
- शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेणे सोपे होते.

७. वेळ आणि खर्चाची बचत

- ऑनलाइन आणि AI आधारित शिक्षणामुळे प्रवासाचा वेळ आणि खर्च कमी होतो.
- स्वयंचलित मूल्यमापनामुळे शिक्षकांचा वेळ वाचतो.

८. शाश्वत विकास उद्दिष्टांना (SDGs) मदत

- AI आधारित शिक्षण प्रणाली संयुक्त राष्ट्रांच्या **SDG-4 (Quality Education)** साध्य करण्यास मदत करतात.
- सर्वांसाठी समान आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध होते.
- **वाणिज्य शिक्षणामध्ये AI तंत्रज्ञानाच्या वापराचे फायदे आणि मर्यादा:**

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानामुळे वाणिज्य शिक्षण अधिक आधुनिक, तंत्रज्ञानाधारित आणि परिणामकारक बनले आहे. AI च्या वापरामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक व्यवसाय जगासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्यास मदत होते. तथापि, या तंत्रज्ञानाचे काही फायदे तसेच काही मर्यादा देखील आहेत.

- **वाणिज्य शिक्षणामध्ये AI तंत्रज्ञानाचे फायदे**

१. **वैयक्तिकृत शिक्षण** (Personalized Learning)

- AI प्रणाली विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या क्षमतेनुसार शिक्षण सामग्री उपलब्ध करून देतात.
- प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या गरजेनुसार मार्गदर्शन मिळते.

२. **जलद आणि अचूक मूल्यमापन** (Automated Assessment)

- AI प्रणाली परीक्षांचे मूल्यमापन जलद आणि अचूकपणे करू शकतात.
- शिक्षकांचा वेळ वाचतो आणि शिक्षण प्रक्रिया अधिक कार्यक्षम होते.

३. **डेटा विश्लेषण कौशल्य विकास**

- AI च्या मदतीने विद्यार्थ्यांना डेटा अॅनालिसिस, वित्तीय अंदाज आणि बाजारपेठेचे विश्लेषण शिकता येते.
- आधुनिक व्यवसाय क्षेत्रासाठी आवश्यक कौशल्ये विकसित होतात.

४. **डिजिटल शिक्षणाची सुलभता**

- ऑनलाइन शिक्षण प्लॅटफॉर्म आणि AI आधारित साधनांमुळे शिक्षण कोणत्याही ठिकाणाहून घेता येते.
- ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही शिक्षणाची संधी मिळते.

५. **अध्यापनाची गुणवत्ता सुधारणा**

- AI विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे विश्लेषण करून शिक्षकांना सुधारणा करण्यास मदत करते.
- अध्यापन अधिक प्रभावी बनते.

६. **आधुनिक व्यवसाय जगासाठी तयारी**

- AI च्या वापरामुळे विद्यार्थ्यांना डिजिटल तंत्रज्ञान, डेटा विश्लेषण आणि निर्णय प्रक्रिया समजते.
- त्यामुळे त्यांची रोजगारक्षमता वाढते.

- **वाणिज्य शिक्षणामध्ये AI तंत्रज्ञानाच्या मर्यादा**

१. **तांत्रिक पायाभूत सुविधांची कमतरता**

- अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये आवश्यक तांत्रिक सुविधा उपलब्ध नसतात.
- इंटरनेट आणि डिजिटल साधनांची मर्यादित उपलब्धता अडथळा ठरते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

२. **डेटा सुरक्षा आणि गोपनीयता**

- AI प्रणाली विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणात डेटा वापरतात.
- त्यामुळे डेटा सुरक्षा आणि गोपनीयतेचे प्रश्न निर्माण होऊ शकतात.

३. **शिक्षकांचे तांत्रिक प्रशिक्षण**

- अनेक शिक्षकांना AI तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण नसते.
- त्यामुळे AI चा प्रभावी वापर होण्यात अडचणी येतात.

४. डिजिटल दरी (Digital Divide)

- सर्व विद्यार्थ्यांकडे स्मार्ट उपकरणे किंवा इंटरनेट सुविधा नसतात.
- त्यामुळे काही विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये अडथळे येऊ शकतात.

५. AI वर जास्त अवलंबित्व

- AI वर जास्त अवलंबून राहिल्यास विद्यार्थ्यांची स्वयंपूर्ण विचार करण्याची क्षमता कमी होण्याची शक्यता असते.

निष्कर्ष:

AI आधारित शिक्षण प्रणाली उच्च शिक्षण क्षेत्रात विशेषतः वाणिज्य शिक्षणामध्ये महत्त्वपूर्ण परिवर्तन घडवून आणत आहेत. या प्रणाली विद्यार्थ्यांना वैयक्तिक शिक्षण अनुभव देतात आणि शिक्षण प्रक्रिया अधिक प्रभावी बनवतात.AI तंत्रज्ञानामुळे शिक्षण अधिक सुलभ, परवडणारे आणि समावेशक बनते, जे शाश्वत शिक्षणासाठी अत्यंत आवश्यक आहे. तथापि, AI चा प्रभावी वापर करण्यासाठी शैक्षणिक संस्था, शिक्षक आणि धोरणकर्त्यांनी योग्य पायाभूत सुविधा, प्रशिक्षण आणि नैतिक मार्गदर्शक तत्त्वे विकसित करणे आवश्यक आहे.भविष्यात AI आधारित शिक्षण प्रणाली वाणिज्य शिक्षण अधिक आधुनिक, संशोधनाभिमुख आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवतील.

संदर्भ

1. कृत्रिम बुद्धिमत्ता : तत्त्वे व उपयोग – डॉ. सुनील भोसले
2. AI ची मूलभूत संकल्पना, तंत्रज्ञान आणि शिक्षणातील उपयोग यावर माहिती
3. शैक्षणिक तंत्रज्ञान – डॉ. एस. के. मंगरुळकर
4. ई-लर्निंग, डिजिटल शिक्षण, स्मार्ट क्लासरूम आणि आधुनिक शिक्षण पद्धतींचे स्पष्टीकरण.
5. आधुनिक शैक्षणिक तंत्रज्ञान – डॉ. आर. ए. शर्मा (मराठी अनुवाद)
6. शिक्षणातील तंत्रज्ञानाचा वापर व त्याचा परिणाम.
7. वाणिज्य शिक्षणाचे तत्त्वज्ञान व पद्धती – डॉ. पी. डी. कुलकर्णी
8. वाणिज्य शिक्षणाची रचना, पद्धती व बदलत्या गरजा.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

Original Article

काळया निळया रेषा:आत्मकथनातील व्यक्तिचित्रणे

डॉ. संदीप वाकडे
पुणे

Manuscript ID:
JRD -2026-180326
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 3(IV)
Pp. 116-118
March- 2026
Submitted: 15 Feb. 2026
Revised: 25 Feb. 2026
Accepted: 10 Mar. 2026
Published: 31 Mar. 2026

सारांश

आजपर्यंतच्या दलित साहित्यातून वेदना, विद्रोह, नकार पाहायला मिळतो. पण 'काळया निळया रेषा' या राजू बाविस्कर यांच्या साहित्यकृतीतून वेदना दिसतात. पण त्या मांडताना बंडाची भाषा न वापरता लेखक मावळवादी भूमिकेतून मांडतो. वाचकालाच आत्मपरीक्षण करायला लावतो. वाचकालाच यातील पात्रांच्या माध्यमातून त्यांच्या दबलेल्या, पिचलेल्या जीवनाचा हुंकार ऐकवतो. हे आत्मकथन वाचताना लेखक स्वतःबरोबरच वाचकालाही प्रश्नांच्या गुंत्यात अडकवून खऱ्या खोट्या मुखवट्यांचा सांगाडा न्यायालयाच्या कक्षेत उभा करून वाचकालाच न्यायाधीश बनवितो व न्यायनिवाडाही तुम्हीच करा असेही सुचवितो.

आजपर्यंत दलित आत्मकथनांतून गावकुसाबाहेरील जीवनाचे चित्रण आलेले असले तरी अलीकडच्या काळात हे चित्रण फारसे येताना दिसत नाही. राजू बाविस्कर यांचे आत्मकथन २१ व्या शतकातील गावकुसाबाहेरील जीवनाचे चित्रण करते. याविषयी आत्मकथनाच्या प्रस्तावनेत प्रफुल्ल शिलेदार म्हणतात की, "साठच्या दशकात आलेल्या आत्मकथनांच्या जोरकस लाटेनंतर दीर्घकाळाने आपल्याला या परंपरेत अत्यंत वेगळे आणि सकस लेखन वाचायला मिळते आहे."१ सुरुवातीला चित्रांच्या माध्यमातून व्यक्त होणारे बाविस्कर नंतर भाषेच्या माध्यमातून व्यक्त होऊ लागले व यातून या आत्मकथनाची निर्मिती झाली. अशा या आत्मकथनातून त्यांच्या सौम्य भाषेतून पण विचार करायला भाग पाडणाऱ्या लेखनातून सातपुडा पर्वत रांगेतील वसलेल्या जळगाव जिल्ह्यातील लासुर या गावाचे व गावकुसाबाहेरील समाजाचे त्यांनी रेखाटलेल्या चित्रणाचा शोध येथे घेतलेला आहे.आत्मकथनात लेखकाने त्याला त्याच्या आयुष्यात, प्रवासात भेटलेल्या विविध व्यक्ती चित्रणांच्या माध्यमातून तत्कालीन परिस्थितीतील जीवन, मानवीस्वभाव, समाज, दारिद्र्य, माणुसकी, सहनशीलता, सोशिकता, कष्टाळूपणा, इमानदारी इत्यादींचे दर्शन वाचकाला तो घडवितो. यातून तो स्त्री व पुरुष व्यक्तचित्रणांतील गुण-दोष स्वभाव वैशिष्ट्यांच्या माध्यमातून तो तत्कालीन समाजस्थिती रेखाटतो.

प्रस्तावना

मराठी आत्मकथन साहित्यामध्ये व्यक्तिचित्रणाला विशेष महत्त्व प्राप्त झालेले दिसते. व्यक्तीच्या जीवनानुभवांमधून समाज, संस्कृती, नाती-गोती, संघर्ष आणि मूल्यव्यवस्था यांचे प्रतिबिंब स्पष्टपणे उमटत असते. काळया निळया रेषा हे आत्मकथन अशाच जीवनानुभवांचे संवेदनशील आणि वास्तववादी चित्रण करणारे साहित्यकृती म्हणून ओळखले जाते. या आत्मकथनात लेखकाने स्वतःच्या जीवनप्रवासातील विविध व्यक्तींना केंद्रस्थानी ठेवून त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यांचे, भावविश्वाचे आणि सामाजिक परिस्थितीचे प्रभावी चित्रण केले आहे.या आत्मकथनातील व्यक्तिचित्रणे केवळ व्यक्तींच्या बाह्य स्वरूपाचे वर्णन करत नाहीत, तर त्यांच्या मानसिकता, जीवनसंघर्ष, सामाजिक स्तर आणि मानवी नात्यांतील गुंतागुंत यांचेही दर्शन घडवतात. लेखकाच्या बालपणापासून ते प्रौढत्वापर्यंत भेटलेल्या कुटुंबीय, मित्र, शिक्षक, समाजातील सामान्य माणसे आणि उपेक्षित घटक यांचे वास्तववादी व जिवंत चित्रण येथे आढळते. त्यामुळे आत्मकथन वैयक्तिक अनुभवापुरते मर्यादित न राहता व्यापक सामाजिक दस्तऐवजाचे रूप धारण करते.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. संदीप वाकडे पुणे

How to cite this article:
वाकडे, . संदीप . (2026). काळया निळया रेषा:आत्मकथनातील व्यक्तिचित्रणे. Journal of research & development, 18(3(IV)), 116–118. https://doi.org/10.5281/zenodo.20745327

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.20745327
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

काळया निळया रेषा या आत्मकथनातील व्यक्तिचित्रणातून समाजातील विषमता, संघर्ष, माणुसकी, संवेदनशीलता आणि परिवर्तनाची प्रक्रिया स्पष्ट होते. लेखकाच्या निरीक्षणशक्तीमुळे आणि भाषाशैलीतील साधेपणामुळे ही व्यक्तिचित्रणे वाचकांच्या मनात दीर्घकाळ ठसा उमटवतात. म्हणूनच या साहित्यकृतीतील व्यक्तिचित्रणे आत्मकथन साहित्याच्या अभ्यासासाठी महत्त्वपूर्ण ठरतात.या लेखामध्ये काळया निळया रेषा या आत्मकथनातील व्यक्तिचित्रणांचा अभ्यास करून त्यांची वैशिष्ट्ये, सामाजिक आशय, भावनिक स्तर आणि साहित्यिक मूल्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

अ) स्त्री चित्रण:

या आत्मकथनातून येणारी स्त्री ही सोशिक, संवेदनशील जे आहे त्यात समाधान मानणारी, दुःखाला कवटाळून विनातक्रार जीवन कंठणारी दिसते. यामध्ये स्वतःची मुले जगत नाहीत म्हणून स्वतःलाच दोष देत आपल्याच नवऱ्याचे दुसरे लग्न करून स्वतःला सवत घेऊन येणारी लेखकाची आई 'अनेबाई', मनमिळावू स्वभावाची, नवऱ्यावर नितांत प्रेम करणारी पण नवऱ्याच्या चुकीमुळे वेडी होणारी 'कमली', सासरच्या त्रासाला कंटाळलेली, पोटाच्या आजाराने त्रस्त असलेली तरीही विना तक्रार संसाराचा गाडा हाकणारी, शेवटी पोटाच्या दुखण्यातच मरण पावणारी, लेखकाची मोठी बहीण 'नबा', मनमिळाऊ, लेखकाला आईसारखी माया लावणारी पण निपुत्रिक असल्याकारणाने एकाकी जीवन जगणारी, आयुष्यभर माणुसकी जपणाऱ्या विमला मावशीला तिच्या शेवटच्या क्षणी कोणीही माणुसकी दाखवत नाही, अशी ही एकाकी जीवन कंठणारी भिल्ल समाजातील 'विमला मावशी', मनमोकळेपणाने, खुल्या मनाने वागणारी पण तिच्या या अशा बिनधास्त स्वभावामुळे नवऱ्याने सोडून दिलेली, झाडू विकणारी, आकडा लावणारी, लेखक व त्याच्यासारख्या कित्येक मुलांना जीव लावणारी, नदीच्या पुरात तिच्या पत्र्याच्या घरासकट वाहून जाणारी 'धुपी'(द्रौपदी), जुगाराची आवड असणारी, मूलबाळ नसलेली, बिनधास्त स्वभावाची, स्वतः कष्ट करून पोट भरणारी, दिसायला आणि वागायलाही सुंदर असणारी 'रानू', सौंदर्याची खाण असणारी, सातवी शिकलेली, बापाच्या अकाली निधनाने जबाबदारीने वागणारी, पुढे टीबीच्या आजाराने निधन पावणारी 'हिरा शिनकर', जाती-धर्माची बंधने तोडून लेखकाला मुलाप्रमाणे जीव लावणारी, नवऱ्याकडून, लेकाकडून निराश झालेली, म्हातारपणी एकटी पडलेली 'जसूकाकू' या स्त्रियांच्या माध्यमातून लेखक आत्मकथनातून तत्कालीन स्त्री परिस्थितीचे तिच्या सोशीक, संवेदनशील स्वभावाचे, कष्टाळू, दोषी नसतानाही स्वतःला दोषी ठरवून जीवन कंठणाऱ्या महिलांचे चित्रण रेखाटतो. ते रेखाटत असताना प्रश्नही उपस्थित करतो. जसे की "कमली प्रेमाने वेडी झाली होती का? की तिच्या डोक्याला मार लागला होता म्हणून ती अशी झाली असेल..?"[२] यातून कमली या व्यक्तिरेखेविषयी तो प्रश्न उपस्थित करतो. असे कितीतरी प्रश्न विचारतो. तो वाचकाला विचार करायला भाग पाडतो. हे विशेष.

ब) पुरुष चित्रण:

या आत्मकथनातून येणारी पुरुष चित्रेणे ही येणाऱ्या परिस्थितीला सामोरे जाणारी, कष्टाला प्राधान्य देणारी, जास्त नाही पण अल्प प्रमाणात का होईना व्यसनाधीनतेकडे झुकलेली, थोडाफार का होईना पुरुषी अहंकार बाळगणारी, काही जबाबदारी घेणारी तर काही जबाबदारी झटकणारी, आपलं काम आणि आपण असं वागणारी, काही लबाड प्रवृत्तीची तर काही कितीही कसलेही संकट आले तरी इमानदारीची कास न सोडणारी, एकमेकाला आधार देणारी, एकूणच तत्कालीन परिस्थितीला अनुसरूनच त्यांच्यात बदल घडत गेल्याचे जाणवते. यामध्ये आनंद यादव यांच्या 'गोतावळा' यातील 'नारबा' या पात्राप्रमाणे शेतीमातीशी एकरूप झालेला 'धुडक्या', गावकीच्या कामांना झिडकारून चोऱ्यामाऱ्या करून जगणारा, पोलिसी चौकशीला सामोरा जाणारा, स्वतःच्या एकुलता एका मुलीच्या आजारपणामुळे थकणारा 'रंगू भाई', जुनी सातवी पास असणारा, शिक्षणाचे महत्व जाणणारा पण पुढे नोकरी न करता शेतकऱ्यांच्या बैल जोड्या चोरून विकणारा, टापटीप राहणारा, पोलिसांच्या पाठलागात कायमचा पाय गमावून बसणारा, "हालअपेष्टा, गरिबी हीच खंड्याबाप्पाला या मार्गाला घेऊन गेली असेल का?"[३] असा ज्याच्याविषयी लेखकाला प्रश्न पडतो तो 'खंड्याबाप्पा', गावातील सण-समारंभावेळी होणाऱ्या उस्तव समारंभातील देवदेवतांच्या देखाव्याच्या माध्यमातून लेखक वाचकाला माणुसकीन रमणारा गाव माणुसकीहीन कधी झाला? याचे दर्शन ज्या व्यक्तिच्या माध्यमातून दाखवतो ती 'सिकंदर काका' व 'पांडू काका', दूरवरुन लेखक राहत असलेल्या भिलाटी वस्तीत कुल्फी विकायला येणारा, तेथील लहान मुलांवर प्रेम करणारा, मुलांना आवडणारा, सत्रासेनच्या घाटात चोरट्यांकडून लुटला गेलेला, या झटापटीत पायाला जखमा झाल्यामुळे पुढे कधीच भिलाटी वस्तीत कुल्फी विकायला न येणारा 'गुल्फीवाला कालू चाचा', देवरुषपणा करणारा 'शिवा भगत', बँड पथकात 'ट्रंपेट' आणि 'क्लारनेट' वाजवणारा, मूलबाळ नसल्यामुळे व्यसनात बुडालेला, पुढे त्यातच निधन पावणारा 'झिंग्या काका', चिलम ओढणारा, पहाडातून अंजनचा (वनस्पती)पाला ओरपून विकणारा, स्वतःशीच बडबड करणारा, शाळेतील कवायतीचे सामान विहिरीत फेकणारा, 'चिल्या', जन्मताःच चेहऱ्यावर चट्टा असलेला,

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

नामांकित गुलाब पेंटरची चित्रे पाहण्यासाठी लेखकाला मदत करणारा, बकऱ्या वळणारा, वीज पडून मृत्यू पावणारा लेखकाचा मित्र 'चट्टा', गावातील श्रीमंत व्यक्तीच्या मौतीवेळी उधळलेल्या कवड्या गोळा करताना बोट तुटलेला 'तीन बोट्या', स्मशानातील प्रेताचं सोनं शोधण्यासाठी लहान मुलांची टीम बनवणारा 'जाड्या रम्या', बँड पथकात गोले वाजवणारा, शरीरयष्टीने किरकोळ असणारा, बँड पथकातल्या पोरांचे मनोरंजन करणारा, अंधश्रद्धेमुळे दवाखान्यात न जाता पोटाचा आजार वाढून मरण पावणारा 'इव-या', लेखकाला ट्रंपेटचे शास्त्रीय ज्ञान शिकवण्यासाठी शास्त्रीय ज्ञान शिकवणाऱ्या गुरूंकडे नेणारा, आईच्या आजारपणामुळे, घरच्या बिकट परिस्थितीमुळे शिकण्याची इच्छा असूनही न शिकणारा 'डीग्या', तोतरा बोलणारा, वेडसरपणे वागणारा, सांगेल ते काम करणारा, राग आला की कोणतच काम न करणार, बँड पथकातील वस्तूंची ने-आण करणारा, सनकी, तितकाच मेहनती पण प्रामाणिक स्वभावाचा भिल्ल जमातीतील 'मल्या', दिलखुलास, मनमोकळ्या स्वभावाचा, सायकल दुरुस्तीचे काम करणारा, एखाद्याची तोंड भरून स्तुती करणारा, वाईटाला तोंडावरच बोलणारा, लेखकातील चित्रकार हेरुन गावातील मरीमातेच्या मंदिरातील भिंतीवर मरीमातेचं चित्र काढायला लावणारा 'माधू आप्पा', चित्र काढायची आवड असणारा, चित्रातील बारकावे लेखकाला सांगणारा 'रवी पेंटर', तर चौथी पास असणारा, तमाशा व कीर्तनाचा शौक असणारा, शिक्षणाचे महत्त्व समजलेला कष्टाळू, इमानदार, प्रामाणिक, सट्टा खेळणारा, बँड पथक धाडसाने उभा करणारा, आपल्या मुलांना चांगले शिक्षण देणारा, व्यसनाकडे झुकलेला लेखकाचा बाप 'बाबुराव' अशाप्रकारे लेखक स्वतःच्या जीवन प्रवासात भेटलेल्या या व्यक्तिरेखांविषयी या आत्मकथनातून सांगतो.

समारोप:

एकूनच लेखक राजू बाविस्कर हे आपल्या 'काळया निळया रेषा' या आत्मकथनातून ते स्वतः राहत असलेल्या परिसरातील लोकांचे जिवन यातून येणाऱ्या व्यक्तीरेखांच्या माध्यमातून रेखाटतात.

संदर्भ

बावीस्कर राजू, 'काळया निळया रेषा' राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, जून २०२२, पृष्ठ क्र. १०

१. तत्रैव, पृष्ठ क्र. ४६

२. तत्रैव, पृष्ठ क्र. ७१

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

Original Article

मराठी ज्ञान भाषा आणि उच्चशिक्षण

प्रा. सारिका अशोक पाटील
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय भिगवण

Manuscript ID:
JRD -2026-180327
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 3(IV)
Pp. 119-121
March- 2026
Submitted: 15 Feb. 2026
Revised: 25 Feb. 2026
Accepted: 10 Mar. 2026
Published: 31 Mar. 2026

सारांश

मराठी ही केवळ संवादाची भाषा नसून ज्ञाननिर्मिती, संशोधन आणि बौद्धिक विकासासाठी सक्षम ज्ञानभाषा आहे. उच्चशिक्षणाच्या क्षेत्रात मातृभाषेचा वापर विद्यार्थ्यांच्या आकलनक्षमतेत, विचारक्षमतेत आणि सर्जनशीलतेत वाढ घडवून आणतो. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर इंग्रजी भाषेचे महत्त्व वाढले असले तरी स्थानिक भाषांमध्ये ज्ञाननिर्मिती आणि प्रसार होणे ही शैक्षणिक समतेसाठी आवश्यक बाब आहे.मराठी ज्ञानभाषा म्हणून विकसित करण्यासाठी शैक्षणिक साहित्यनिर्मिती, तांत्रिक संज्ञाविकास, अनुवाद कार्य, संशोधन लेखन आणि डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर आवश्यक आहे. नवीन शैक्षणिक धोरणांमध्ये मातृभाषेत शिक्षणावर दिलेला भर मराठी भाषेसाठी संधी निर्माण करणारा ठरतो. विद्यार्थ्यांना त्यांच्या भाषेत शिक्षण मिळाल्यास ज्ञान अधिक सखोलपणे आत्मसात होते आणि संशोधनाला स्थानिक संदर्भ प्राप्त होतात.उच्चशिक्षणात मराठीचा वापर वाढविल्यास ज्ञानाचे लोकशाहीकरण, सांस्कृतिक जतन आणि बौद्धिक स्वावलंबन साध्य होऊ शकते. त्यामुळे मराठीला ज्ञानभाषा म्हणून बळकट करणे ही काळाची गरज असून शिक्षणसंस्था, शासन, संशोधक आणि समाज यांचा समन्वित सहभाग आवश्यक ठरतो.

प्रस्तावना

आमच्या देशातले उच्च शिक्षण हे मातृभाषेतून झाले पाहिजे. शिक्षण आम्हाला समाजाच्या खालच्या थरापर्यंत पोहोचवायची असेल तर परक्या भाषेतून इथपर्यंत जाणार कसे? आम्हाला सामान्य माणसाला मोठे करायचे आहे .पण अशाने सामान्य माणूस मोठा कसा होणार ?त्याची सुरुवातीची सगळी शक्ती जर परकी भाषा शिकण्यात निघून गेली तर तो पुढे काय करणार आहे. याचा खरोखर अधिक खोलवर विचार झाला पाहिजे. ज्ञानभाषा आणि लोकभाषा एक झाल्याशिवाय समाजाचे जीवन समर्थ होत नाही, उन्नत होत नाही ,विकसित होत नाही. तेव्हा ही लोकभाषा ज्ञानभाषा होणार नसेल तर ज्ञान भाषा हा त्यांचा मक्ता होता.त्यांचे संस्कार आणि त्यांचे साम्राज्य संस्कृतीक जीवनामध्येही निर्माण होईल ते होऊ देता कामा नये असे माझे स्वतःचे खंबीर मत आहे. असे यशवंतराव चव्हाण यांनी 'युगांतर 'या मासिकात म्हटले आहे.मराठी हि केवळ संवादाची लोकभाषा नसून ती अत्यंत प्राचीन समृद्ध आणि समर्थ ज्ञानभाषा आहे. सुमारे अडीच हजार वर्षाचा इतिहास असलेली मराठी संत साहित्यपासून आधुनिक विज्ञानापर्यंतचे ज्ञान समर्थपणे मांडू शकते. तंत्रज्ञान शिक्षण व प्रशासनात मराठीचा वापर वाढवून तिला खऱ्या अर्थाने ज्ञान भाषा म्हणून विकसित करण्याचीगरज आहे .मराठी भाषा आणि साहित्य चा विचार करता या साहित्याने अपरिहार्यता म्हणून वेळोवेळी नवे तंत्रज्ञान आणि नव विचारांचा स्वीकार कलेला दिसून येतो.या संदर्भात मु. श्री .कानडे यांनी मराठीचा भाषिक अभ्यास या ग्रंथांमध्ये पुढील योजना केले आहे. मध्य युगीन काळत नाथ संप्रदाय महानुभाव वारकरी दत्त समर्थ आणि ख्रिस्ती संप्रदायाच्या वैशिष्ट्यपूर्ण तत्वज्ञानातून झालेली अध्यात्मिक साहित्य निर्मिती मुस्लिम सत्तेच्या बरोबर स्वीकारलेला कला, साहित्य आणि भाषाविषयक नवा दृष्टिकोन किंवा इंग्रजी सत्तेच्या रूपाने झालेला आधुनिक युगाचा आरंभ वैज्ञानिक आणि सामाजिक दृष्टिकोनाचा स्वीकार केल्याने झालेली साहित्य निर्मिती सामाजिक वास्तवा औद्योगीकरणाच्यावर दुष्परिणामा बरोबरच फ्राईड मार्क्सवाद,

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
प्रा. सारिका अशोक पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय भिगवण

How to cite this article:
पाटील, . सारिका . अशोक . (2026). मराठी ज्ञान भाषा आणि उच्चशिक्षण. Journal of research & development, 18(3(IV)), 119–121. https://doi.org/10.5281/zenodo.20745486

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.20745486
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

गांधीवाद आंबेडकरवाद आधारित आणि भारतीय संविधानाच्या अंगीकारणाने मराठी साहित्याचा परिघ विस्तारित केल्याचे अनुभवाचे ते थोडक्यात मराठी साहित्याने परिवर्तनाची भूमिका स्वीकारल्यामुळे साहित्य जाणीव विस्तारित होऊन प्रस्थापित जीवन जाणीवांकडून स्त्री जीवन मध्यमवर्गीय कष्टकरी दलित, ग्रामीण आणि आदिवासी जीवन जाणीव साहित्याची केंद्र बनल्याचे दिसून येते.मराठी ही देशातील जवळपास एक दशांश लोकांची मातृभाषा आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात व संस्कृतीत तिचे अजोड स्थान आहे. मराठी भाषेचा विचार हा केवळ माध्यमंपुरता मर्यादित नाही, तसा कोणत्याच भाषेचा विचार माध्यमांपुरता सीमित राहू शकत नाही.भाषेचा विचार भाषेच्या इतिहासाइतका मागे जातो. भूतकाळाच्या प्रकाशातच वर्तमान काळाला आणि भविष्यकाळालाही अर्थ लाभ होत असतो. भाषेत जन्माला येणारे वांग्मय भाषेच्या स्वरूपात विवक्षित रूप लाभण्यास सहाय्यकारी ठरत असते . वेगवेगळ्या काळातील राजकीय धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती भाषेच्या जडणघडणीवर परिणाम करत असते.उदाहरणार्थ तेराव्या शतकात महानुभाव संप्रदायाने महाराष्ट्र असावे असा आग्रह धरला आणि संस्कृत ऐवजी मराठीत ग्रंथरचना करण्याचे धोरण अवलंबले. तुमचा आकस्मात मी नेणेगा; मज श्री चक्रधरे निरूपिली मरहाठी:तियाचि पुसा : असा मराठी भाषेचा आग्रह भटोबासांनी धरला होता.यादव राजाच्या काळात मराठी भाषेची भरभराट झाली संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी माझा मराठीची बोलू कौतुकी ! परी अमृतातही पैजा जिंके!ऐशी अक्षरे रसिके मेळविन! अशी प्रतिज्ञा केली.मराठ्यांनी अटकेपार झेंडे लावण्यापूर्वी साडेतीनशे वर्ष अगोदरच संत नामदेवांनी पंढरपूरचा पांडुरंग पंजाबला मेला आणि मिश्र मराठी भाषेत काव्यरचना केली. संत एकनाथांनी एक नाथी भागवतात हे टीका तरी मराठी!परी ज्ञानदाने होईल काठी!असा विश्वास व्यक्त केला असे आणखीही तपशील सांगता येतील मुख्य मुद्दा असा की भाषेला केवळ संज्ञापनाचेच अंग नसते अस्मितेची ही बलवत तर अंग असते आणि ते दुर्लक्षन्या जोगे नसते.त्यामुळे स्वतंत्र मराठी भाषिक महाराष्ट्र राज्य जेव्हा 1 मे 1960 अस्तित्वात आले. तेव्हा राज्याचा अग्रक्रम मराठी भाषा व संवर्धन आणि विकासाचा असणे अपेक्षित होते, याची लख्ख जाणीव देवाशी मुंबई राज्याचे मुख्यमंत्री असतानाही यशवंतराव चव्हाण यांना होती . त्याचे प्रतिबिंब दिनांक 13 फेब्रुवारी 1960 रोजी विदर्भ साहित्य संमेलनाच्या उद्घाटन पर भाषणात पडलेले दिसून येते.पुढील काळात म्हणजे दिनांक. 7 सप्टेंबर 1967 मध्ये कोपरगाव येथे एका महाविद्यालयाच्या पायाभरणी समारंभात लोकभाषा हीच ज्ञान भाषा या विषयावरील केलेल्या भाषणात मराठीच्या संदर्भात एक महत्त्वाचा विचार यशवंतराव चव्हाण यांनी पुढील शब्दात सूत्ररूपाने मांडला होता. मी हे सांगू इच्छितो की शिक्षणासह सर्व शिक्षण हे मातृभाषेतून झाले पाहिजे "मी हे सांगू इच्छितो की शिक्षणासह सर्व शिक्षण हे मातृभाषेतून झाले पाहिजे ज्ञानभाषा लोकभाषा एक झाल्या विना आपल्या समाजाचे जीवन कदापि समर्थ उन्नत आणि विकसित होऊ शकणार नाही."

स्वतंत्र महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांच्या काळात 1960 ते 62 त्यांच्या दृष्ट्या नेतृत्वाखाली मराठी भाषा आणि संस्कृतीच्या विकासाला वेगाने प्रारंभ झाला . प्रशासकीय कारभार मराठीतून करण्यासाठी शासन व्यवहार कोश तयार करण्यात आला. राज्यकारभाराच्या भाषेतील बदल सुकरतेने योजनाराज्यकारभाराच्या भाषेतील बदल सुकरतेने योजना पद्धतीने आणि निश्चित कालावधीत घडवून आणण्यासाठी आणि भाषा विकासासाठी भाषा संचालनालय स्थापन करण्यात आले.जगातल्या विविध भाषातील अभिषत्वामुळे आणि वैचारिक शास्त्रीय ग्रंथ मराठीत भाषांतरित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ स्थापन केले गेले. मराठीत विश्वकोश आणि मराठी भाषेचा ग्रहण शब्दकोश तयार करण्याचे कार्य हाती घेण्यात आले. मराठी लेखन विषयक नियमातले अराजक नष्ट करून शस्त्रशुद्ध असे लेखन विषयक नियम तयार करण्याची जबाबदारी साहित्य महामंडळावर सोपवण्यातत आली मुख्य म्हणजे कला आणि वाणिज्य विद्या शाखा च्या शिक्षणाचे माध्यम मराठी करण्यात आले. हे मध्यम यशस्वी व्हावे म्हणून मराठीत पाठ्यपुस्तक संज्ञा निश्चित करण्यासाठी तज्ञाच्या समित्या नेमण्यात आल्या. एकूणच मराठी ही लोकभाषा ज्ञानभाषा होण्यासाठी हे सर्व उपक्रम होते. मराठीचे एक ख्यातनाम विचारवंत व समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांनी भाषा संपन्नतेचे सूत्र सांगताना म्हटले आहे.कौटुंबिक व्यवहार सार्वजनिक व्यवहार आणि शीर्षस्थ व्यवहार अशी मानवी समाजाची तीन जीवन क्षत्रे असतात.बाजारात आणि रस्त्यावर होणारे सर्व व्यवहार हे सर्वजनिक व्यवहार असतात. ती भाषा जीवनाच्या या तिन्ही क्षेत्रात उपयोजली जाते तीच भाषा सर्वार्थाने संपन्न असते .तही सातत्याने विकसित होत असणाऱ्या ज्ञान क्षेत्रात वापरली जाणारी भाषा अधिक संपन्न बनलेली वस्ती ज्ञान क्षेत्रातील पाश्चात्य भाषेच्या वापरामुळे त्या अधिक संपन्न झाल्या आहेत जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रातील वापरासाठी त्या भाषेत शब्दसंग्रह वाक्यजीवनाच्या प्रत्येक क्षेत्रातील वापरासाठी त्या भाषेत शब्दसंग्रह वाक्य प्रयोग निर्माण झालेले असतात जर ती भाषा एखाद्या जीवन क्षेत्रात वापरली जाईन अशी झाली तर त्या भाषेची संपन्न ता तेवढ्यापुरती कमी होते. शासन सोडल्यास अर्थ आणि ज्ञान या शीर्षस्थ क्षेत्रात महाराष्ट्रात मराठी भाषा वापरली जात नाही.आता तर सार्वजनिक क्षेत्रात सुद्धा वापरली जाईनाशी झाली आहे. मातृभाषेतूनच शिक्षण का याची डॉ. सुधीर रसाळ यांनी पुढील प्रमाणे तर्क शुद्ध असे पद्धतीने मते् प्रतिपादली आहेत.'केवळ मातृभाषेतून शिक्षण का हे नीट समजून घेणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याला विषय नीट करण्यासाठी शिक्षणातृभाषेतून दिले गेले पाहिजे. असे सर्व शिक्षण तज्ञ म्हणतणत असतात मग यावर असाही युक्तिवाद केला जातो, की जर इंग्रजीवर प्रभुत्व असेल तर इंग्रजीतून शिकवला गेलेला विषय चांगल्या प्रकारे कळेल म्हणून आधी विद्यार्थ्यांची इंग्रजीकळेल म्हणून आधी विद्यार्थ्यांची इंग्रजीची चांगली विद्यार्थ्यांची करून तयारी घेतली पाहिजे. केवळ विषय केवळ करणे नीट कळणे मातृभाषेचा शिक्षण देण्याचा मूळ उद्देश नाही .मातृभाषा हीच माणसाची एकमेव ज्ञान भाषा असते .ज्ञान भाषा म्हणून मातृभाषेची जागा अन्य भाषा घेऊ शकत नाहीत म्हणून जी नैसर्गिक रित्या माणसाच्या ज्ञानभाषा असते आपली मातृभाषा आपल्या संज्ञा प्रवाहाचे मध्यम असते. आपल्याला स्वप्न ही मातृभाषेतूनच पडत असतात .आपले उस्फुर्त उद्गार मातृभाषेतून निघत असतात. हात, पाय ,नाक, डोळे या अवयवाप्रमाणे मातृभाषा ही आपला नैसर्गिक अवयव बनवून गेलेली असते.आपण या निर्मिती आणि वांग्मय निर्मिती ही मातृभाषेतून करू शकतो. आपल्या देशात उत्तम प्रतीचे संशोधन होत नाही. कुठल्याही सामाजिक विज्ञानामध्ये आपले अभ्यासक मूलभूत वर घालत नाहीत या क्षेत्रात आपले स्थान दुय्यमच

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

राहत आले.भाषण विज्ञानापासून ते तंत्रज्ञान समीक्षा यापर्यंतत सर्वांचे ज्ञान पाश्यात त्याकडून आयात करत आलो. भारतीयांच्या इंग्रजी भाषेत होणाऱ्यासर्वांचे ज्ञान 57 कडून आयात करत आलो भारतीयांच्या इंग्रजी भाषेत होणाऱ्या वास्तव निर्मितीची साधी दखलही साधी समीक्षक घेत नाहीत कारण त्यांना ते त्या लायकीचे वाटत नाहीत हा सर्व परभाषेतून परभाषेतून घेतल्याचा शिक्षण आहे आपणास जर संस्कृती प्रतिष्ठा प्राप्त करून घ्यायची असेल तर नव सर्जनआपणास जर संस्कृतीक प्रतिष्ठा प्राप्त करून घ्यायची असेल तर नव सर्जनक्षम स्वरूपाचे ज्ञान आपण मिळवले पाहिजे असे ज्ञान फक्त मातृभाषेतूनच मिळत असते त्यासाठी मातृभाषा हे शिक्षणाचे माध्यम झाले पाहिजे जर झाले तर आपल्या मातृभाषेतून आपण स्वतंत्रपणे वैज्ञानिक संशोधन करू आणि ज्ञान क्षेत्रात क्षेत्रात ही सन्मानपूर्वक नोंद व्हायला लागेल.

केवळ शिक्षणाचे नव्हे तर सर्व लोक व्यवहाराचे होता होईल तेवढी मराठीकरण होणे आवश्यक आहे.लोकशाही जीवन पद्धतीचे जतन संवर्धन होने यावर अवलंबून आहे.त्यासाठी मराठीत्यासाठी मराठीत्यासाठी अस्मिता प्रत्येक महाराष्ट्रीयन महाराष्ट्रीयन व व संपर्क आणि सर्व सर्व व्यवहारासाठीमराठी व्यवहारासाठीमराठी भाषेचा प्रमाणात वापर करणे हे जसेसमस्त मराठी मातृभाषा असणाऱ्या मराठी जनांचे कर्तव्य आहे.तसेच त्यासाठी मराठीभाषिकांना मराठी शिकण्याची सोय करून त्यांनाही मराठी सर्वजणी कामकाज व संवाद संपर्कइत्यादी करण्यासाठी प्रोत्साहित करणे हे राज्य शासनाचे काम आहेत्यांना आहेत्यांना मराठी समजल्या व संवाद केल्याविना सर्वत्यांना मराठी शिकल्या समजल्या व संवाद केल्याविना व्यवहार करता येणार नाही.एवढा मराठीचा वापर वाढला पाहिजे तरच मराठीला उचित स्थान पुन्हा प्राप्त होऊ शकेल. राज्यातील महाविद्यालय व विद्यापीठे यांच्या प्रशासकीय कामका जात इंग्रजी सोबत मराठीचा वापर केला तसेच त्यांच्या परिसरातील वास्तूतील नावे, सूचना फलक इत्यादी सर्व बाबतीत मराठी भाषेचे वापर असेल तर मराठी भाषकांना ठळकपणे वावरले जाणे सुलभ होईल.सर्व प्रकारची महाविद्यालये तसेच विद्यापीठे यांची संक्षिप्त स्थळे मराठी भाषेत उपलब्ध करून देणे बंधनकारक असले पाहिजे. राज्यातील महाविद्यालय व विद्यापीठे यांना अनुदान आयोगासारख्या नियमक संस्थेकडून संशोधनासाठी मिळणाऱ्या निधी पैकी यथोचित निधी विविध ज्ञान शाखाती मराठी भाषेतून होणाऱ्या संशोधन पर लेख प्रबंधासाठी तसेच इंग्रजी सह अन्यभाषेतून मराठीध्ये अनुवादाच्या स्वरूपाने संशोधन पर लेख प्रबंध प्रकाशित होण्यासाठी खर्च करण्याची परवानगी देण्यात आली तर मराठीचे प्रमाण वाढवू शकेल.उच्च शिक्षणातील मराठी भाषेचे अध्ययन व अध्यापन केवळ साहित्यलक्षी व पारंपारिक पठ्यासाहित्यलक्षी व पारंपारिक पाठ्यक्रमापुर ते सीमित न ठेवता ते व्यवसाय भमुख रोजगार आभिमुख वकौशल्याभिमुख केले तर उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मराठीतून टंकलेखन लघुलेखन मुद्रित शोधन पुस्तक निर्मिती जाहिरात लेख भेटकार्डासारख्या कॅलीओग्राफी मराठी चित्रपट नाटक लेखन पटकथा संवाद लेखन अशा विविध कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाषा साहित्य संबंधित अल्प मुदतीचे रोजगार क्षम अभ्यासक्रम उपलब्ध झाले तर मराठी व्यवसायिकांना सुवर्णसंधीी ठरेल.शासनाने संकेतस्थळा द्वारे मराठीशासनाने संकेतस्थळा द्वारे मराठीकरणाला सुरुवातकेल्यावर पुढची पायरी असेल त्याला प्रतिसाद किती मिळतो हे पाहणे पुरेसा प्रतिसाद मिळाल्यानंतर त्या पुढची पायरी असेल सर्व विद्यापीठांमध्ये सर्वच विषय मराठीतून शिकण्याची सोय करणे पुन्हा मराठीतून घालवलेल्या वर्गाला महाविद्यालयामध्ये कसा प्रतिसाद मिळतो. हे पाहून मराठीसाठी विद्यापीठ उभी करायची की नाही यावर निर्णय घेणे हा विचार भाषेला सक्षम करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा व्यवहार्य अभ्यास आणि टप्प्याटप्प्याने जाणारा मार्ग वाटतो. विद्यापीठाची ही शेवटची पायरी असेल पण सर्वच विषयाची उच्च शिक्षणापर्यंतचे युनिकोड साहित्य शासनाच्या संकेतस्थळावर आहे. महाविद्यालयातून किमान आठवड्यातून काही विशिष्ट दिवशी मराठीतून विषय शिकण्याची सोय करणे एवढ्या गोष्टी जरी सरकारने केल्या तरी मराठीतून उच्च शिक्षण घेणे सोपे होईल.

संदर्भ

1) ‘ यशवंतराव चव्हाण’ ‘युगांतर’ मासिक पुष्ट- क्रमांक 172

2) 'पाटणकर जयश्री '(संपा) "सामाजिक भाषा विज्ञान" कक्षा आणि अभ्यास 2025

3) कानडे मु.श्री. " मराठीचा भाषिक अभ्यास" मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे प्रथम आवृत्ती 1979

4) ‘इंदुरकर अमृता ‘ज्ञान भाषा मराठी दिवाळी इ विशेषांक 2019

5) ‘पानशे श्रुती ‘ज्ञान भाषा मराठी दिवाळी ई विशेषण2019

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

Original Article

शाश्वत विकासासाठी उच्च शिक्षणामध्ये भाषा आणि साहित्याचे महत्त्व

प्रा. सुनील माणिक भिसे
मराठी विभाग प्रमुख, श्री ईश्वरराव मोरे-पाटील कला,
वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय दिघंची, ता. आटपाडी जि. सांगली

Manuscript ID:
JRD -2026-180328
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 3(IV)
Pp. 122-125
March- 2026
Submitted: 15 Feb. 2026
Revised: 25 Feb. 2026
Accepted: 10 Mar. 2026
Published: 31 Mar. 2026

सारांश

शाश्वत विकास ही संकल्पना आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय संतुलन राखून समाजाच्या सर्वांगीण प्रगतीवर भर देणारी आहे. या प्रक्रियेत उच्च शिक्षण संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. उच्च शिक्षणामध्ये भाषा आणि साहित्य विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, नैतिक आणि सामाजिक विकासासाठी प्रभावी साधन म्हणून कार्य करतात. भाषा ज्ञानप्राप्ती, संशोधन आणि विचार अभिव्यक्तीचे माध्यम असून विद्यार्थ्यांना संकल्पनांचे सखोल आकलन घडवते. मातृभाषेच्या माध्यमातून शिक्षण दिल्यास शिक्षण अधिक समजण्यास सुलभ व सर्वसमावेशक बनते.साहित्य विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, पर्यावरण संवर्धनाची भावना, मानवी मूल्ये आणि सांस्कृतिक भान विकसित करते. विविध साहित्यप्रकारांमधून समाजातील समस्या, पर्यावरणीय आव्हाने आणि सामाजिक समता यांविषयी संवेदनशीलता निर्माण होते. त्यामुळे भाषा आणि साहित्य यांचा उच्च शिक्षणामध्ये समन्वित वापर केल्यास शाश्वत विकासाची उद्दिष्टे प्रभावीपणे साध्य होऊ शकतात. अशा प्रकारे उच्च शिक्षणातील भाषा आणि साहित्य समाजाला जबाबदार, जागरूक आणि मूल्यनिष्ठ नागरिक घडविण्यास महत्त्वपूर्ण योगदान देतात.

प्रस्तावना

२१व्या शतकात मानवजातीसमोर अनेक गंभीर आव्हाने उभी आहेत. पर्यावरणीय प्रदूषण, नैसर्गिक साधनसंपत्तीचा अतिरेकी वापर, सामाजिक विषमता, सांस्कृतिक विसंगती आणि जागतिकीकरणामुळे निर्माण होणारे नवे प्रश्न यांचा विचार करता विकासाची संकल्पना नव्याने मांडण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर शाश्वत विकास (Sustainable Development) ही संकल्पना उदयास आली.शाश्वत विकास म्हणजे वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करताना भावी पिढ्यांच्या गरजांवर परिणाम न करणारा विकास. ही संकल्पना केवळ आर्थिक प्रगतीवर आधारित नसून सामाजिक समता, पर्यावरणीय संतुलन आणि सांस्कृतिक सातत्य यांचा समन्वय साधणारी आहे.शाश्वत विकासाच्या प्रक्रियेमध्ये शिक्षण क्षेत्राला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. विशेषतः उच्च शिक्षण संस्था समाजाच्या बौद्धिक आणि नैतिक घडणीत महत्त्वाची भूमिका बजावतात. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या बरोबरीने भाषा आणि साहित्य हे विषय मानवी मूल्यांचे संवर्धन, सांस्कृतिक जतन आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी अत्यंत आवश्यक आहेत.भाषा ही विचारांची देवाणघेवाण करण्याचे माध्यम आहे, तर साहित्य हे मानवी अनुभवांचे आणि समाजजीवनाचे जिवंत प्रतिबिंब आहे. त्यामुळे शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी उच्च शिक्षणामध्ये भाषा आणि साहित्याचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
प्रा. सुनील माणिक भिसे मराठी विभाग प्रमुख श्री ईश्वरराव मोरे-पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय दिघंची.

How to cite this article:
भिसे, . सुनील . माणिक . (2026). शाश्वत विकासासाठी उच्च शिक्षणामध्ये भाषा आणि साहित्याचे महत्त्व. Journal of research & development, 18(3(IV)), 122–125. https://doi.org/10.5281/zenodo.20745597

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.20745597
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

१. शाश्वत विकास : संकल्पना आणि स्वरूप शाश्वत विकास ही संकल्पना १९८७ साली प्रसिद्ध झालेल्या **ब्रंटलँड अहवालात (Our Common Future) स्पष्ट करण्यात आली. या अहवालानुसार –"भावी पिढ्यांच्या गरजांना बाधा न आणता वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करणारा विकास म्हणजे शाश्वत विकास."

शाश्वत विकासामध्ये खालील तीन प्रमुख घटकांचा समावेश होतो –

1. आर्थिक विकास
2. सामाजिक समता
3. पर्यावरणीय संरक्षण

या तिन्ही घटकांमध्ये संतुलन राखणे आवश्यक आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने २०१५ मध्ये सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स (SDGs) जाहीर केले. या उद्दिष्टांमध्ये दर्जेदार शिक्षण, लैंगिक समानता, पर्यावरण संरक्षण, दारिद्र्य निर्मूलन यांसारख्या मुद्द्यांना प्राधान्य देण्यात आले आहे. शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करताना म्हटले आहे –"शिक्षण हे केवळ माहिती देण्याचे साधन नसून मानवी व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडवणारी प्रक्रिया आहे."

२. उच्च शिक्षणाची भूमिका उच्च शिक्षण संस्था समाजाच्या बौद्धिक विकासाचे केंद्र मानल्या जातात. विद्यापीठे आणि महाविद्यालये विद्यार्थ्यांना ज्ञान, कौशल्ये आणि मूल्ये प्रदान करतात.आजच्या काळात पर्यावरणीय समस्या, सामाजिक विषमता, आर्थिक असमतोल यांसारख्या अनेक प्रश्नांचा सामना समाजाला करावा लागत आहे. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये व्यापक दृष्टीकोन आणि सामाजिक संवेदनशीलता विकसित करणे आवश्यक आहे. येथे भाषा आणि साहित्याचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. कारण हे विषय विद्यार्थ्यांमध्ये विचारशक्ती, संवेदनशीलता आणि सामाजिक जाणीव निर्माण करतात.संशोधनानुसार विद्यापीठांनी समाजाच्या कल्याणाशी संबंधित समस्यांचा अभ्यास करून त्यावर उपाय सुचविणे आवश्यक आहे. [3]

उच्च शिक्षणाची भूमिका खालीलप्रमाणे स्पष्ट करता येते –

1. ज्ञाननिर्मिती आणि संशोधन
   विद्यापीठे विविध विषयांवर संशोधन करून समाजासाठी उपयुक्त ज्ञान निर्माण करतात.
2. मानवी मूल्यांची जडणघडण
   शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची भावना विकसित होते.
3. पर्यावरणाबद्दल जागरूकता
   शाश्वत विकासासाठी पर्यावरण संरक्षणाची जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे.
4. सामाजिक समता
   शिक्षणामुळे समाजातील विषमता कमी करण्यास मदत होते.

३. भाषा : समाज आणि संस्कृतीचे माध्यम

भाषा ही समाजातील विचारांची देवाणघेवाण करण्याचे साधन आहे. भाषा समाजाच्या संस्कृतीचे, इतिहासाचे आणि ज्ञानाचे जतन करते.भाषा आणि शिक्षण यांचा परस्पर संबंध अतिशय जवळचा आहे. शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील अनुभव आणि परंपरा पुढील पिढीकडे पोहोचतात. ([मराठी विश्वकोश प्रथमावृत्ती [4]भाषेच्या माध्यमातून समाजातील विविध विचारधारा व्यक्त होतात. त्यामुळे भाषा ही सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन ठरते.

४ . भाषा : ज्ञाननिर्मितीचे प्रमुख साधन भाषा ही मानवी समाजाच्या अस्तित्वाचा मूलभूत आधार आहे. विचारांची देवाणघेवाण, ज्ञानाचा प्रसार आणि संस्कृतीचे जतन या सर्व प्रक्रिया भाषेच्या माध्यमातून घडतात.

४ .१ ज्ञाननिर्मितीमध्ये भाषेची भूमिका उच्च शिक्षणामध्ये संशोधन, लेखन, चर्चा आणि संवाद या सर्व प्रक्रिया भाषेच्या माध्यमातून घडतात. त्यामुळे भाषा ही ज्ञाननिर्मितीची प्रमुख साधन आहे.भाषावैज्ञानिक नोम चॉम्स्की यांच्या मते –"भाषा ही मानवी सर्जनशीलतेची मूलभूत अभिव्यक्ती आहे."

भाषेच्या माध्यमातून नवीन संकल्पना आणि सिद्धांत विकसित होतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी भाषेचे शिक्षण अत्यंत आवश्यक आहे.

४.२ मातृभाषेचे महत्त्व विद्यार्थ्यांना मातृभाषेतून शिक्षण दिल्यास त्यांची समज आणि विचारशक्ती अधिक विकसित होते. महात्मा गांधी यांनी मातृभाषेतील शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना म्हटले आहे –"मातृभाषेतून मिळालेले शिक्षण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वात उपयुक्त ठरते."

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

४.३ सांस्कृतिक ओळख जपण्यात भाषेची भूमिका भाषा ही संस्कृतीची वाहक असते. प्रत्येक समाजाची परंपरा, इतिहास आणि मूल्ये भाषेमध्ये जतन होतात. भारतासारख्या बहुभाषिक देशामध्ये विविध भाषांचे संवर्धन करणे हे सांस्कृतिक शाश्वततेसाठी अत्यंत आवश्यक आहे.

५ . साहित्य आणि समाजपरिवर्तन साहित्य हे समाजाचे प्रतिबिंब मानले जाते. साहित्यामध्ये समाजातील विचार, मूल्ये, संघर्ष आणि संस्कृती यांचे प्रतिबिंब दिसते. साहित्यकार आपल्या लेखनाद्वारे समाजातील समस्यांवर प्रकाश टाकतात आणि समाजाला योग्य दिशा देण्याचा प्रयत्न करतात.

उदाहरणार्थ

* पर्यावरणविषयक साहित्य

* स्त्रीवादी साहित्य

* दलित साहित्य

* ग्रामीण साहित्य

या प्रकारच्या साहित्यामध्ये सामाजिक न्याय आणि शाश्वत विकासाचे विचार मांडलेले दिसतात.

५.१ मानवी मूल्यांचे संवर्धन साहित्य विद्यार्थ्यांमध्ये सहानुभूती, संवेदनशीलता आणि नैतिक मूल्यांची जाणीव निर्माण करते.

रवींद्रनाथ टागोर यांच्या मते –"साहित्य हे मानवतेचे जिवंत स्वरूप आहे." कथा, कविता, कादंबऱ्या आणि नाटकांच्या माध्यमातून मानवी जीवनातील विविध पैलू उलगडले जातात.

५.२ सामाजिक परिवर्तनासाठी साहित्य इतिहासात अनेक साहित्यिकांनी आपल्या लेखनातून सामाजिक परिवर्तनाचा संदेश दिला आहे.महात्मा ज्योतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आणि इतर समाजसुधारकांनी आपल्या साहित्यामधून समाजातील अन्याय आणि विषमता यांवर कठोर टीका केली.

५.३ पर्यावरणीय जाणीव निर्माण करण्यात साहित्य अनेक साहित्यिकांनी निसर्गाचे सुंदर चित्रण करत पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला आहे. निसर्ग आणि मानवी जीवन यांच्यातील संबंध साहित्यामध्ये प्रभावीपणे व्यक्त होतात.

मराठी साहित्यामध्ये

* संत साहित्य

* लोकसाहित्य

* ग्रामीण साहित्य

यांद्वारे सामाजिक समता, निसर्गप्रेम आणि मानवतेचे विचार मांडले गेले आहेत.

६. भाषा आणि साहित्याच्या माध्यमातून शाश्वत विकास भाषा आणि साहित्याचा उपयोग शाश्वत विकासाच्या मूल्यांची जाणीव निर्माण करण्यासाठी करता येतो.

६.१ पर्यावरणविषयक साहित्य अनेक साहित्यिकांनी पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व आपल्या लेखनातून मांडले आहे. जंगल, निसर्ग आणि पर्यावरण यांचे महत्त्व साहित्यामध्ये अधोरेखित केलेले दिसते.

६.२ सांस्कृतिक जतन भाषा आणि साहित्य समाजाच्या सांस्कृतिक परंपरा जतन करतात. सांस्कृतिक विविधतेचे संरक्षण हे शाश्वत विकासाचा महत्त्वाचा भाग आहे.

६.३ सामाजिक जागृती साहित्यामध्ये समाजातील अन्याय, विषमता आणि पर्यावरणीय समस्या मांडल्या जातात. त्यामुळे समाजामध्ये जागरूकता निर्माण होते.

६.४ नैतिक मूल्ये साहित्यामध्ये मानवी मूल्ये, सहकार्य, सहानुभूती आणि जबाबदारी यांचे महत्त्व सांगितले जाते.

७. साहित्य : समाजाचे आरसे साहित्य हे समाजातील अनुभव, भावना आणि संघर्ष यांचे प्रतिबिंब असते. साहित्य वाचताना वाचक समाजातील विविध वास्तवांशी परिचित होतो.

८. भारतीय संदर्भातील भाषा आणि साहित्य भारत हा बहुभाषिक देश आहे. भारतामध्ये अनेक भाषा आणि साहित्य परंपरा अस्तित्वात आहेत.मराठी, हिंदी, बंगाली, तमिळ, कन्नड अशा विविध भाषांमध्ये समृद्ध साहित्य निर्माण झाले आहे. या साहित्यामध्ये समाजातील विविध प्रश्नांवर विचार मांडले गेले आहेत.

९. अभ्यासक्रमामध्ये भाषा आणि साहित्य शाश्वत विकासासाठी उच्च शिक्षणामध्ये भाषा आणि साहित्याचा समावेश करणे आवश्यक आहे.

उदाहरणार्थ

1. पर्यावरणविषयक साहित्याचा अभ्यास

2. लोकसाहित्याचा अभ्यास

3. सांस्कृतिक अभ्यास

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

4. अनुवाद अध्ययन

यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक आणि पर्यावरणीय जाणीव निर्माण होऊ शकते.

१०. आधुनिक तंत्रज्ञान आणि भाषा डिजिटल युगात भाषा आणि साहित्याचा प्रसार अधिक वेगाने होत आहे.इंटरनेट आणि माहिती तंत्रज्ञानामुळे ज्ञानाचा प्रसार जगभरात सहज शक्य झाला आहे. माहिती तंत्रज्ञानामुळे ज्ञानविनिमय आणि शिक्षणाची प्रक्रिया अधिक प्रभावी झाली आहे. [5]ऑनलाइन शिक्षण, डिजिटल ग्रंथालये आणि ई-पुस्तके यांमुळे विद्यार्थ्यांना विविध साहित्याचा अभ्यास करणे सोपे झाले आहे.

अनेक विचारवंतांनी भाषा आणि साहित्याच्या महत्त्वावर भर दिला आहे.

- महात्मा गांधी – शिक्षण मातृभाषेतून दिले गेले पाहिजे, कारण तेच विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी उपयुक्त आहे.
- रवींद्रनाथ टागोर – साहित्य मानवी भावनांचा आणि संस्कृतीचा जिवंत वारसा आहे.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर– शिक्षण समाजातील समतेचा पाया आहे.
- डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन – शिक्षणाने नैतिक आणि बौद्धिक विकास साधला पाहिजे.

११ भाषा आणि साहित्याच्या अभ्यासाचे शैक्षणिक फायदे उच्च शिक्षणामध्ये भाषा आणि साहित्याचा अभ्यास केल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अनेक कौशल्ये विकसित होतात.

११ .१ चिकित्सक विचारशक्ती साहित्यिक ग्रंथांचे विश्लेषण करताना विद्यार्थ्यांची विश्लेषणात्मक आणि चिकित्सक विचारशक्ती विकसित होते.

११.२ संवाद कौशल्य भाषेच्या अभ्यासामुळे विद्यार्थ्यांची लेखन, वाचन आणि वक्तृत्व कौशल्ये विकसित होतात.

११.३ बहुसांस्कृतिक समज साहित्याच्या माध्यमातून विविध संस्कृती आणि समाजव्यवस्था समजून घेता येतात.तत्त्वज्ञ मार्था नुसबामयांच्या मते –"मानविकी विषय लोकशाही समाज टिकवून ठेवण्यासाठी अत्यंत आवश्यक आहेत."

१२ . शाश्वत विकासाच्या दृष्टीने मानव्य विषयांचे महत्त्व आजच्या काळात विज्ञान आणि तंत्रज्ञानाला जास्त महत्त्व दिले जाते. परंतु केवळ तांत्रिक ज्ञान पुरेसे नाही. समाजामध्ये मानवी मूल्ये, सहिष्णुता आणि सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण करण्यासाठी **मानव्य** विषयांचा अभ्यास आवश्यक आहे. भाषा आणि साहित्य विद्यार्थ्यांना मानवी अनुभव समजून घेण्याची क्षमता देतात. त्यामुळे ते अधिक संवेदनशील आणि जबाबदार नागरिक बनतात.

१३. संशोधन पद्धती

या शोधनिबंधासाठी पुढील संशोधन पद्धतींचा वापर करण्यात आला आहे –

1. ग्रंथसमीक्षा पद्धती* – विविध पुस्तके, संशोधन लेख आणि अहवालांचा अभ्यास.
2. विश्लेषणात्मक पद्धती – भाषा आणि साहित्याच्या भूमिकेचे विश्लेषण.
3. तुलनात्मक पद्धती – विविध साहित्यप्रकारांचे तुलनात्मक अध्ययन.

निष्कर्ष

शाश्वत विकास ही मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रांशी संबंधित व्यापक संकल्पना आहे. समाजाच्या संतुलित आणि सर्वांगीण प्रगतीसाठी आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय घटकांचा समन्वय आवश्यक आहे.

उच्च शिक्षणामध्ये भाषा आणि साहित्याचा समावेश केल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक संवेदनशीलता, पर्यावरणीय जाणीव आणि मानवी मूल्ये विकसित होतात. भाषा ज्ञानाचा प्रसार करते, तर साहित्य मानवी अनुभवांचे आणि संस्कृतीचे जतन करते.म्हणूनच शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी उच्च शिक्षणामध्ये भाषा आणि साहित्याला महत्त्वाचे स्थान देणे अत्यंत आवश्यक आहे.

संदर्भ

1. सावळे, अनिल. भारतीय दृष्टीकोनातून शाश्वत विकासामध्ये उच्च शिक्षणाची भूमिका.
2. गुरनुले, टी. एम. शाश्वत विकासासाठी शिक्षण.
3. मराठी विश्वकोश मंडळ. शिक्षण – मराठी विश्वकोश.
4. मराठी विश्वकोश मंडळ. शिक्षणाचे समाजशास्त्र.
5. United Nations. Sustainable Development Goals.
6. UNESCO. Education for Sustainable Development.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

Original Article

छत्रपती संभाजी महाराजांचे धार्मिक धोरण

सोमनाथ उत्तम गोडसे[1], डॉ. सुरेंद्र अर्जुन शिरसट[2]

[1]संशोधक विद्यार्थी, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव,ता.जुन्नर, जि.पुणे

[2]संशोधक मार्गदर्शक, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव,ता.जुन्नर, जि.पुणे

Email- godase173@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180329
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 3(IV)
Pp. 126-130
March- 2026
Submitted: 15 Feb. 2026
Revised: 25 Feb. 2026
Accepted: 10 Mar. 2026
Published: 31 Mar. 2026

सारांश

छत्रपती संभाजी महाराज हे मराठा साम्राज्याचे दुसरे छत्रपती असून त्यांनी राज्यकारभारात धार्मिक सहिष्णुता आणि न्यायनिष्ठा यांचा अवलंब केला. त्यांच्या धार्मिक धोरणाचा पाया स्वराज्याच्या संरक्षणासोबत सर्व धर्मांचा सन्मान राखण्यावर आधारित होता. त्यांनी हिंदू धर्मसंस्थांचे संरक्षण केले तसेच विविध पंथ, संप्रदाय आणि धर्मीय व्यक्तींना आश्रय दिला. मंदिरांना दान देणे, धार्मिक परंपरांचे रक्षण करणे आणि धार्मिक स्वातंत्र्य टिकवून ठेवणे हे त्यांच्या धोरणाचे महत्त्वपूर्ण घटक होते.संभाजी महाराजांच्या काळात मुघल साम्राज्याशी सतत संघर्ष सुरू असतानाही त्यांनी धार्मिक कट्टरतेपेक्षा राज्यहित आणि सामाजिक समन्वयाला प्राधान्य दिले. त्यांच्या दरबारात विविध धर्मीय अधिकारी कार्यरत होते, यावरून त्यांच्या प्रशासनातील सर्वसमावेशक दृष्टिकोन स्पष्ट होतो. धार्मिक स्थळांचे संरक्षण आणि जबरदस्ती धर्मांतराला विरोध ही त्यांच्या धोरणाची वैशिष्ट्ये होती.याप्रमाणे छत्रपती संभाजी महाराजांचे धार्मिक धोरण हे सहिष्णुता, धार्मिक स्वातंत्र्य, सामाजिक समन्वय आणि स्वराज्य रक्षण या तत्त्वांवर आधारित असल्याचे दिसून येते. त्यांच्या राज्यकारभारामुळे मराठा साम्राज्यात धार्मिक ऐक्य आणि सामाजिक स्थैर्य टिकून राहण्यास मदत झाली.

प्रस्तावना

छत्रपती संभाजी राजांचे धार्मिक धोरण पाहण्यापूर्वी धर्म म्हणजे काय? हे पाहणे अधिक महत्त्वाचे आहे. आपल्याकडे धर्माबाबत विविध मतप्रवाह आहेत. भारतीय संस्कृती कोशात धर्मा बाबत पुढील प्रमाणे विश्लेषण केलेले आहे "धृ = धारण करणे. या धातूपासून धर्म बनला आहे. 'धरति लोकान ध्रियते पुण्यात्मभि: इतिवा' लोकांना धारण करतो किंवा जो पुण्यात्मा पुरुषांकडून धारण केला जातो, तो धर्म होय. ऋग्वेदात धर्म हा शब्द ५६ वेळा आला आहे. कित्येक वेळा तो विशेषण आहे. कित्येक ठिकाणी तो नाम आहे. धर्म शब्द आपण पुल्लिंगी वापरतो; पण ऋग्वेदात तो नपुसकलिंगी ही आढळतो (ऋ. १०.९.९६). धृ धातूचा अर्थ आधार देणे, उचलून धरणे किंवा टिकवणे असाही आहे. पोषण करणे या अर्थानेही धर्म हा शब्द ऋग्वेदात आलेला आहे (ऋ. १.१८७.१/१०.९२.२) पालन करणे , असा अर्थ धर्म या शब्दाचा ऋग्वेद सांगतो."[१] धर्माची व्याख्या सांगताना महाभारताचा हवाला देऊन धर्मशास्त्राचे अभ्यासक पांडुरंग वामन काणे सांगतात "धारणात धर्म इत्याहु" असे सांगितले असून धारण करतो म्हणून धर्माला धर्म म्हणतात.[२] धर्मशास्त्र आणि तत्वज्ञानाचे अभ्यासक डॉ.रावसाहेब कसबे ऋग्वेदाला उद्धृत करून धर्माबाबत सांगतात " धृ म्हणजे धारण करणे, आधार देणे किंवा पोषण करणे होय. ऋग्वेदाच्या पहिल्या मंडळातील अन्नसुक्ताची सुरुवातच 'अन्नदान करणारे पुण्यवान लोक समाजात ताठ मान करून जगत असतात' अशी आहे. त्यामुळे धर्म या शब्दाचा या ठिकाणी असलेला अर्थ हा आधार देणारा किंवा पोषण करणारा असावा, असे दिसते"[३] धारण करणारा, पोषण करणारा असा धर्माचा अर्थ आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
सोमनाथ उत्तम गोडसे संशोधक विद्यार्थी संशोधन केंद्र: कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव,ता.जुन्नर, जि.पुणे

How to cite this article:
गोडसे, सोमनाथ. उत्तम., & शिरसट, . सुरेंद्र . अर्जुन . (2026). छत्रपती संभाजी महाराजांचे धार्मिक धोरण. Journal of research & development, 18(3(IV)), 126–130. https://doi.org/10.5281/zenodo.20745727

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.20745727
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

असे पंडित महादेव शास्त्री जोशी, पा.वा.काणे आणि डॉ. रावसाहेब कसबे सांगतात,छत्रपती संभाजीराजांना अत्यंत कमी आयुष्य मिळाले तरीही, त्यांनी गोरगरीब, कष्टकरी, श्रमकरी, शेतकरी कुटुंबांमधील विविध जातीधर्माच्या मावळयांना सोबत घेऊन विरोधकांशी अत्यंत प्रखर असा लढा दिला. छत्रपती संभाजी राजेंचे व्यक्तिमत्त्व त्यांचे कार्यकर्तृत्व, शौर्य, धैर्य हे अतुलनीय होते. संभाजी महाराजांचे व्यक्तिमत्व देशाच्या इतिहासामध्ये महत्त्वपूर्ण आहे. छत्रपती संभाजी महाराजांची धर्माविषयी भूमिका,त्यांचे धर्माबाबतचे मत, त्यांची लढाई धार्मिक होती काय, त्यांना धर्माधिष्ठित राज्य निर्माण करावयाचे होते काय? अशा सर्व प्रश्नावर विचारमंथन होणे आवश्यक आहे.

संशोधनाचे उद्देश

१. छत्रपती संभाजीकालीन तत्कालीन धार्मिक परिस्थितीचा आढावा घेणे.
२. छत्रपती संभाजी महाराजांच्या चरित्र लेखनातील विविध लेखकांची संभाजी महाराजांबद्दलची धार्मिक भूमिका स्पष्ट करणे.
३. छत्रपती संभाजी महाराज चरित्रातील वस्तुनिष्ठता आणि वास्तविकता विविध संदर्भ ग्रंथांच्या आधारे स्पष्ट करणे.

विषय विवेचन

मराठा साम्राज्याच्या इतिहासात छत्रपती संभाजी महाराज यांचे स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पश्चात १६८१ ते १६८९ या काळात त्यांनी मराठा साम्राज्याचे नेतृत्व केले. त्यांच्या कारकिर्दीचा काळ हा प्रामुख्याने औरंगजेब यांच्या मुघल साम्राज्याशी चाललेल्या कठोर संघर्षाचा होता. दीर्घकाळ चाललेल्या युद्धामुळे आणि तत्कालीन राजकीय परिस्थितीमुळे संभाजी महाराजांविषयी अनेक विरोधाभासी मते इतिहासात दिसून येतात. काही मुघल व परकीय साधनांमध्ये त्यांना धार्मिकदृष्ट्या असहिष्णू दाखविण्याचा प्रयत्न आढळतो; परंतु मराठी बखरी, पत्रव्यवहार, तसेच विविध समकालीन साधनांचा चिकित्सक अभ्यास केल्यास त्यांच्या धार्मिक धोरणात सहिष्णुता, संरक्षण आणि व्यावहारिकता दिसून येते. छत्रपती संभाजी महाराजांबद्दल समकालीन फ्रेंच पर्यटक अबे करे लिहितो की, " छत्रपती संभाजीराजांसारखा सुंदर, पराक्रमी आणि बुद्धिमान राजपुत्र मी भारतात पाहिला नाही" तर "संभाजीराजे मोगलांसाठी शिवरायांपेक्षा दहापटीने तापदायक होते" असे मोगलांचा इतिहासकार खाफीखान लिहितो. छत्रपती शिवराय, छत्रपती संभाजी महाराज आणि छत्रपती राजाराम महाराज यांच्या कारकिर्दीतील दरबारातील इतिहासकार समकालीन कृष्णाजी अनंत सभासद लिहितात, " संभाजी राजे निस्वार्थ स्वराज्यनिष्ठ होते". जेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांनी संभाजी राजांशी स्वराज्याच्या वाटणीबाबत चर्चा केली, तेव्हा संभाजी राजे शिवाजी राजांना म्हणतात, " आपणास साहेबांचे पायांची जोड आहे. आपण दुधभात खाऊन साहेबांचे पायांचे चिंतन करून राहीन." दूधभात खाऊन शिवरायांच्या पायांचे चिंतन करून राहीन, परंतु राज्याची वाटणी नको, असेच संभाजीराजे सुचित करतात. यावरून संभाजी राजेंची स्वराज्यनिष्ठा,विनयशीलता आणि प्रामाणिकपणा स्पष्ट होतो.

छत्रपती संभाजी महाराजांची धार्मिक भूमिका

छत्रपती संभाजी महाराजांच्या धार्मिक धोरणाची मुळे शिवाजी राजांनी घालून दिलेल्या राज्यकारभारात सापडतात. शिवाजी महाराजांनी हिंदू धर्मसंरक्षणासोबतच सर्व धर्मांप्रती सहिष्णुता बाळगणारे राज्य उभारले होते. त्या परंपरेचा वारसा संभाजी महाराजांनी पुढे चालवला. मुगल बादशाह औरंगजेबाने इस्लामी कट्टरतेवर आधारित धोरण स्वीकारले होते. जिझिया कराची पुनर्स्थापना, अनेक हिंदू मंदिरे पाडण्याचे आदेश इत्यादी घटनांमुळे तत्कालीन भारतीय समाजात धार्मिक तणाव निर्माण झाला. या पार्श्वभूमीवर संभाजी महाराजांचे धोरण हे केवळ धार्मिक नव्हते, तर राजकीय आणि सामाजिक स्थैर्य टिकविणारे होते. छत्रपती संभाजी महाराजांच्या धार्मिक कामगिरीबद्दल बोलताना संभाजी चरित्राच्या अभ्यासक डॉ.कमल गोखले म्हणतात की, लहानपणापासून संभाजीला पुराणांची आवड होती. केशव भटाकडून संभाजीने प्रयोगरूप रामायण ऐकल्याबद्दल त्याला इनामही दिले होते. केशव भटाने संभाजीला राजनीती शिकविली होती. केशव पंडिताने आपल्या राजाराम चरित्रम् या काव्यात "सकलशास्त्र विचारशील आणि धर्मज्ञशास्त्र कोविंद" असे संभाजीचे वर्णन केलेले आहे.[४] डॉ.गोखले पुढे लिहितात की, शिवाजी महाराजांच्या प्रमाणे देव देवता, सत्पुरुष यांच्या आशीर्वादावर आणि कृपेवर संभाजी महाराजांचा नितांत विश्वास होता. दि. १९–१०–१६८० रोजी बाबा याकूद यांचे संभाजी महाराजांनी केळशी येथे दर्शन घेतले होते. तर दि.१९–८–१६८० रोजी संभाजी राजांनी पुण्याच्या विनायक उमाजी या देशाधिकाऱ्याला लिहून संत तुकारामांचा मुलगा महादोबा यास वर्षासन दिले. संभाजी महाराजांनी पुणे परगण्यातील तर्फ निरथडी येथे कन्हेरी मठात वासुदेव गोसावीचे वास्तव्य होते, त्यांना जमीन दान देण्याचा देशाधिकाऱ्याला हुकूम दिला. संभाजीराजांकडून कराडचे नरसीभट शेष भट, मसूर तालुक्यातील कांदळगावचे अनंत भट, महादेव भट यांना प्रतिवर्षी जोंधळे व तांदूळ दिले जात होते. महाबळेश्वरचे वेदमूर्ती रामभट यांना पूर्वीप्रमाणे वर्षासन देऊन संभाजी महाराजांनी रोख रक्कम आणि जिन्नसही दिले.[५] याचप्रमाणे संभाजी महाराजांनी चिंचवड, मोरगाव, सज्जनगड, चाफळ इत्यादी देवस्थानची व्यवस्था नीट चालावी म्हणून पूर्वीची वृत्ती व इनामे चालू ठेवली. मोरगाव येथील मोरेश्वर गोसावी यांना शिवाजी महाराजांनी मौजे लोणी, पणदरे, कासड, सेलगाऊ येथे इनाम दिले होते. तेच संभाजी राजांनी चालू ठेवले. डॉ.कमल गोखले यांनी लिहिलेली वरील माहिती ही संभाजी महाराज धार्मिक आणि श्रद्धाळू असल्याचे पुरावे देते. संभाजी राजे धार्मिक होते, श्रद्धाळू होते परंतु धर्मांध किंवा अंधश्रद्धाळू नव्हते. त्यांना आपल्या परंपरांचा अभिमान होता. परंतु ते प्रवाह पतीत नव्हते. ते प्रगतिशील आणि

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

सुधारणावादी होते. छत्रपती संभाजी महाराजांनी धार्मिक परंपरेचे संवर्धन केले. याचा अर्थ ते धर्मवीर ठरतात असे नव्हे, या संदर्भात प्रसिद्ध इतिहास संशोधक त्र्यंबक शंकर शेजवलकर म्हणतात की,"ऐतिहासिक माहितीचा साकल्याने विचार करता धर्मवीर म्हणण्यासारखे संभाजीच्या हातून विशेष काही घडलेले दिसत नाही."[६] छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवन चरित्रावर प्रदीर्घकाळ संशोधन करून संशोधनात्मक ग्रंथ लिहिणारे वा.सी.बेंद्रे मोगलांचा म्हणजेच छत्रपती शिवाजी राजांच्या शत्रूचा समकालीन इतिहासकार म्हणून नावलौकिक असलेला खाफीखान याच्या लेखनाचा एका ठिकाणी संदर्भ देतात, तो लिहितो की,"शिवाजी आपल्या सैन्यासही मशिदी,कुराण व बायबल यांचा अपमान कधीही करू देत नसे."[७] यावरून सिद्ध होते की शिवरायांची शिकवण हे सर्वधर्मसमभावाची होती. छत्रपती संभाजीराजांनी आपल्या वडिलांच्या शिकवणुकीचे आचरण आणि विचार तंतोतंत पाळले होते. याचा दाखला देत असताना डॉ.जयसिंगराव पवार आपल्या प्रसिद्ध अशा ' छत्रपती संभाजी: एक चिकित्सा' या ग्रंथात संभाजी राजांचा इंग्रजांशी झालेल्या करारातील एक संदर्भ देतात. त्यामध्ये संभाजी महाराज म्हणतात की," इंग्रजांना माझ्या राज्यातील कोणाही माणसास गुलाम किंवा ख्रिश्चन करण्यासाठी विकत घेता येणार नाही."[८] म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी महाराजांनी स्वधर्माचा आदराने संरक्षण तर केलेच पण परधर्मीयांचा सुद्धा आदर सन्मान केला. ही छत्रपतींची सर्व धर्मीय जनतेबद्दलची भावना होती. मुळात शिवकालीन छत्रपती संभाजी महाराज, राजाराम महाराज कालीन संघर्ष हा राजकीय संघर्ष होता. तो धार्मिक लढा कधीच नव्हता. औरंगजेबाने संभाजीराजांना अत्यंत क्रूरपणे हाल हाल करून ठार मारले. परंतु त्या मागे धार्मिक कारणे नसून, राजकीय कारणे आहेत असे वा.सी. बेंद्रे आणि डॉ. जयसिंगराव पवार यांनी देखील नमूद केलेले आहे. तत्कालीन लढा धार्मिक नव्हता, याचा अर्थ संभाजी राजे धार्मिक नव्हते, धर्माभिमानी नव्हते, असा होत नाही. ते धर्माभिमानी होते. त्यांना आपल्या परंपरांचा अभिमान होता. छत्रपती शिवाजीराजे, संभाजीराजे यांनी शंभू महादेव, तुळजाभवानी यांच्याप्रती नितांत श्रद्धा ठेवली होती. शिवरायांनी प्रतापगडावर तुळजाभवानीचे मंदिर बांधले. संभाजी राजांनी बुधभूषण या स्वलिखीत ग्रंथात गणपती, शिवशंकर, पार्वती, श्रीभवानी यांचे वर्णन केलेले आहे. संभाजी महाराज संस्कृत पंडित होते. त्यांनी स्वधर्माचा अभिमान बाळगला पण इतर धर्माचा द्वेष केला नाही. धर्मस्थळांचा, धर्मग्रंथांचा अनादर केला नाही. याचा अर्थ ते निधर्मी किंवा धर्मनिरपेक्ष होते असेही नाही. छत्रपती संभाजी महाराजांनी अनेक मंदिरांना दान, इनामे आणि संरक्षण दिल्याची उदाहरणे उपलब्ध आहेत. विविध पत्रांमधून मंदिरांच्या पूजा-अर्चेसाठी जमीन किंवा आर्थिक मदत देण्याची नोंद आढळते. त्यांच्या कारकिर्दीत महाराष्ट्रातील तसेच कर्नाटकातील अनेक देवस्थानांची व्यवस्था कायम ठेवण्यात आली. शिवाजी महाराजांच्या काळात सुरू असलेल्या धार्मिक अनुदानांची परंपरा त्यांनी खंडित केली नाही. यावरून त्यांच्या राज्यात हिंदू धार्मिक संस्थांना संरक्षण मिळत होते हे स्पष्ट होते. छत्रपती संभाजी महाराजांचे धार्मिक धोरण हे केवळ हिंदू धर्मापुरते मर्यादित नव्हते. त्यांच्या सैन्यात आणि प्रशासनात मुस्लिम अधिकारीही कार्यरत होते. काही ठिकाणी मशिदी आणि दर्ग्यांना संरक्षण दिल्याच्या नोंदीही आढळतात. मराठा राज्यात विविध धर्मांचे लोक राहत होते. त्यामुळे राज्यकारभारात धार्मिक सहिष्णुता राखणे ही गरज होती. संभाजी महाराजांनी ही भूमिका व्यावहारिक दृष्टिकोनातून स्वीकारली. त्यामुळे त्यांच्या शासनकाळात धार्मिक छळाच्या मोठ्या घटना आढळत नाहीत. छत्रपती संभाजी महाराज हे विद्वान व साहित्यप्रेमी होते. त्यांनी संस्कृत आणि ब्रजभाषेत लेखन केले. त्यांचा 'बुधभूषणन' हा संस्कृत ग्रंथ त्यांच्या विद्वत्तेचे उत्तम उदाहरण आहे. या ग्रंथात राज्यकारभार, नैतिकता आणि धर्म यांविषयीचे विचार मांडलेले आहेत. त्यामुळे संभाजी महाराजांची धार्मिक भूमिका ही केवळ राजकीय नव्हती, तर वैचारिकही होती असे दिसते. छत्रपती संभाजी महाराजांच्या धार्मिक धोरणामुळे मराठा साम्राज्यात विविध धर्मीय लोकांमध्ये सहअस्तित्व टिकून राहिले. त्यांनी धार्मिक मुद्द्यांचा वापर राजकीय संघर्षासाठी केला नाही. संभाजीराजांच्या धोरणामुळे मराठा राज्यात धार्मिक संस्था टिकून राहिल्या आणि समाजातील विविध घटकांचा त्यांना पाठिंबा मिळाला. त्यामुळे मुघलांविरुद्धचा संघर्ष दीर्घकाळ टिकवून ठेवणे त्यांना शक्य झाले.

धर्मनिरपेक्ष संकल्पना

धर्मनिरपेक्ष आणि निधर्मी या संकल्पना आधुनिक आहेत. युरोपात रेनेसान्स अर्थात पुनर्जागरण चळवळी नंतर तेथे वैज्ञानिक शोध लागले. त्यानंतर तेथील लोकांनी ग्रंथ प्रामाण्य नाकारले. मानवतावादाला प्राधान्य मिळाले. त्यामुळे मोठ्या प्रमाणात औद्योगिक क्रांती झाली. औद्योगिक क्रांतीनंतर धर्मनिरपेक्ष संकल्पना उदयाला आली. राज्यसंस्थेला कोणताही धर्म नसतो, याचा अर्थ राज्यसंस्था कोणत्याही धर्माच्या विरोधात नाही किंवा कोणत्याही एका विशिष्ट धर्माचा अनुनय करत नाही, यालाच धर्मनिरपेक्षता म्हणतात. निधर्मी म्हणजे कोणत्याही विशिष्ट धर्माचा अंगीकार नव्हे, म्हणजे धर्मविरहित असणे होय. धर्मनिरपेक्षता –निधर्मी या संकल्पना आधुनिक आहेत. धर्मनिरपेक्षता ही संकल्पना भारतीय राज्यव्यवस्थेने स्वीकारलेली आहे. ती उत्तम आणि उदात्त आहे. परंतु या संकल्पना आधुनिक आहेत त्या मध्ययुगीन किंवा प्राचीन इतिहासावर लादणे विसंगत आहे. छत्रपती संभाजी राजे परधर्मीयांचा आदर– सन्मान करणारे होते, याचा अर्थ सामान्य प्रजेवर धार्मिक अत्याचार होत असताना केवळ शांतपणे पहात बसणारे नव्हते. औरंगजेबाने जेव्हा प्रजेवर जिजिया कर लादला तेव्हा शिवाजी राजांनी औरंगजेबाचे प्रबोधन करणारे प्रदीर्घ पत्र लिहिले. नेताजी पालकर मुस्लिम झाले होते, ते जेव्हा परत आले तेव्हा त्यांना शिवरायांनी स्व–धर्मात घेतले. गंगाधर कुलकर्णी ला सक्तीने बाटविले होते. याबाबतचा वृत्तांत संभाजीकालीन पत्रकार संग्रहात आलेला आहे. त्यावेळेस संभाजीराजांनी त्याचे शुद्धीकरण केले. या बाबी त्यांचे धार्मिक धोरण सांगतात, त्यांचा धर्म अभिमान

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

सांगतात. शिवाजी राजे, संभाजी राजे धर्माभिमानी होते. यासाठी समकालीन दोन संदर्भ महत्त्वाचे आहेत. एक म्हणजे शिवरायांच्या राज्याभिषेक प्रसंगी सभासदांनी म्हटले आहे, " हा मऱ्हाटा पात्तशाहा बादशाह एवढा छत्रपती जाला. ही गोष्ट काही सामान्य जाली नाही." सभासद हे ' मराठा पात्तशाहा' असा उल्लेख करतात. दुसरा संदर्भ असा राजाराम महाराज मराठा सरदारांना पाठवलेल्या पत्रात म्हणतात,"हे मऱ्हाठे राज्य, तुम्ही आम्ही मऱ्हाठे लोकी इमानासी खता (लबाडी) न करिता मऱ्हाठे धर्माची दुरे (इर्षा) धरून स्वामीकार्य करावे." वरील दोन संदर्भांवरून स्पष्ट होते की शिवाजीराजे, संभाजीराजे, राजाराम महाराजांच्या काळात मराठा धर्म अशी संकल्पना होती. मराठा ही व्यापक, समूहवाचक संकल्पना आहे. ती जातिवाचक नाही. शिवाजीराजे, संभाजीराजे, राजाराम महाराज यांनी मराठा धर्माचा अभिमान बाळगला. त्यांना धर्म हवा होता ते धार्मिक होते परंतु त्यांना स्त्रियांचा आदर सन्मान करणारा, सर्व जातीधर्मियांना सोबत घेऊन पुढे जाणारा,प्रागतिक विचारांचा धर्म त्यांना अभिप्रेत होता.

शाक्त धर्माची परंपरा

छत्रपती संभाजी महाराजांच्या धार्मिक धोरणाचा विचार करताना त्यांच्या वैयक्तिक श्रद्धा आणि राज्यकारभारातील धोरण यामध्ये स्पष्ट भेद दिसून येतो. त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात शाक्त धर्माचा प्रभाव आढळतो. छत्रपती संभाजी राजांचे सासरे पिलाजी शिर्के शाक्तपंथाचे होते. ते जेथे राहत ते शृंगारपूर हे शाक्तांचे एक प्रभावी केंद्र होते. शाक्त तत्वज्ञानी शिवयोगी याने तेथे आपली मठी स्थापून पंथाच्या प्रचारास सुरुवात केली होती. संभाजी राजांचा प्रधान कवी कलश हा शाक्त पंथाचा जाणकार होता. बहुजन समाजाची कुलदेवता तुळजाभवानी ही शिवरायांची स्फूर्तीदात्री होती. शक्तीचे उपासक म्हणजेच शाक्त होय. प्राच्यविद्यापंडित शरद पाटील,'संभाजीचा धर्म कोणता?' या प्रश्नाचे उत्तर देताना ते म्हणतात संभाजीराजे शाक्त होते. ते शक्तीचे उपासक होते. शाक्त परंपरेत स्त्रियांना प्राधान्य असते. त्यामुळे संभाजी राजांनी आपल्या महाराणी येसूबाई यांना कुलमुख्यार करून सर्वाधिकार दिले. त्यांनी स्त्रियांचा आदर सन्मान केला. शरद पाटील सांगतात, शाक्त धर्माचे एक सूत्र आहे. ' शैव (शाक्त)– संस्कार–संपन्ने भेदाभेद नकारयेत '[९]. म्हणजेच शाक्त संस्काराने संपन्न झालेली व्यक्ती आपल्या खाजगी आणि सार्वजनिक आयुष्यात कधीच भेदभाव पाळत नाही. संभाजी राजांनी कधीच भेदभाव बाळगला नाही. त्यामुळे शरद पाटील छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानाबद्दल म्हणतात, "संभाजी जात्यंतवादी शाक्त हुतात्मा होता!". म्हणजे संभाजीराजे हे शाक्तवीर होते. राज्यकारभार करताना त्यांनी कोणत्याही एका धर्माला प्राधान्य देण्याऐवजी सर्व धर्मांप्रती समान आदराची भूमिका घेतली. त्यामुळे त्यांच्या धार्मिक धोरणामध्ये सहिष्णुता आणि धर्मनिरपेक्षतेची छटा दिसून येते.

निष्कर्ष

नलवडे, ए. एस. (2026). आर्थिक विकास एक पर्यावरणीय समस्या आणि शाश्वत विकासासाठी उपाययोजना. Journal of research & development, 18(3(IV)), 141–145. https://doi.org/10.5281/zenodo.20746041

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.20746041
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

आर्थिक विकास व पर्यावरण यामधील संबंध हे गुंतागुंतीचे आहेत. पर्यावरण संरक्षण व आर्थिक विकास एकत्रित साधण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे तसेच शहाणपणाचे ठरेल. वाढत्या लोकसंख्येबरोबर मानवाच्या वाढत्या गरजा भागविण्यासाठी उपलब्ध निसर्ग संपत्तीवरील ताण वाढत आहे. आर्थिक विकास व पर्यायाने जीवन विकास साधण्यासाठी मानवाची धडपड आज दिशाहीन वाटते. अलीकडील काळात भारतासह सर्वच देशांनी कल्याणकारी राज्याची संकल्पना स्विकारली आहे. प्रत्येक देश आपल्या देशातील लोकांचे जास्तीत जास्त हित साध्य करण्याचा प्रयत्न करत आहे. त्यासाठी शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्राचा जास्तीत जास्त विकास करण्यावर भर दिला जातो आहे. परंतु दुसऱ्या बाजूला त्याचा पर्यावरणावर प्रतिकूल परिणाम होऊन अनेक पर्यावरणीय समस्या निर्माण होत आहेत. मानव हा पर्यावरणाचा एक अविभाज्य घटक आहे. त्यामुळे पर्यावरणाच्या हानींचा मानवाच्या कल्याणावर प्रतिकूल परिणाम झाल्याशिवाय राहत नाहीत. अलीकडील काळात अनेक निसर्गनिर्मित संकटे निर्माण झाली आहेत. याचे महत्वाचे कारण म्हणजे मानवाचा अति हव्यास किंवा आर्थिक विकास साधत असताना पर्यावरणाची लावलेली वाट हे आहे. अर्थात आर्थिक विकास आपल्याला हवाच हवा परंतु, त्यामुळे पर्यावरणाची हानी तर होणार नाही ना? म्हणजेच पर्यावरण पूरक आर्थिक विकास साध्य करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने प्रस्तुत शोध निबंधामध्ये आर्थिक विकासातून कशाप्रकारे पर्यावरणाची हानी होते आणि विकासाची प्रक्रिया पर्यावरण पूरक शाश्वत कशी असेल त्यादृष्टीने कोणकोणत्या उपाययोजना करता येतील याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

शोध निबंधाची उद्दिष्टये:-

प्रस्तुत शोध निबंधाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

1) आर्थिक विकासाचा पर्यावरणावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे,

2) आर्थिक विकास साध्य करत असताना पर्यावरणाची जी हानी होते ती भरुन काढून पर्यावरण पूरक शाश्वत आर्थिक विकास साध्य करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

संसाधन पध्दती:- प्रस्तुत शोध निबंधासाठी वर्णनात्मक पध्दतीचा अवलंब केला असून त्यासाठी पूर्णपणे दुय्यम सामग्रीचा वापर केला आहे. संदर्भग्रंथ, मासिके, अहवाल इ. आधारे माहिती संकलित केली आहे.

आर्थिक विकास आणि पर्यावरणीय असमतोल:- अलीकडील काळात जगातील सर्वच देश जलद आर्थिक विकास साध्य करण्यासाठी शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्राच्या विकासाला प्रोत्साहित करत आहेत. त्यातून पर्यावरणीय समतोल नष्ट होऊन अनेक पर्यावरणीय समस्या निर्माण होत आहेत. हे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

1) आर्थिक विकास: शेती क्षेत्र आणि पर्यावरण:-

प्राचीन काळापासून मानवाने शेती करण्यास सुरुवात केली असली तरी त्याकाळी शेती ही निसर्गाच्या मर्यादेतच केली जात असे. त्यामुळे त्याचा पर्यावरणावर फारसा प्रतिकूल परिणाम होत नव्हता. परंतु अलीकडील काळात जलद आर्थिक विकास साध्य करण्यासाठी जगातील सर्वच देशांत शेती उत्पादन वाढविण्यावर भर दिला जात आहे. शेती उत्पादन वाढविण्यासाठी संकरित बियाणांबरोबरच रासायनिक खते, कीटकनाशके, जलसिंचन इ.चा अतिरिक्त वापर केला जात आहे. त्यामुळे जमिनीमधील क्षारांचे प्रमाण वाढून क्षारपड जमिनीचा प्रश्न निर्माण होत असलेला आपणांस दिसून येतो. त्याचप्रमाणे शेतीला जी रासायनिक खते दिली जातात. त्यापैकी फक्त 33% खते पिकांना उपयुक्त ठरतात. 33% हवेत मिसळून हवा प्रदूषणात वाढ करतात. तर 33% खते ही जमिनीमध्ये मुरुन जलप्रदूषणात वाढ करत आहेत. तसेच कीटकनाशकांच्या वाढत्या वापरामुळे उत्पादनात वाढ होत असली तरी अन्नसाखळीद्वारे प्राणी, पक्षी व अनेक सूक्ष्मजीव मरत आहेत. घातक कीटकनाशकांचा वापर फळांवर, पिकांवर व जनावरांच्या चाऱ्यांवर केलेल्या अतिवापराचा परिणाम जनावरांचे मांस, तसेच दुधामध्ये, फळांच्या रसामध्ये व धान्यामध्ये त्या कीटकनाशकांचा काही अंश समाविष्ट झाला आहे. एवढेच नाही तर, भारतीय वैद्यकीय संशोधन संस्था नवी दिल्ली यांनी केलेल्या संशोधनामध्ये असे आढळून आले आहे की, भारतीय मातांच्या दुधातही काही प्रमाणात कीटकनाशकांचा अंश आढळून आला आहे.

2) आर्थिक विकास औद्योगिकीकरण आणि पर्यावरण:-

आर्थिक विकास प्रक्रियेमध्ये औद्योगिक क्षेत्राचे योगदान खूप मोठे असते. त्यादृष्टीने आज जगातील सर्वच देश हे औद्योगिक विकासावर भर देत असलेले दिसून येतात. औद्योगिक विकासातून धूर, धूळ, विषारी हवा, दूषित पाणी, किरणोत्सारी पदार्थ इ. दूषितके बाहेर टाकली जातात. त्यामुळे औद्योगिक प्रदूषण निर्माण होऊन पर्यावरणाची हानी होते. त्याचबरोबर उद्योगातील टाकाऊ पदार्थ,

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

रासायनिक घटक हे नजीकच्या ओढा-नाल्यात किंवा नदीत, समुद्रात विसर्जित केले जातात. त्यामुळे जलप्रदूषण निर्माण होऊन पाण्यातील असंख्य जीवजंतू नष्ट होत आहेत. तसेच त्याचा मानवी आरोग्यावरही प्रतिकूल परिणाम होत आहे.

3) आर्थिक विकास जंगलतोड आणि पर्यावरण:-

मानवाच्या अस्तित्वासाठी जंगलांची गरज असते. मानवाच्या स्वास्थ संवर्धनासाठी आवश्यक असणाऱ्या वनस्पती या घनदाट अरण्यात वाढत असतात. पर्यावरण संतुलन राखण्यासाठी भूपृष्ठाच्या किमान 33% भाग हा जंगलाखाली असणे आवश्यक असते. परंतु अलीकडील काळात भारतासह जगातील सर्वच देशात आर्थिक विकास प्रक्रियेचा भाग म्हणून जंगलतोड मोठ्या प्रमाणात होत आहे. रस्ते वाहतूक, रेल्वे वाहतूक, मोठ-मोठे औद्योगिक प्रकल्प तसेच खनिजांचे उत्खनन आणि शेती उत्पादन वाढविण्यासाठी जंगलतोड मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे पर्यावरणीय असमतोल नष्ट होऊन भूपृष्ठाचे तापमान वाढत आहे. अति जंगलतोडीमुळे पर्जन्यमानातील अस्थिरता, दुष्काळ, महापूर जमिनीची धूप इ. समस्या निर्माण होत आहे. त्याचप्रमाणे जमिनीमधील पाण्याची पातळी खोलवर जात आहे.

4) आर्थिक विकास वाहतूक आणि पर्यावरण:-

वाढत्या विकास प्रक्रियेबरोबर स्वयंचलित दुचाकी आणि चारचाकी वाहने यांचे प्रमाण वाढते. वाहनांमध्ये इंधन वापरले जाते. त्यातून वायूंचा उत्सर्ग होतो व हवा प्रदूषित होते. जगातील सर्वच देशांत प्रवासी व मालवाहतूक साधनांच्या वृध्दीमुळे विषारी वायूंचा प्रसार मोठ्या प्रमाणात होत आहे. हवेतील प्रदूषकात 95% भाग हा शिशाचा असतो. शिशायुक्त हवा ही अत्यंत अपायकारक असते. हवा प्रदूषणामुळे मानवी आरोग्यावर अत्यंत प्रतिकूल परिणाम घडून येतात. सल्फरडाय ऑक्साईड ची पातळी वाढल्यास थंडी, खोकला, नाकाची जळजळ यांसारखे विकार उद्भवतात. हवा प्रदूषण दीर्घकाळ टिकल्यास फुप्फुसाचा कर्करोग, दाह, दमा यांसारखे रोग उ द्भवतात. त्याचप्रमाणे शिशाचे सुक्ष्मकण अधिक असल्यामुळे मुलांचा बुध्दीगुणांक कमी होत असलेला आढळून आला आहे. याशिवाय धातू, इमारती, कापड इ. वर हवा प्रदूषणाचा प्रतिकूल परिणाम होतो आहे. तसेच विविध वाहने व कारखाने यांचेद्वारे होणाऱ्या हवा प्रदूषणामुळे ओझोनचे प्रमाण कमी होत आहे. सर्वसाधारणपणे पृथ्वीपासून 40 कि.मी. उंचीवर ओझोन वायूचा थर असतो. सूर्यापासून जी उष्णता पृथ्वीवर येते त्यात अडथळा निर्माण करुन पृथ्वीवरील तापमान कमी ठेवण्यामध्ये ओझोन वायू हा अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडतो. परंतु हवा प्रदूषणामुळे ओझोन वायूचा थर कमी होऊन सूर्याची किरणे पृथ्वीवर विना अडथळा येत आहेत. त्यामुळे पृथ्वीवरील तापमान वाढत आहे. तापमानात वाढ होऊन मानवाच्या त्वचेच्या कर्करोगात वाढ होत आहे. याशिवाय तापमानात वाढ झाल्यामुळे पावसाच्या वितरण व प्रमाणावर प्रतिकूल परिणाम होऊन शेती क्षेत्र धोक्यात येत आहे. त्याचप्रमाणे तापमानात वाढ झाल्यामुळे हिमाच्छादित प्रदेशांतील बर्फ वितळून सागर जलाची पातळी वाढून पृथ्वीचा भूभाग पाण्याखाली जात आहे. त्यामुळे भारतासह जगातील अनेक देशांतील मोठी शहरे पाण्याखाली जाण्याचा धोका निर्माण होतो आहे.

5) आर्थिक विकास शहरीकरण आणि पर्यावरण:-

वाढत्या आर्थिक विकासाबरोबर शहरीकरणाचे प्रमाणही वाढत आहे. कारण आर्थिक विकासाबरोबर ग्रामीण भागातील लोकसंख्येचे प्रमाण कमी कमी होऊन शहरी लोकसंख्येचे प्रमाण वाढत जाते. शहरीकरणामुळे निवास, पाणी, कचरा, ऊर्जा, वाहतूक, प्रदूषण इ. समस्या निर्माण होऊन पर्यावरणीय समतोल नष्ट होत आहे. भारतासह जगातील अनेक देशातील शहरांमधून घरगुती टाकाऊ पदार्थांचे प्रमाण मोठ्या प्रमाणामध्ये वाढत आहे. तसेच शहरी भागात खाजगी पाणी वापरामुळे दूषित झालेल्या सांडपाण्यापासून कॉलरा, टायफाईड यांसारखे रोग फैलावत आहेत. गटारातील पाण्यामुळे जीवघेण्या जीवाणूंची मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. याचाही मानवाच्या राहणीमानावर प्रतिकूल परिणाम होत आहे.

6) आर्थिक विकास खनिज साधनसामग्री आणि पर्यावरण:-

वाढत्या आर्थिक विकासाबरोबर खनिज साधनसामग्रीवर अतिरिक्त ताण निर्माण होत आहे. तेल वायू, नैसर्गिक वायू, लोखंड, पोलाद, कोळसा यांचे मोठ्या प्रमाणावर उत्खनन केले जात आहे. त्यामुळे पृथ्वीमध्ये पोकळी निर्माण होत आहे. अनेक डोंगर भूईसपाट होऊन पृथ्वीवरील नैसर्गिक सृष्टी नष्ट होऊन असे अनेक भाग ओसाड बनत आहेत. उदा-भारतात गोव्यामध्ये अशा प्रकारची परिस्थिती खनिज उत्खननामुळे झालेली दिसून येते. गोवा विद्यापिठातील माजी प्रमुख भूगर्भ शास्त्रज्ञ डॉ.ए.जी.चचाडी यांच्या अभ्यासानुसार एक टन खनिज निर्मितीसाठी तीन पटीने अधिक मातीचे उत्खनन करावे लागते. त्यामुळे असे म्हणता येईल की, टाकाऊ माती व महाकाय खड्डे हे आजचे खनिज उद्योगधंद्याने निर्माण केलेले सर्वांत भयावह प्रश्न आहेत. तसेच पाऊस पडल्यानंतर टाकाऊ माती ओढ्या नाल्यांमार्फत

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

नदीमध्ये जाऊन पाणी दूषित करते. हे पाणी पिण्यास तर धोकादायक होतेच परंतु त्याचबरोबरच शेतीसाठीही निरुपयोगी ठरते. तसेच टाकाऊ माती नदीत गेल्यामुळे नदी उथळ बनून नदीचा प्रवाहही मंदावत आहे. तसेच तिच्या पात्रामध्ये अनेक अडथळे निर्माण होऊन नदीच्या अस्तित्वाला तीव्र धोका निर्माण होतो आहे. त्याचबरोबर नदीच्या प्रवाहामध्ये बदल होऊन अनेक समस्या निर्माण होत आहेत.

पर्यावरण पूरक आणि पर्यावरणाचे संरक्षण साध्य करुन शाश्वत आर्थिक विकास साध्य करण्यासाठी उपाययोजना:-

सर्वसाधारणपणे आर्थिक विकास आणि पर्यावरण यामधील परस्पर सहसंबंध हा विरोधी आहे. असे असले तरी आर्थिक विकासाची प्रक्रिया आपल्याला अल्पकाळाबरोबरच दीर्घकाळातही टिकवून ठेवावयाची असेल, देशातील लोकांचे जास्तीत जास्त हित साध्य करायचे असेल, खऱ्या अर्थाने कल्याणकारी राज्याची संकल्पना प्रत्यक्षात आणावयाची असेल तर पर्यावरणपूरक आणि पर्यावरणाचे संरक्षण करुन शाश्वत आर्थिक विकास साध्य करणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्वसाधारणपणे जगातील सर्वच देशांनी पुढील उपाययोजनांची आखणी आणि अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

1) शिक्षण पध्दतीत पर्यावरण विषयक जागरुकता, संतुलन व संवर्धन यांचा समावेश करुन प्राथमिक स्तरापासून उच्च स्तरापर्यंत पर्यावरण अभ्यासक्रम राबविणे आवश्यक आहे.
2) सरकार, प्रशासन, अभ्यासक, शास्त्रज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, खाजगी व सेवाभावी संस्था या सर्वांनी पर्यावरण जनजागृती या मोहिमेत सहभागी होऊन पर्यावरणाचे संरक्षण करणे आवश्यक आहे.
3) जगातील सर्वच देशांनी पर्यावरणविषयक जे कायदे केले आहेत, ते सर्व कायद्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.
4) जे उद्योग प्रदूषण निर्माण करतात. त्याच्यावर वाढत्या प्रदूषणाबरोबर वाढत्या दराने म्हणजेच प्रगतशील प्रदूषण कर पध्दतीचा वापर करुन कर उत्पन्नाचा वापर पर्यावरण संवर्धनासाठी करणे आवश्यक आहे.
5) आंतरराष्ट्रीय पातळीवर पृथ्वीची हवामान विषयक परिवर्तन, चिकित्सा करुन पृथ्वी संरक्षण निधी उभारुन त्यातून देशादेशांत पर्यावरण समतोल तंत्रज्ञानाची देवाण-घेवाण करावी. त्यामुळे निश्चितच पर्यावरण संवर्धन होण्यास मदत होईल.
6) पर्यावरणाची हानी होईल अशा उत्पादन पध्दतीऐवजी उत्पादनात वाढही होईल आणि त्याचबरोबर पर्यावरणाचेही संवर्धन होईल अशा उत्पादन पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक आहे.
7) टाकाऊ वस्तूपासून टिकाऊ वस्तू निर्माण करण्याऱ्या उद्योगांना प्रोत्साहित करणे आवश्यक आहे.
8) शेतीविकास साध्य करत असताना शेतीमध्ये रासायनिक खताऐवजी जैविक खतांचा जास्तीत-जास्त कसा वापर होईल त्यादृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे.
9) वनांखालील क्षेत्र कमी होऊ नये यासाठी वृक्षतोडीवर बंदी घालून वृक्षारोपण आणि वनसंवर्धनाची कामे हाती घेणे आवश्यक आहे.
10) पर्यावरणाशी पूरक अशी अर्थव्यवस्था जगातील सर्वच देशांनी निर्माण करणे आवश्यक आहे.
11) आर्थिक विकास, लोकसंख्यावाढ आणि पर्यावरण यामध्ये घनिष्ठ सहसंबंध आहे. त्यामुळे आर्थिक विकास साध्य करत असताना जगातील सर्वच देशांनी वाढती लोकसंख्या नियंत्रित करणे आवश्यक आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे निसर्गावर अतिरिक्त ताण निर्माण होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

समारोप:-

आर्थिक विकास आणि पर्यावरण यांचेमध्ये अत्यंत घनिष्ठ अशा प्रकारचा सहसंबंध आहे. आपल्याला एका बाजूला आर्थिक विकासही हवा आहे आणि त्याचबरोबर दुसऱ्या बाजूला पर्यावरण संवर्धनही हवे आहे. त्यादृष्टीने वरील उपाययोजनांचा अवलंब केल्याने आर्थिक विकासाची प्रक्रिया दीर्घकाळापर्यंत टिकून राहील. त्याचबरोबर पर्यावरणाचेही संरक्षण होऊन शाश्वत विकास साध्य करता येईल त्यादृष्टीने भारतासह जगातील सर्वच देशांनी वरील उपाययोजनांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. त्याशिवाय जगातील सर्वच देशांचे कल्याणकारी राज्य निर्माण करण्याचे उद्दिष्ट साध्य होणार नाही.

संदर्भ

1) वा.र.अहिरराव, यु.यु.अलीझाड, तु.मा.वराट, चं.सा.धापटे, रा.शा.बोस पर्यावरण विज्ञान, जुलै 1999.
2) डॉ.जे.एफ. पाटील, अर्थतरंग, जून 2000.
3) रविंद्र दोशी, अर्थसंवाद खंड 19. अंक 4, 1996.
4) डॉ. हरबंस.एस. बशी, पर्यावरण प्रदूषण आणि हृदयविकार, योजना सप्टेंबर, 1997.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

5) करमळकर, पागनीस, देवस्थळी, पर्यावरण शास्त्र, 1995.

6) प्रा. मोहन जोशी, समाजवादी प्रबोधनी, 1996.

7) डॉ.पी.ए. कोळी, डॉ. आर. जी. दांडगे, आपले पर्यावरण, 2000.

8) Hosetti B.B., Concept of Wild life Management-1997-

9) World Bank Report-2018

10) Gardiner, David and Porthey, Environmental and Economic Growth, 1995.

11) Ahirrao and Choudhari, Environmental Science, 1988

12) Datival D.K. Fundamental of Environmental Science, 1999

13) Chandra R.C. Geography of Population, 1990.

14) Asthama D.K. & Asthama M, Environmental Problems and solutions, 1999.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

Original Article

मराठेकालीन किल्ले पुरंदर - वज्रगड येथील पर्यटन व शाश्वत विकास

महाले अंबादास निवृत्ती1, डॉ.सुरेंद्र अर्जुन शिरसाट2

[1]संशोधक विद्यार्थी, ग्रामोन्नती मंडळाचे' कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे.

[2]संशोधक मार्गदर्शक ग्रामोन्नती मंडळाचे' कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे.

Email: iamambadas@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180333
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 3(IV)
Pp. 146-149
March- 2026
Submitted: 15 Feb. 2026
Revised: 25 Feb. 2026
Accepted: 10 Mar. 2026
Published: 31 Mar. 2026

सारांश:

मराठेकालीन किल्ले पुरंदर–वज्रगड हे महाराष्ट्राच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारशाचे महत्त्वपूर्ण प्रतीक आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेत या किल्ल्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली असून छत्रपती संभाजी महाराजांचे जन्मस्थान म्हणूनही त्यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या किल्ल्यांवरील ऐतिहासिक वास्तू, मंदिरे, दुर्मीळ वनस्पती, नैसर्गिक सौंदर्य आणि साहसी पर्यटनाच्या संधी यांमुळे ते पर्यटकांचे आकर्षण केंद्र बनले आहेत. पर्यटनाच्या वाढत्या प्रवाहामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळत असली तरी किल्ल्यांचे संवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि सांस्कृतिक वारशाचे जतन करणे आवश्यक आहे. शाश्वत पर्यटनाच्या माध्यमातून किल्ल्यांची ऐतिहासिक अखंडता टिकवून ठेवणे, स्थानिक समुदायाचा सहभाग वाढविणे, कचरा व्यवस्थापन, प्लास्टिकमुक्त परिसर आणि पर्यावरणपूरक सुविधा उपलब्ध करणे यावर भर देण्यात आला आहे. किल्ले पुरंदर–वज्रगड यांचे पर्यटन आणि शाश्वत विकास यांचा समतोल साधल्यास हा वारसा भावी पिढ्यांसाठी सुरक्षित राखता येईल.

मुख्यशब्द: *किल्ले पुरंदर, वज्रगड, मराठेकालीन किल्ले, पर्यटन, शाश्वत विकास, ऐतिहासिक वारसा, दुर्गसंवर्धन, पर्यावरण संरक्षण, स्थानिक समुदाय, सांस्कृतिक वारसा.*

प्रस्तावना :

"सपूर्ण राज्याचे सर ते दुर्ग, दुर्ग नसता मोकळा देश परचक्र येताच निराश्रय प्रजा, भग्न होऊनि देश उद्वस्त होतो.हे राज्य तरी तीर्थरूप कैलासवासी स्वामींनी गडावरून निर्माण केले. गडकोट विरहित जे राज्य त्या राज्याची स्थिती म्हणजे अभ्रपटल न्याय आहे. याकरिता ज्यास राज्य पाहिजे त्यांनी गडकोट हेच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचे मूळ, गडकोट म्हणजे आपले प्राणरक्षक, पैसे चित्तास आणीन कोण्हाचे भरवशावर न जाता, आहे त्याचे संरक्षण करणे व नूतन बांधणे याचा हव्यास स्वतःच करावा", अशा शब्दात रामचंद्रपंत अमात्य यांनी अज्ञापत्रामध्ये किल्यांचे महत्व सांगितले आहे. भारत हा देश प्राचीन कालखंडापासून उज्ज्वल इतिहासाचा वारसा लाभलेला देश आहे,याच भारत देशातील लिहिल्या गेलेल्या मध्ययुगीन भारताचा इतिहासात महाराष्ट्राचा इतिहास हा सुवर्ण अक्षरांनी लिहिला गेला आहे, त्यामध्ये विविध राजे त्यांचे साम्राज्य, किल्ले, सत्ता, सरदार विविध व्यक्तींचे शौर्य व पराक्रम ह्या सर्व गुणांनी नटलेल्या महाराष्ट्रातील मराठा साम्राज्याचा इतिहास हा किल्ल्यांच्या अभ्यासाशिवाय पूर्ण होत नाही. त्याच मराठा साम्राज्यातील इत्तर किल्यांपैकी अत्यंत महत्व पूर्ण असणारा किल्ला हा पुरंदर किल्ला होय. पुरंदर किल्ल्याला पुराणकाळात इंद्रनील पर्वत असे म्हटले जायचे. हनुमंताने द्रोणागिरी उचलून नेत असताना त्या पर्वताचा काही भाग येथेच खाली पडला. तोच हा इंद्रनील पर्वत होय. किल्ल्यावर आजही अनेक प्रकारच्या वेगवेगळया वनस्पती व त्यांच्या प्रजाती आपणास पहावयास मिळतात.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
महाले अंबादास निवृत्ती संशोधक विद्यार्थी, संशोधक मार्गदर्शक संशोधन केंद्र ग्रामोन्नती मंडळाचे कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे.

How to cite this article:
महाले, . अंबादास . निवृत्ती ., & शिरसाट, . सुरेंद्र . अर्जुन . (2026). मराठेकालीन किल्ले पुरंदर - वज्रगड येथील पर्यटन व शाश्वत विकास. Journal of research & development, 18(3(IV)), 146–149.
https://doi.org/10.5281/zenodo.20746145

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.20746145
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

त्यापैकी काही वनस्पतीच्या प्रजाती ह्या परदेशी आहेत.तर काही विविध भागातील आहेत त्यामुळे किल्ले पुरंदर वज्रगड येथील नैसर्गिक संपन्नता भुरळ पाडल्याशिवाय राहत नाही. तसेच किल्यावर आजही अनेक ऐतिहासिक स्मारके, व त्यांचे अवशेष तसेच मंदिरे,पाण्याची टाके आपणास पहावयास मिळते.

ऐतिहासिक महत्त्व :

पुरंदर वज्रगड हे किल्ले महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यात स्थित असून एक भव्य पर्वतीय किल्ला या प्रकारातील किल्ला आहे. सह्याद्री पर्वतरांगांमध्ये वसलेला हा किल्ला समुद्रसपाटीपासून १,३७४ मीटर (४,५०८ फूट) उंचीवर आहे. मराठा साम्राज्याच्या उदय आणि पतनातील महत्त्वाचे क्षण पाहणाऱ्या या किल्ल्याला ऐतिहासिक महत्त्व आहे. महाराष्ट्राच्या इतिहासाला आकार देण्यात पुरंदर किल्ल्याने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. १६४६ मध्ये, मराठा साम्राज्याचे महान मराठा योद्धा छत्रपती शिवाजी महाराजांनी हा किल्ला आपल्या ताब्यात घेतला आणि तो मराठा साम्राज्याचा एक भाग बनला.

छत्रपती संभाजी महाराज यांचे जन्मस्थान :

छत्रपती शिवाजी महाराजांचे पुत्र छत्रपती संभाजी महाराज यांचा छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म १४ मे १६५७ रोजी पुणे जिल्ह्यातील याच पुरंदर किल्ल्यावर झाला त्यांचे जन्मस्थान म्हणून पुरंदर किल्ल्याला अधिक महत्त्व प्राप्त झाले. संभाजी महाराज मराठा साम्राज्याचे दुसरे छत्रपती बनले, त्यांच्या शौर्य आणि बुद्धिचातुर्य हे सामरिक तेज असणारे युगपुरुष म्हणून देखील त्यांना ओळखले जाते.

किल्ले पुरंदर येथील वनस्पती :

१) येथे गवताळ प्रकारच्या वनस्पती वाढतात. मोठी झाडे वाढत नाहीत.

२) 'फेरिया इंडिका' नावाची दुर्मीळ वनस्पती वज्रगडाच्या खडकांवर आढळते.

३) याशिवाय जेरेनियम, डेल्फिनियम या दुर्मीळ पुष्पवनस्पती पुरंदरवर आहेत.

४) ६०० पेक्षा अधिक प्रकारच्या वनस्पती, फुले वेगवेगळ्या ऋतूंमध्ये येत असतात.

५) येथे विविध प्रकारच्या औषधी वनस्पती मिळतात.

संत नामदेव यांच्या नामदेव गाथेमध्ये ४१३-९, १० या अभंगांत येथील पर्वत व वनस्पतींचे वर्णन केलेले आहे. द्रोणाचळ इंद्राचळ । हनुमंते आणिला विशाल ।त्याच्या शाखा अधोमुळ । तो हा इंद्रनीळ ।।९।। येथे वल्ली सुवर्णाकार । गुप्त असती त्या निर्धार । दिसे अस्तमानी अंधार। दीप आकार जगाप्रती ।।१०।। यामध्ये वनस्पतींचे महत्व सांगितलेले दिसून येते.

किल्ले पुरंदर वज्रगड येथील ऐतिहासिक वास्तू व देवस्थाने :

पुरंदरेश्वर मंदिर,सवाई माधवराव पेशवे यांचे जन्मस्थान -रामेश्वर मंदिर ,पुरंदर किल्ल्यावर एकुण दोन चर्च आहेत, बालेकिल्ला, कंदकडा टेकडी, तट प्रदक्षिणा, गणेश दरवाजा, फत्ते बुरुज व झुंजार बुरुज, केदार दरवाजा, पहारे, अलंगा, राजगादी, तोफखाना, जामदारखाना, केदारटेकडी, श्रीकेदारेश्वर, केदारगंगा, नारायण पेठ इत्यादी वास्तू व देवस्थाने आहेत.

पर्यटन :

पर्यटन या शब्दाला इंग्रजीमध्ये Tourist असे म्हंटले जाते त्याला लॅटिन भाषेत तोरणूस असे म्हटले जाते तसेच पर्यटनाला इंग्रजीमध्ये Tourism असे म्हटले जाते तसेच तो शब्द Tornus या लॅटिन शब्दापासून तयार झाला आहे. Tourn याचा अर्थ Journey /प्रवास असा होतो महणजेच नवीन स्थळाविषयी माहिती घेणे, अभ्यास करणे तसेच आनंद व मनोरंजनसाठी नव्या स्थळांना भेटी देणे. जे उत्कांठेपायी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी गमती जमती अथवा मी प्रवास केला आहे हे सांगण्यासाठी भ्रमंती करतो त्यास पर्यटक म्हणतो.

पर्यटनाचे हेतू / उदिष्ट्ये:

१. आनंद मिळवणे २.अभ्यास व संशोधन करणे ३. करमणूक व मनोरंजन करणे ४.देशाचा इतिहास व संस्कृती समजून घेणे ५.ऐतिहासिक कला स्थापत्य व मूर्ती कलांची पाहणी करणे ६.देवी देवतांचे दर्शन करणे.

पर्यटन प्रकारापैकी ऐतिहासिक पर्यटन :

प्रचलित एकुण पर्यटन प्रकारापैकी ऐतिहासिक पर्यटन या पर्यटनामध्ये ऐतिहासिक वस्तू,स्मारके व ठिक ठिकाणांना भेट देणे समाविष्ट आहे या पर्यटना मध्ये पर्यटकांचा कल प्राचीन अवशेष, किल्ले आणि वारसा स्थळे या ठिकाणी संरक्षित ऐतिहासिक स्थळांना भेट देण्याकडे असतो तसेच या पर्यटनामध्ये शैक्षणिक सहलींचा समवेश होतो कारण गतकाळात घडून गेलेल्या संसृतीचा इतिहास, घडामोडी, वास्तुकला,आणि सांस्कृतिक वारसा बद्दल शैक्षणिक अनुभव व ऐतिहासिक दृष्टी मिळते या सर्व पर्यटनामुळे पुढे स्थानिक अर्थव्यवस्थेमध्ये सुधारणा होऊन पर्यटनाला चालना मिळते आणि स्थानिक रोजगार निर्माण होतो. नुकतेच युनेस्कोच्या (UNESCO) जागतिक वारसा यादीत (२०२५ च्या घोषणेनुसार) महाराष्ट्रातील ११ आणि तामिळनाडूतील १ अशा एकूण १२ मराठा लष्करी किल्ल्यांचा 'मराठा मिलिटरी लँडस्केप्स' (Maratha Military Landscapes) म्हणून समावेश करण्यात आला आहे.ते किल्ले रायगड (Raigad) राजगड (Rajgad) शिवनेरी (Shivneri) प्रतापगड (Pratapgad) लोहगड (Lohagad) साल्हेर (Salher)पन्हाळा (Panhala) विजयदुर्ग (Vijaydurga)सिंधुदुर्ग (Sindhudurg) सुवर्णदुर्ग (Suvarnadurg) खांदेरी (Khanderi) यामुळे नक्कीच पर्यटनाला चालना मिळेल.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

किल्ल्यांचे पर्यटन व शाश्वत विकास :

किल्यांचे पर्यटन व शाश्वत विकास म्हणजे ऐतिहासिक वारसा, पर्यावरण आणि स्थानिक संस्कृतीचे रक्षण करून पर्यटनाला चालना देणे होय. यात तटबंदीचे मूळ रूपात संवर्धन, दुर्ग संवर्धन मोहिमांद्वारे स्वच्छता, आणि पर्यटकांना सुविधा पुरवताना निसर्गाला हानी न पोहोचवणे यांचा समावेश आहे. तसेच शाश्वत पर्यटनामध्ये संपूर्ण पर्यटन अनुभवाचा समावेश होतो, ज्यामध्ये आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय समस्यांबद्दल काळजी तसेच पर्यटकांचे अनुभव सुधारण्याकडे लक्ष दिले जाते. शाश्वत विकास हा वाढ आणि मानवी विकासाचा एक दृष्टिकोन आहे ज्याचा उद्देश भविष्यातील पिढ्यांच्या स्वतःच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेशी तडजोड न करता वर्तमानाच्या गरजा पूर्ण करणे आहे. याचे उद्दिष्ट असे आहे की असा समाज निर्माण करणे जिथे राहणीमान आणि संसाधने ग्रहांच्या अखंडतेला धक्का न लावता मानवी गरजा पूर्ण करतील. शाश्वत विकासाचा उद्देश अर्थव्यवस्था, पर्यावरण आणि समाजाच्या गरजा संतुलित करणे आहे.

किल्ल्यांच्या शाश्वत पर्यटनासाठी महत्त्वाचे घटक:

महाराष्ट्रातील किल्ल्यांचे शाश्वत पर्यटन विकास म्हणजे पर्यावरण, स्थानिक संस्कृती आणि अर्थव्यवस्था यांचा समतोल राखून संवर्धन करणे. यामध्ये किल्ल्यांची ऐतिहासिक अखंडता टिकवून, स्थानिक रोजगार वाढवणे, कचरा व्यवस्थापन आणि पर्यटकांच्या संख्येवर नियंत्रण (carrying capacity) या बाबींचा समावेश होतो, ज्यामुळे ऐतिहासिक वारसा भविष्यासाठी सुरक्षित राहील.

संवर्धन आणि संरक्षण: किल्ल्यांचे मूळ स्वरूप न बदलता केवळ आवश्यक दुरुस्ती करणे आणि ऐतिहासिक वास्तूंचे जतन करणे, गड-किल्ल्यांची मूळ वास्तुकला कायम ठेवून त्यांच्या डागडुजीसाठी "गडकोट विकास महामंडळ" स्थापन केली पाहिजे ज्याप्रमाने रायगड विकास मह्मंडळ आहे.

स्थानिक समुदायाचा सहभाग: पर्यटन विकासात स्थानिक लोकांना रोजगार (उदा. गाइड, होमस्टे) उपलब्ध करून देणे, जेणेकरून त्यांना पर्यटनातून थेट आर्थिक लाभ मिळेल, पर्यटकांना सुविधा पुरवताना स्थानिक रोजगार निर्मिती करणे.

पर्यावरण पूरक व्यवस्थापन: किल्ल्यांवर प्लास्टिक बंदी, कचरा व्यवस्थापन (Dry/Wet Waste), आणि नैसर्गिक संसाधनांचे (पाणी, झाडे) रक्षण करणे, किल्ल्यांवर स्वच्छता राखणे, प्लास्टिक बंदी, आणि ऐतिहासिक पाण्याचे स्त्रोत (टाकी) पुनरुज्जीवित करणे.

हेरीटेज हॉटेलला विरोध: किल्ल्यांचे पावित्र्य राखण्यासाठी तिथे व्यावसायिक हेरीटेज हॉटेल उभारण्यास विरोध दर्शवला गेला आहे. महाराष्ट्रातील किल्ले हे राज्याचा ऐतिहासिक वारसा असून त्यांच्या शाश्वत विकासाद्वारे आपल्या संस्कृतीचे रक्षण करणे हे मुख्य उद्दिष्ट आहे.

शैक्षणिक पर्यटन: पर्यटकांना किल्ल्यांचा इतिहास आणि संवर्धनाचे महत्त्व समजावून सांगणे.

समारोप :

किल्ले पुरंदर- वज्रगड हे एक लोकप्रिय पर्यटन स्थळ म्हणून उदयास आले आहे, जो जगभरातील पर्यटकांना आकर्षित करतात. त्याचे ऐतिहासिक महत्त्व, चित्तथरारक दृश्ये आणि आव्हानात्मक ट्रेकिंगमुळे ते इतिहासप्रेमी, निसर्गप्रेमी आणि साहसी शोधणाऱ्यांसाठी एक मनमोहक ठिकाण बनले आहे. पुरंदर किल्ला केवळ इतिहासातच समृद्ध नाही तर त्यात उल्लेखनीय स्थापत्य वैशिष्ट्ये देखील आहेत. त्याची मजबूत तटबंदी, गुंतागुंतीची कोरीवकाम आणि सुनियोजित मांडणी त्या काळातील उल्लेखनीय अभियांत्रिकी कौशल्याचे दर्शन घडवते. पुरंदर किल्ला आठवड्यातील सर्व दिवस सकाळी ११:०० ते दुपारी ४:०० वाजेपर्यंत पर्यटकांसाठी खुला असतो. प्रवेश शुल्क अगदी कमी आहे आणि पर्यटकांनी वैध ओळखपत्र सोबत बाळगणे आवश्यक आहे. ट्रेकसाठी आरामदायी बूट घालण्याची आणि पुरेसे पाणी सोबत बाळगण्याची शिफारस केली जाते. पुरंदर किल्ला हा महाराष्ट्राच्या समृद्ध इतिहासाचा आणि स्थापत्य वारशाचा पुरावा आहे. त्याचा चिरस्थायी वारसा पिढ्यानपिढ्या पर्यटकांना प्रेरणा आणि मोहित करत राहतो. मराठेकालीन किल्ले पुरंदर- वज्रगड पर्यटन व शाश्वत विकास म्हणजे पर्यावरण, स्थानिक संस्कृती आणि अर्थव्यवस्था यांचा समतोल राखून संवर्धन करणे. यामध्ये किल्ल्यांची ऐतिहासिक अखंडता टिकवणे, स्थानिक रोजगार वाढवणे, कचरा व्यवस्थापन करणे आणि पर्यटकांच्या संख्येवर नियंत्रण (carrying capacity) ठेवणे, ज्यामुळे ऐतिहासिक वारसा भविष्यासाठी सुरक्षित राहील.

संदर्भ :

1. श्रीनामदेव गाथा ,शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,मुंबई,१९७०,पृष्ठ ४५७.
2. कुलकर्णी, अ. रा.,रामचंद्रपंत अमात्यांचे आज्ञापत्र , डायमंड पब्लिकेशन,२००७,पुणे.
3. कुलकर्णी, अ. रा., खरे, ग. ह., मराठ्यांचा इतिहास, खंड १, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८५.
4. मराठी विश्वकोश
5. एक्के शिवाजीराव,किल्ले पुरंदर व परिसर,एक्के गजाननशिवाजीराव,पुणे २०१८.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

6. सरदेसाई गो.स. (संपा.), मराठी रियासत खंड १, पौप्युलर प्रकाशन, ताडदेव, मुंबई ४०००३४.
7. शिवकालीन पत्र सार संग्रह १ पृष्ठ ३६३ लेख १२९३.
8. सं.नि.का. द. ३, पु. २ पत्र १४५५.
9. पेशवे दप्तर क्रमांक ५ बारभाईचे कारस्थान,सरकारी सेन्ट्रल प्रेस मुंबई,१९३०.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

Original Article

सस्टेनेबल कॉमर्स डेव्हलपमेंटमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका

प्रा. गोविंद राजेश अग्रवाल
कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय भिगवण

Manuscript ID:
JRD -2026-180334
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 3(IV)
Pp. 150-153
March- 2026
Submitted: 15 Feb. 2026
Revised: 25 Feb. 2026
Accepted: 10 Mar. 2026
Published: 31 Mar. 2026

सारांश (Abstract)

आजच्या डिजिटल युगात व्यवसाय आणि वाणिज्य क्षेत्रात तंत्रज्ञानाची भूमिका अत्यंत महत्त्वाची बनली आहे. विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence – AI) ही तंत्रज्ञान प्रणाली व्यवसायातील निर्णय प्रक्रिया, संसाधन व्यवस्थापन आणि ग्राहक सेवा यामध्ये मोठे परिवर्तन घडवून आणत आहे. सस्टेनेबल कॉमर्स डेव्हलपमेंट म्हणजे आर्थिक विकास साधताना पर्यावरण संरक्षण, सामाजिक जबाबदारी आणि संसाधनांचा कार्यक्षम वापर यांचा समतोल राखणे होय.या संशोधनाचा मुख्य उद्देश सस्टेनेबल कॉमर्सच्या विकासामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका आणि त्याचे परिणाम अभ्यासणे हा आहे. AI तंत्रज्ञानाच्या मदतीने कंपन्या ऊर्जा वापर कमी करणे, कचरा व्यवस्थापन सुधारणे, पर्यावरणपूरक सप्लाय चेन तयार करणे आणि व्यवसाय प्रक्रियांची कार्यक्षमता वाढवणे शक्य होते. या अभ्यासामध्ये दुय्यम माहिती (Secondary Data) जसे की संशोधन लेख, जर्नल, पुस्तके आणि विविध अहवाल यांचे विश्लेषण करण्यात आले आहे.संशोधनातून असे दिसून येते की AI चा वापर केल्यामुळे व्यवसाय अधिक स्मार्ट, कार्यक्षम आणि पर्यावरणपूरक होऊ शकतो. तसेच AI आधारित तंत्रज्ञानामुळे संसाधनांचा योग्य वापर होऊन टिकाऊ आर्थिक विकासाला चालना मिळते. तथापि, AI अंमलबजावणीसाठी तांत्रिक कौशल्य, डेटा सुरक्षा आणि उच्च गुंतवणूक यांसारखी काही आव्हाने देखील आहेत.या संशोधनाचा निष्कर्ष असा आहे की कृत्रिम बुद्धिमत्ता सस्टेनेबल कॉमर्सच्या विकासासाठी एक प्रभावी साधन ठरू शकते. भविष्यात कंपन्यांनी आणि धोरणकर्त्यांनी AI आधारित उपाययोजना स्वीकारल्यास पर्यावरणीय संरक्षण आणि आर्थिक विकास यामध्ये संतुलन साधणे अधिक सुलभ होईल.

प्रस्तावना (Introduction)

आधुनिक डिजिटल आणि तंत्रज्ञानप्रधान युगामध्ये व्यवसाय आणि वाणिज्य क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर परिवर्तन घडून आले आहे. माहिती तंत्रज्ञान, बिग डेटा, क्लाउड कम्प्युटिंग आणि ऑटोमेशन यांसारख्या नव्या तंत्रज्ञानामुळे उद्योग आणि व्यापार अधिक कार्यक्षम आणि स्पर्धात्मक बनले आहेत. या तंत्रज्ञानांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence – AI) हे अत्यंत महत्त्वाचे आणि प्रभावी तंत्रज्ञान म्हणून उदयास आले आहे. AI ही अशी संगणकीय प्रणाली आहे जी मानवी बुद्धिमत्तेसारखे शिकणे, माहितीचे विश्लेषण करणे, समस्या सोडवणे आणि निर्णय घेणे यास सक्षम असते. आज अनेक उद्योग आणि व्यवसाय संस्थांमध्ये AI चा वापर विविध क्षेत्रांमध्ये केला जात आहे. ग्राहक सेवा, विपणन, उत्पादन व्यवस्थापन, वित्तीय विश्लेषण, लॉजिस्टिक्स आणि सप्लाय चेन व्यवस्थापन यांसारख्या क्षेत्रांमध्ये AI तंत्रज्ञानामुळे कार्यक्षमता वाढली आहे. AI आधारित प्रणाली मोठ्या प्रमाणातील डेटा कमी वेळेत विश्लेषित करून अचूक अंदाज लावू शकतात, ज्यामुळे कंपन्यांना योग्य व्यवसाय धोरणे तयार करणे सोपे होते. दुसरीकडे, जागतिक स्तरावर औद्योगिकीकरण आणि शहरीकरण वाढल्यामुळे पर्यावरणीय समस्या अधिक गंभीर बनल्या आहेत. हवामान बदल (Climate Change), प्रदूषण, नैसर्गिक संसाधनांचा अति वापर आणि कचरा व्यवस्थापन या समस्या आज जागतिक पातळीवर मोठे आव्हान बनल्या आहेत.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
महाले अंबादास निवृत्ती संशोधक विद्यार्थी, संशोधक मार्गदर्शक संशोधन केंद्र ग्रामोन्नती मंडळाचे कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे.

How to cite this article:
अग्रवाल, . गोविंद . राजेश . (2026). सस्टेनेबल कॉमर्स डेव्हलपमेंटमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका. Journal of research & development, 18(3(IV)), 150–153. https://doi.org/10.5281/zenodo.20746214

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.20746214
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

त्यामुळे व्यवसाय संस्थांनी आर्थिक विकास करताना पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक जबाबदारी यांचा विचार करणे अत्यावश्यक झाले आहे. या पार्श्वभूमीवर "सस्टेनेबल कॉमर्स डेव्हलपमेंट" ही संकल्पना महत्त्वाची ठरते. सस्टेनेबल कॉमर्स डेव्हलपमेंट म्हणजे आर्थिक प्रगती साधताना पर्यावरणाचे संरक्षण करणे, संसाधनांचा कार्यक्षम वापर करणे आणि समाजाच्या दीर्घकालीन हिताचा विचार करणे होय. टिकाऊ व्यवसाय पद्धतींचा अवलंब केल्यास कंपन्या दीर्घकालीन आर्थिक विकास साधू शकतात तसेच पर्यावरणावर होणारा नकारात्मक परिणाम कमी करू शकतात. त्यामुळे आज अनेक कंपन्या टिकाऊ व्यवसाय मॉडेल्स विकसित करण्यावर भर देत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता या प्रक्रियेमध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावू शकते. AI च्या मदतीने कंपन्या ऊर्जा वापराचे विश्लेषण करून ऊर्जा बचत करू शकतात. उदाहरणार्थ, AI आधारित ऊर्जा व्यवस्थापन प्रणाली उत्पादन प्रक्रियेमध्ये वापरल्या जाणाऱ्या ऊर्जा संसाधनांचे निरीक्षण करून ऊर्जा वापर कमी करण्यास मदत करतात. तसेच AI आधारित डेटा विश्लेषणामुळे उत्पादन प्रक्रियेमध्ये निर्माण होणारा कचरा कमी करण्यासाठी योग्य उपाययोजना करता येतात.

AI तंत्रज्ञानाचा आणखी एक महत्त्वाचा उपयोग म्हणजे सप्लाय चेन व्यवस्थापन सुधारणा. AI आधारित प्रणाली मागणीचा अचूक अंदाज लावू शकतात, ज्यामुळे कंपन्यांना उत्पादन आणि वितरणाचे योग्य नियोजन करता येते. यामुळे अनावश्यक उत्पादन, साठा आणि वाहतूक खर्च कमी होतो. परिणामी संसाधनांचा कार्यक्षम वापर होतो आणि पर्यावरणावर होणारा नकारात्मक परिणाम कमी होतो. याशिवाय AI तंत्रज्ञानामुळे लॉजिस्टिक्स व्यवस्थापन अधिक प्रभावी बनते. स्मार्ट रूट प्लॅनिंग आणि डेटा विश्लेषणाच्या मदतीने वाहतूक मार्गांचे योग्य नियोजन करता येते. यामुळे इंधनाचा वापर कमी होतो आणि कार्बन उत्सर्जन कमी होण्यास मदत होते. त्यामुळे पर्यावरण संरक्षणाला चालना मिळते. अनेक आंतरराष्ट्रीय कंपन्या आज AI आधारित तंत्रज्ञानाचा वापर करून टिकाऊ व्यवसाय पद्धती विकसित करत आहेत. उदाहरणार्थ, ई-कॉमर्स कंपन्या AI च्या मदतीने मागणीचा अंदाज लावून उत्पादन आणि वितरणाचे नियोजन करतात. तसेच काही उत्पादन उद्योग AI आधारित प्रणालींचा वापर करून ऊर्जा व्यवस्थापन आणि कचरा व्यवस्थापन सुधारतात.

जरी AI तंत्रज्ञानाचे अनेक फायदे असले तरी त्याच्या अंमलबजावणीमध्ये काही आव्हाने देखील आहेत. AI प्रणाली विकसित करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर डेटा, तांत्रिक कौशल्य आणि आर्थिक गुंतवणूक आवश्यक असते. तसेच डेटा सुरक्षा आणि गोपनीयतेशी संबंधित मुद्दे देखील महत्त्वाचे ठरतात. त्यामुळे AI तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यासाठी योग्य धोरणे आणि व्यवस्थापन पद्धती आवश्यक आहेत.

म्हणूनच सध्याच्या स्पर्धात्मक आणि तंत्रज्ञानप्रधान व्यवसाय वातावरणामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा योग्य वापर केल्यास व्यवसाय अधिक कार्यक्षम, पर्यावरणपूरक आणि टिकाऊ बनू शकतो. या पार्श्वभूमीवर सस्टेनेबल कॉमर्स डेव्हलपमेंटमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. प्रस्तुत संशोधनामध्ये AI तंत्रज्ञानाचा वापर व्यवसायाच्या टिकाऊ विकासासाठी कसा उपयुक्त ठरू शकतो, तसेच त्याचे फायदे आणि आव्हाने यांचे विश्लेषण करण्यात आले आहे.

संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of the Study)

या संशोधनाचे मुख्य उद्दिष्ट सस्टेनेबल कॉमर्स डेव्हलपमेंटमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका समजून घेणे हे आहे. या अभ्यासाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत:

1. सस्टेनेबल कॉमर्स डेव्हलपमेंटची संकल्पना आणि महत्त्व समजून घेणे.
2. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे संसाधनांचा कार्यक्षम वापर आणि पर्यावरण संरक्षण कसे शक्य होते हे विश्लेषित करणे.
3. भविष्यातील टिकाऊ व्यवसाय विकासासाठी AI च्या संभाव्य संधींचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धती (Research Methodology)

या संशोधनामध्ये प्रामुख्याने दुय्यम माहितीचा (Secondary Data) वापर करण्यात आला आहे. विविध संशोधन लेख, जर्नल्स, पुस्तके, इंटरनेट स्रोत आणि विविध संस्थांचे अहवाल यांचा अभ्यास करून माहिती संकलित करण्यात आली आहे.

या अभ्यासासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धती (Descriptive Research Method) वापरण्यात आली आहे. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सस्टेनेबल कॉमर्स यांच्यातील संबंध, त्याचे फायदे, मर्यादा आणि भविष्यातील संधी यांचे विश्लेषण करण्यात आले आहे.

संकलित माहितीचे विश्लेषण करून व्यवसाय क्षेत्रात AI चा वापर पर्यावरणपूरक आणि टिकाऊ विकासासाठी कसा उपयुक्त ठरू शकतो याचा अभ्यास करण्यात आला आहे.

सस्टेनेबल कॉमर्स डेव्हलपमेंटची संकल्पना आणि महत्त्व

सस्टेनेबल कॉमर्स डेव्हलपमेंट म्हणजे असा व्यापार आणि आर्थिक विकास जो पर्यावरणाचे संरक्षण, सामाजिक समता आणि आर्थिक प्रगती यांचा समतोल राखतो. यामध्ये संसाधनांचा योग्य आणि मर्यादित वापर, पर्यावरणावर होणारा नकारात्मक परिणाम कमी करणे आणि भविष्यातील पिढ्यांच्या गरजा लक्षात घेऊन निर्णय घेणे यांचा समावेश होतो. पारंपरिक व्यापार पद्धतींमध्ये नफ्यावर अधिक भर दिला जातो, परंतु सस्टेनेबल कॉमर्समध्ये नफा, लोक आणि पर्यावरण (People, Planet, Profit) या तिन्ही घटकांचा विचार

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

केला जातो. या संकल्पनेत हरित उत्पादन (eco-friendly products), पुनर्वापर (recycling), नूतनीकरणीय ऊर्जा (renewable energy), आणि नैतिक व्यापार पद्धती (ethical practices) यांना महत्त्व दिले जाते. उदाहरणार्थ, कमी प्रदूषण करणाऱ्या तंत्रज्ञानाचा वापर, कचऱ्याचे व्यवस्थापन, आणि स्थानिक संसाधनांचा योग्य वापर हे सस्टेनेबल कॉमर्सचे महत्त्वाचे घटक आहेत.

सस्टेनेबल कॉमर्स डेव्हलपमेंटचे महत्त्व अनेक प्रकारे दिसून येते. प्रथम, हे पर्यावरणाचे संरक्षण करते आणि हवामान बदलाच्या समस्यांवर नियंत्रण ठेवण्यास मदत करते. दुसरे म्हणजे, हे समाजातील सर्व घटकांना समान संधी उपलब्ध करून देते, ज्यामुळे सामाजिक समतोल राखला जातो. तिसरे म्हणजे, दीर्घकालीन दृष्टीने व्यवसाय टिकवून ठेवण्यासाठी आणि आर्थिक स्थैर्य मिळवण्यासाठी ही संकल्पना उपयुक्त ठरते. याशिवाय, ग्राहकांमध्येही पर्यावरणपूरक उत्पादनांची मागणी वाढत आहे, त्यामुळे सस्टेनेबल पद्धती अवलंबणाऱ्या व्यवसायांना स्पर्धात्मक फायदा मिळतो. सरकारे आणि आंतरराष्ट्रीय संस्था देखील अशा उपक्रमांना प्रोत्साहन देत आहेत. एकंदरीत, सस्टेनेबल कॉमर्स डेव्हलपमेंट ही केवळ एक पर्याय नसून भविष्यासाठी आवश्यक असलेली दिशा आहे, जी पर्यावरण, समाज आणि अर्थव्यवस्था यांचा संतुलित विकास साधते.

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे संसाधनांचा कार्यक्षम वापर आणि पर्यावरण संरक्षण – उद्दिष्टाचे स्पष्टीकरण

या उद्दिष्टाचा हेतू म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) कशाप्रकारे नैसर्गिक संसाधनांचा अधिक कार्यक्षम वापर करण्यास मदत करते आणि पर्यावरणाचे संरक्षण साध्य करते, याचे विश्लेषण करणे. AI तंत्रज्ञानामुळे मोठ्या प्रमाणातील डेटा विश्लेषण करून ऊर्जा, पाणी आणि कच्चा माल यांचा योग्य वापर करता येतो. उदाहरणार्थ, स्मार्ट सिस्टम्सच्या मदतीने ऊर्जा वापर कमी करणे, उत्पादन प्रक्रियेत वाया जाणारे संसाधन टाळणे आणि प्रदूषणाचे प्रमाण कमी करणे शक्य होते. शेती, उद्योग आणि शहरी व्यवस्थापनामध्ये AI चा वापर करून अचूक नियोजन करता येते, ज्यामुळे अनावश्यक संसाधनांचा वापर कमी होतो. तसेच, हवामान बदलाचे निरीक्षण आणि अंदाज घेण्यासाठी AI उपयुक्त ठरते. यामुळे पर्यावरणपूरक निर्णय घेणे सोपे होते. एकंदरीत, AI मुळे शाश्वत विकास साध्य होऊन पर्यावरण संरक्षण अधिक प्रभावीपणे करता येते.

भविष्यातील टिकाऊ व्यवसाय विकासासाठी AI च्या संभाव्य संधी – उद्दिष्टाचे स्पष्टीकरण

या उद्दिष्टाचा हेतू म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) भविष्यात टिकाऊ व्यवसाय विकासासाठी कोणत्या नव्या संधी निर्माण करू शकते, याचा अभ्यास करणे. AI च्या मदतीने व्यवसाय अधिक कार्यक्षम, खर्च-प्रभावी आणि पर्यावरणपूरक बनू शकतात. उदाहरणार्थ, स्मार्ट उत्पादन प्रक्रिया, स्वयंचलित यंत्रणा आणि डेटा-आधारित निर्णयामुळे संसाधनांचा योग्य वापर करता येतो. AI मुळे हरित तंत्रज्ञान (green technology) विकसित होण्यास मदत होते, जसे की ऊर्जा व्यवस्थापन प्रणाली, स्मार्ट शहरे (smart cities) आणि कचरा व्यवस्थापन. तसेच, ग्राहकांच्या गरजांचा अचूक अंदाज घेऊन उत्पादनाचे नियोजन करता येते, ज्यामुळे अनावश्यक उत्पादन टाळले जाते. या अभ्यासातून विद्यार्थ्यांना भविष्यातील व्यवसायातील बदल आणि संधी समजतात. एकंदरीत, AI मुळे टिकाऊ, नवोन्मेषी आणि स्पर्धात्मक व्यवसाय उभारण्यासाठी नवीन दिशा मिळते.

साहित्य समीक्षा (Literature Review)

सस्टेनेबल कॉमर्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावर अनेक संशोधकांनी विविध अभ्यास केले आहेत. या अभ्यासांमधून असे दिसून येते की आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व्यवसायाच्या टिकाऊ विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

काही संशोधनानुसार कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने व्यवसायातील उत्पादन प्रक्रिया अधिक कार्यक्षम बनू शकते. AI आधारित डेटा विश्लेषणामुळे कंपन्यांना ग्राहकांच्या गरजा समजून घेणे सोपे होते आणि संसाधनांचा योग्य वापर करता येतो. काही संशोधकांनी असे नमूद केले आहे की AI तंत्रज्ञानामुळे सप्लाय चेन व्यवस्थापन सुधारते. यामुळे वाहतूक खर्च कमी होतो, ऊर्जा वापर कमी होतो आणि पर्यावरणावर होणारा नकारात्मक परिणाम कमी होतो. तसेच काही अभ्यासांमध्ये असे आढळून आले आहे की AI च्या मदतीने कचरा व्यवस्थापन, ऊर्जा व्यवस्थापन आणि उत्पादन प्रक्रियेतील कार्यक्षमता वाढवता येते. त्यामुळे व्यवसाय अधिक पर्यावरणपूरक आणि टिकाऊ बनतो. म्हणूनच विविध संशोधन अभ्यासांमधून असे स्पष्ट होते की कृत्रिम बुद्धिमत्ता सस्टेनेबल कॉमर्स डेव्हलपमेंटमध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकते.

संशोधन निष्कर्ष (Findings)

या अभ्यासातून पुढील महत्त्वाचे निष्कर्ष समोर आले आहेत:

1. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे व्यवसायातील निर्णय प्रक्रिया अधिक अचूक आणि जलद होते.
2. AI च्या वापरामुळे सप्लाय चेन व्यवस्थापन सुधारते आणि संसाधनांचा कार्यक्षम वापर होतो.
3. व्यवसायातील ऊर्जा वापर आणि उत्पादन प्रक्रियेत निर्माण होणारा कचरा कमी करण्यासाठी AI उपयुक्त ठरते.
4. AI तंत्रज्ञानामुळे व्यवसाय अधिक पर्यावरणपूरक आणि टिकाऊ बनू शकतो.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

5. तथापि, AI तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी उच्च तांत्रिक कौशल्य आणि गुंतवणूक आवश्यक असते.

निष्कर्ष (Conclusion)

या संशोधनाच्या आधारे असे निष्कर्ष काढता येतात की सस्टेनेबल कॉमर्स डेव्हलपमेंटमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. AI तंत्रज्ञानामुळे व्यवसाय प्रक्रियांची कार्यक्षमता वाढते, संसाधनांचा योग्य वापर होतो आणि पर्यावरणावर होणारा नकारात्मक परिणाम कमी होऊ शकतो.

AI आधारित प्रणालींच्या मदतीने कंपन्या ऊर्जा बचत, कचरा व्यवस्थापन आणि स्मार्ट सप्लाय चेन यांसारख्या क्षेत्रांमध्ये सुधारणा करू शकतात. त्यामुळे व्यवसायाचा विकास करताना पर्यावरणाचे संरक्षण करणे शक्य होते.

भविष्यात टिकाऊ आर्थिक विकास साधण्यासाठी कंपन्यांनी आणि धोरणकर्त्यांनी AI तंत्रज्ञानाचा अधिक प्रमाणात वापर करणे आवश्यक आहे. योग्य नियोजन आणि तांत्रिक कौशल्याच्या मदतीने AI सस्टेनेबल कॉमर्सच्या विकासासाठी प्रभावी साधन ठरू शकते.

संदर्भसूची (References)

1. **डॉ. सतीश पांडे** – *आधुनिक व्यवसाय व्यवस्थापन* (Modern Business Management संदर्भात AI आणि टिकाऊ विकास याबद्दल माहिती)
2. **प्रा. सुनील देशमुख** – *ई-कॉमर्स आणि डिजिटल मार्केटिंग* (डिजिटल तंत्रज्ञान आणि AI चा व्यवसायातील वापर)
3. **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (Balbharati)** – *वाणिज्य (Commerce) पुस्तके* (शालेय स्तरावर टिकाऊ विकास आणि व्यवसाय संकल्पना)
4. **डॉ. अर्चना जोशी** – *पर्यावरण आणि शाश्वत विकास* (सस्टेनेबल डेव्हलपमेंटची मूलभूत माहिती)

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

Original Article

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० आणि भारतामधील शाश्वत आर्थिक विकासात उच्च शिक्षणाची भूमिका

प्रा. महेंद्र विठ्ठल बागुल
सहाय्यक प्राध्यापक, शहाजीराजे महाविद्यालय खटाव ता. खटाव जि. सातारा
इमेल: mahendrab0510@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-1803335
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 3(IV)
Pp. 154-158
March- 2026
Submitted: 15 Feb. 2026
Revised: 25 Feb. 2026
Accepted: 10 Mar. 2026
Published: 31 Mar. 2026

सारांश

उच्च शिक्षण हे भारताच्या शाश्वत आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय विकासाचे मूलभूत साधन आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे उच्च शिक्षणाला सर्वांगीण कौशल्याभिमुख, संशोधनाभिमुख आणि डिजिटल दृष्टिकोनातून सुधारण्याचे मार्गदर्शन करते. भारतातील उच्च शिक्षण व्यवस्थेचा विस्तार, गुणवत्ता आणि आधुनिक सुधारणा, मानवी भांडवल यांचा थेट संबंध शाश्वत आर्थिक विकासाशी जोडला आहे. भारतातील उच्च शिक्षण व्यवस्था, उदयोन्मुख (NEP2.0) अंतर्गत सुधारणा, मानवी भांडवल निर्मितीत उच्च शिक्षणाची भूमिका, आव्हाने आणि मर्यादा तसेच शाश्वत आर्थिक विकासात उच्च शिक्षणाने महत्त्वपूर्ण दीर्घकालीन योगदान दिले आहे. या शोधनिबंधात राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० आणि भारतामधील शाश्वत आर्थिक विकासात उच्च शिक्षणाच्या भूमिकेतील विविध पैलूंचा सखोल अभ्यास केला आहे.

मुख्यशब्द : *राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP 2020), उच्च शिक्षण, शाश्वत आर्थिक विकास, मानवी भांडवल निर्मिती, बहुविषयक शिक्षण, कौशल्याधारित शिक्षण, संशोधन व नवोपक्रम, डिजिटल शिक्षण, शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs),*

प्रस्तावना

भारतातील उच्च शिक्षण क्षेत्रात गेल्या काही वर्षांपासून लक्षणीय विस्तार झाला असून, Gross Enrolment Ratio (GER) मध्ये वाढ होत आहे. जागतिक स्तरावर शाश्वत विकासाचे उद्दिष्टे (SDGs) साध्य करण्यासाठी शिक्षणाची भूमिका महत्त्वपूर्ण मानली जाते. यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षण (SDG-4) आणि आर्थिक विकास (SDG-8) यामध्ये उच्च शिक्षणाचा थेट संबंध जोडला आहे. भारतामध्ये उच्च शिक्षण व्यवस्था ही केंद्रीय व राज्य विद्यापीठे, स्वायत्त महाविद्यालये तसेच तांत्रिक व व्यवस्थापन संस्था (IIT, IIM, NIT) अशा विविध घटकांवर आधारलेले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रवेश संख्येमध्ये सतत वाढ, खाजगी संस्थांचा वाढता सहभाग आणि ग्रामीण-शहरी समतोल विस्तार यामुळे व्यापक स्वरूप प्राप्त झालेले आहे. परिणामी गुणवत्तेतील असमानता संशोधनाचा अभाव तसेच पायाभूत सुविधा आणि डिजिटल संसाधनाची कमतरता या समस्या अध्यापही भेडसावत आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरण NEP 2020 अंतर्गत सुधारणा अंमलबजावणीच्या अनुषंगाने उदयोन्मुख (NEP 2.0) घडामोडींमध्ये विविध बहुविषयक उच्च शिक्षण, संशोधन व नवोपक्रमाला प्रोत्साहन, कौशल्य शिक्षण आणि डिजिटल शिक्षण हे प्रमुख स्रोत आहेत. विद्यार्थ्यांना ज्ञान, रोजगार, औद्योगिक कौशल्य तसेच ABC, SWAYAM, DIKSHA, AI यासारख्या डिजिटल प्लॅटफॉर्म उपक्रमांमुळे उच्च शिक्षणात मोठ्या प्रमाणात गतिशीलता निर्माण झाली आहे. मानवी भांडवल निर्मितीत उच्च शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे उत्पादन क्षमता, रोजगार, स्टार्टअप, संशोधन, तंत्रज्ञान पर्यावरण जागरूकता, सामाजिक विकास अशा विविध घटकांना प्रोत्साहन देते व हरित अर्थव्यवस्थेला गती प्रदान करते.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
महेंद्र विठ्ठल बागुल सहाय्यक प्राध्यापक, शहाजीराजे महाविद्यालय खटाव ता. खटाव जि. सातारा

How to cite this article:
बागुल, महेंद्र. विठ्ठल. (2026). राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० आणि भारतामधील शाश्वत आर्थिक विकासात उच्च शिक्षणाची भूमिका. Journal of research & development, 18(3(IV)), 154–158. https://doi.org/10.5281/zenodo.20746299

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.20746299
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(IV)| March-2026

शाश्वत आर्थिक विकासात उच्च शिक्षणाने महत्त्वपूर्ण योगदान दिल्यामुळे शिक्षण व्यवस्थेत दीर्घकालीन परिणाम राष्ट्रीय शाश्वत प्रगतीवर दिसून येईल. या शोधनिबंधात राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 आणि भारतातील शाश्वत आर्थिक विकासात उच्च शिक्षणाच्या भूमिकेचा चिकित्सक अभ्यास करण्यात येणार आहे.

भारतातील उच्च शिक्षण आणि शाश्वत विकासातील परस्परसंबंध

भारतातील उच्च शिक्षण आणि शाश्वत विकास यांचा अत्यंत घनिष्ठ आणि परस्परपूरक संबंध आढळतो. शाश्वत विकास म्हणजे आर्थिक प्रगतीच नव्हे, तर सामाजिक समता, पर्यावरणीय संतुलन, मानवी भांडवल निर्मिती, आणि दीर्घकालीन विकास या सर्व घटकांची सांगड घालण्यासाठी उच्च शिक्षण महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. SDG-4 गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि SDG-8 शालीन कामकाज व आर्थिक विकास यांचा शाश्वत विकास उद्दिष्टांशी थेट संबंध आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे कौशल्ययुक्त मनुष्यबळ तयार होते. त्यामुळे रोजगारनिर्मिती, उत्पादनक्षमतेत वाढ व आर्थिक विकासाला चालना मिळते.[४]

